

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १९ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७४ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


# फडणवीसांकडे गडचिरोलीचे तर अजितदादांकडे बीडचे पालकत्व

## — जयकुमार गोरे सोलापूरचे नवे पालकमंत्री —



**मुंबई, १८ जानेवारी**

मागील अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या पालकमंत्रिपदाची यादी अखेर शनिवारी रात्री जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणेच त्यांच्याकडे गडचिरोलीचे पालकत्व देण्यात आले. सोलापूरच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. महसूल मंत्री व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्री झाले आहेत. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना अकोल्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले. अॅड. आशिष जयस्वाल यांच्याकडे गडचिरोलीचे सह-पालकमंत्रिपद सोपवण्यात आले.


डॉ. अशोक उईके यांच्याकडे चंद्रपूरची जबाबदारी देण्यात आली. संजय सावकारे भंडाऱ्याचे पालकमंत्री असणार आहेत. मकरंद जाधव यांना बुलढाण्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले, तर गोंदियाची जबाबदारी बाबासाहेब पाटील यांना सोपवण्यात आली. डॉ. पंकज भोयर वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री असणार आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणी चर्चेत आलेल्या बीडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाण्याचे पालकमंत्रिपद राहणार आहे. चंद्रकांत पाटील यांच्याकडे सांगलीचे पालकमंत्रिपद, तर हसन मुश्रीफ हे वाशीमचे पालकमंत्री आहेत. यवतमाळचे पालकमंत्रिपद संजय राठोड यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्याची धुरा गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आली.

### पालकमंत्र्यांची संपूर्ण यादी

▸ गडचिरोली - देवेंद्र फडणवीस ▸ ठाणे - एकनाथ शिंदे ▸ मुंबई शहर - एकनाथ शिंदे ▸ पुणे - अजित पवार ▸ बीड - अजित पवार ▸ नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे ▸ अमरावती चंद्रशेखर बावनकुळे ▸ अहमदनगर - राधाकृष्ण विखे पाटील ▸ वाशिम - हसन मुश्रीफ ▸ **सांगली - चंद्रकांत पाटील** ▸ नाशिक - गिरीश महाजन ▸ पालघर - गणेश नाईक ▸ जळगाव -गुलाबराव पाटीलयवतमाळ - संजय राठोड ▸ मुंबई उपनगर - आशिष शेलार तर सहपालकमंत्री - मंगलप्रभात लोढा ▸ रत्नागिरी - उदय सामंत ▸ धुळे - जयकुमार रावल ▸ जालना - पंकजा मुंडे ▸ नांदेड - अतुल सावे ▸ चंद्रपूर - अशोक उईके ▸ सातारा - शंभूराज देसाई ▸ रायगड - आदिती तटकरे ▸ **लातूर - शिवेंद्रराजे भोसले** ▸ नंदूरबार - माणिकराव कोकाटे ▸ **सोलापूर - जयकुमार गोरे** ▸ हिंगोली - नरहरी झिरवाळ ▸ भंडारा - संजय सावकारे ▸ छत्रपती संभाजीनगर - संजय शिरसाट ▸ **धाराशिव - प्रताप सरनाईक** ▸ बुलढाणा - मकरंद जाधव ▸ सिंधुदुर्ग - नितेश राणे ▸ अकोला - आकाश फुंडकर ▸ गोंदिया -बाबासाहेब पाटील ▸ कोल्हापूर - प्रकाश आबिटकर तर सह पालकमंत्री - माधुरी मिसाळ ▸ वर्धा - पंकज भोयर ▸ ३६.परभणी - मेघना बोर्डिकर

### मंत्रिमंडळ विस्तारापासून होती प्रतीक्षा

विधानसभा निवडणुकीत महायुतीला लोकांनी प्रचंड बहुमत दिले. त्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रिपदाची, तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. त्यानंतर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. त्यानंतर मागील काही दिवसांपासून पालकमंत्र्यांच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली नव्हती. त्यामुळे या यादीची मोठी प्रतीक्षा होती. यात धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आले. अजित पवार यांच्याकडे बीड आणि पुण्याची जबाबदारी देण्यात आली. एकनाथ शिंदे यांच्याकडेही दोन जिल्हे देण्यात आले. गडचिरोली, मुंबई उपनगर आणि कोल्हापूरलाही दोन पालकमंत्री आहेत. रायगडचे पालकमंत्रिपद आदिती तटकरे यांना देण्यात आले. भरत गोगावले यांना मात्र संधी मिळाली नाही.



# संजय रॉय दोषी; उद्या शिक्षा

## आरजी कार बलात्कार-खूनप्रकरणी सियालदाह न्यायालयाचा निकाल

**कोलकाता, १८ जानेवारी**

कोलकाता येथील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार आणि खून प्रकरणी शनिवारी सियालदाह न्यायालयाने मुख्य आरोपी संजय रॉयला दोषी ठरवले. त्याला सोमवारी शिक्षा सुनावली जाणार आहे. या खटल्याच्या ५७ दिवसांनंतर अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बान दास यांच्या न्यायालयाने निकाल दिला.

संजय रॉयने न्यायाधीशांसमोर म्हटले की, मला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले आहे. मी असा गुन्हा केलेला नाही. ज्यांनी गुन्हा केला, त्यांना सोडून दिले. एका आयपीएसचा यात सहभाग आहे. निकालानंतर त्याची रवानगी न्यायलयीन कोठडीत करण्यात आली. आरजी कार रुग्णालयाच्या सेमिनार हॉलमध्ये ९ ऑगस्ट रोजी प्रशिक्षणार्थी डॉक्टर मृतावस्थेत आढळून आली होती. या घटनेवरून देशभर डॉक्टरांनी निर्देशने करून संताप व्यक्त केला होता. या प्रकरणी कोलकाता पोलिसांनी नागरी स्वयंसेवक संजय रॉय याला दुसऱ्या दिवशी अटक केली होती. या प्रकरणाचा तपास उच्च न्यायालयाने सीबीआयकडे सोपवला होता. सीबीआयने संजय रॉय हाच एकमेव मुख्य आरोपी असल्याचे म्हटले.

**खटल्याची सुनावणी इन-कॅमेरा**

संपूर्ण खटल्याची सुनावणी इन-कॅमेरा आणि बंद कोर्टरूममध्ये घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान एकूण ५० साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. यात पीडितेचे पालक, सीबीआय, तपास अधिकारी, न्यायवैद्यक तज्ज्ञ आणि काही डॉक्टर आणि पीडितेचे सहकाऱ्यांचा समावेश होता.

# माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकरांचा राजीनामा

## बॅलेट पेपर, बॅलेटमधील चिठ्या मोजण्याची मागणी करत दिला राजीनामा..!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांनी बॅलेट पेपरवर विधानसभा निवडणूक घेण्याची मागणी करत आमदारपदाचा राजीनामा निवडणूक आयोगाकडे सादर केला आहे. तशा आशयाचे राजीनामापत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.



विधानसभा निवडणुकीत माळशिरस तालुक्यात भारतीय जनता पार्टीचे उमेदवाराला अपेक्षेपेक्षा अधिक मतदान झाले होते. त्यामुळे मतदान प्रक्रियेवर आक्षेप घेत आ. जानकर यांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी केली होती. तसेच मारकडवाडी या गावात मतदान प्रक्रियेविरोधात नागरिकांनी आवाज उठवला होता. तसेच बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी गावकऱ्यांनी केली होती. मात्र हे आंदोलन अधिकच चिगळल्यामुळे तो विषय मागे पडला.

मात्र आ. उत्तमराव जानकर यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या राजीनाम्यामध्ये बॅलेट पेपरवर विधानसभा निवडणूक घ्यावी अन्यथा बलेट मशीनमधील चिठ्या नागरिकांच्या हातात देऊन पुन्हा त्या जमा करून घेण्याची मागणी करत राजीनामा देत असल्याचे सांगितले आहे.

**राजीनाम्यावर तारीखही चुकली**

या राजीनामा पत्रावर तारीख १८ जानेवारी २०२४ आहे. त्यामुळे हा राजीनामा खरोखरच दिला आहे का? याविषयी उलटसुलट चर्चा सोलापूर जिल्ह्यात सुरू झाली आहे.

# चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघ जाहीर

## जयस्वालची निवड, शमीचे पुनरागमन

**मुंबई, १८ जानेवारी**

बीसीसीआयने शनिवारी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाची घोषणा केली. रोहित शर्मा अजूनही संघाचा कर्णधार आहे, शुभमन गिल उपकर्णधार असेल. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला एका वर्षानंतर संघात संधी मिळाली आहे. दुखापतीमुळे मोहम्मद शमी नोव्हेंबर २०२३ पासून संघाबाहेर होता.

रोहित आणि निवडकर्ता अजित आगरकर यांनी वानखेडे स्टेडियमवर १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. संघात ४ अष्टपैलू खेळाडूंना स्थान मिळाले आहे. यावर रोहितने माध्यमांना सांगितले की, आमच्यासाठी असे पर्याय चांगले आहेत, जे गरज पडल्यास गोलंदाजी आणि फलंदाजी देखील करू शकतात.

**या खेळाडूंचा समावेश**

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, पंत आणि जडेजा.

**पाकिस्तानशी २३ फेब्रुवारीला सामना**

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिला सामना बांगलादेशविरुद्ध २० फेब्रुवारी रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला जाईल. संघाचा दुसरा सामना २३ फेब्रुवारीला पाकिस्तानशी आणि तिसरा सामना २ मार्चला न्यूझीलंडशी होईल.









## महत्त्वाचे

### अंकिता-नायकथाला दुहेरीचे विजेतेपद



**नवी दिल्ली** : भारताची अव्वल टेनिसपटू अंकिता रैनाने नऊ महिन्यांत आपले पहिले दुहेरीचे विजेतेपद जिंकले. अंकिताने ब्रिटिश जोडीदार नायकथा बेन्ससह आयटीएफ डब्ल्यू ५० टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत विजय मिळवला. अंकिता-नायकथाने शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात अमेरिकन चौथ्या मानांकित जेसी ॲनी आणि जेसिका फाईला या जोडीला एक तास ४२ मिनिटांत ६-४, ३-६, १०-८ अशी धूळ चारली. अंकिताने एकेरी फेरीत पहिल्या फेरीतच पराभूत झाली, परंतु तिने निराशेची भरपाई करत नायकथासोबत दुहेरीचे विजेतेपद पटकावले. सामन्याच्या वर्चस्वपूर्ण सुरुवातीला अंकिता व नायकथाने सलग नऊ गुण मिळवले, तर अमेरिकन खेळाडूंना नाहक चुका रोखण्यासाठी संघर्ष करावा लागला. आजच्या विजेतेपदाच्या विजयापूर्वी, अंकिताने शेवटचा दुहेरीचा करंडक एप्रिल २०२४ मध्ये जपानमधील काशिवा स्पर्धेत तैपेईच्या चिया यी त्साओसोबत भागीदारी करून जिंकला होता. पहिल्या एकेरीच्या उपांत्य फेरीत हंगेरीच्या पन्ना उदवर्डीने ब्रिटीश चौथ्या मानांकित युरिको लिली मियाझाकीचा ६-३, ६-२ असा सहज पराभव केला.

### गोवा एफसीचे लक्ष दुसऱ्या क्रमांकावर

**मडगाव** : इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ फुटबॉल स्पर्धेत रविवारी गोव्यातील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर एफसी गोवा आणि ईस्ट बंगाल एफसी यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. गोवा एफसीने गत पाच सामन्यांमध्ये तीन अनिर्णीत सामने खेळले असून, १५ सामन्यांतून २७ गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहेत. ईस्ट बंगाल १५ सामन्यांतून १४ गुण मिळवून गुणतालिकेत ११ व्या स्थानावर आहे. गत पाच सामन्यांमध्ये ईस्ट बंगालने दोन विजय आणि एक सामना अनिर्णीत राखला आहे, परंतु दोन सामन्यात पराभव पत्करावा लागला. ईस्ट बंगाल एफसीविरुद्धच्या सामन्यात एफसी गोवा विजय नोंदवून दुसऱ्या क्रमांकावर झेप मारण्याचा प्रयत्न करेल. एफसी गोवाने ईस्ट बंगाल एफसीसोबतच्या गत पाच सामन्यांमध्ये १२ गोल केले आहेत.

### भारत-वेस्ट इंडीज लढत आज

**क्वालालम्पूर** : शनिवारपासून येथे प्रारंभ झालेल्या १९ वर्षांखालील महिला विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला असून रविवारी भारत आणि वेस्ट इंडीजदरम्यान सलामीचा सामना खेळला जाणार आहे. जी. त्रिशा हिने आपल्या नवोदित क्रिकेट कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय स्पर्धा करण्याचे आणि चषक जिंकून निरोप घेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. गत वेळेस भारताने दक्षिण आफ्रिकेत इंग्लंड संघाला ७ गड्यांनी पराभूत करून पहिला १९ वर्षाखालील महिला टी-२० विश्वचषक विजेतेपद पटकावले. ६९ धावांचा पाठलाग करताना जी. त्रिशाने सर्वाधिक २४ धावा केल्या होत्या. त्रिशाला अजूनही महिला क्रिकेटमध्ये भारताच्या पहिल्या विश्वचषक विजयाचा गौरव आठवतो. फ्रॅक्चरसह खेळत तिने २४ धावा करून सामना जिंकला. रविवारी वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्यात त्रिशा व जी. कमलिनी ही उजवी-डावी जोडीच्या वरच्या क्रमांकावर कशी कामगिरी करते यावर अवलंबून असेल. त्रिशाने पाच डावांमध्ये ५३ च्या सरासरीने आणि १२०.४५ च्या स्ट्राईक-रेटने १५९ धावा काढल्या आणि अंतिम सामन्यात प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार जिंकला आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कारही मिळवला होता.

### डॉ. विजय दातारकर पहिल्या खो-खो विश्वचषकाचे 'आयटीओ'



**नागपूर** : खो-खो या भारतीय खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा होत असून या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी (आयटीओ) होण्याचा मान नागपूरच्या ज्योतिबा कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन येथे प्राचार्य डॉ. विजय दातारकर यांना प्राप्त झाला आहे. भारतीय खो-खो महासंघाचे महासचिव एम. एस. त्यागी यांनी १३ ते १९ जानेवारीदरम्यान दिल्ली येथे सुरू असलेल्या या खो-खो विश्वचषकासाठी डॉ. दातारकर यांना आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी (आयटीओ) म्हणून नियुक्त केले आहे. डॉ. विजय दातारकर हे नागपूर जिल्हा खो-खो संघटनेचे सदस्य असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध क्रीडा समित्याचे ते सदस्य आहेत. शालेय जीवनापासून खो-खो चे खेळाडू असलेल्या डॉ. दातारकर यांनी २५ ते ३० अखिल भारतीय खो-खो स्पर्धांमध्ये खेळले असून विविध स्पर्धांचे नेतृत्वदेखील केले आहे. त्यांच्या या नियुक्तीसाठी स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघात जयस्वालचा समावेश, शमीचे पुनरागमन

## मोहम्मद सिराजला स्थान नाही

◆ **मुंबई, १८ जानेवारी**

प्रतिभावान डावखुरा फलंदाज यशस्वी जयस्वालची शनिवारी आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी दुखापतीमुळे बराच काळ दूर राहिल्यानंतर राष्ट्रीय संघात परतला आहे, परंतु जसप्रीत बुमराहची या प्रतिष्ठित वन-डे स्पर्धेत खेळण्याची संधी त्याच्या तंदुरुस्तीवर अवलंबून असेल.

इंग्लंड विरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी जाहीर करण्यात आलेल्या १५ जणांच्या संघात ऋषभ पंत व के. एल. राहुल हे दोन यष्टिरक्षक असतील, पण वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला स्थान देण्यात आले नाही. २०२३ मध्ये झालेल्या वन-डे विश्वचषकानंतर शमीने वन-डे संघात पुनरागमन केले आहे. हर्षित राणाला केवळ इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी





निवडण्यात आले आहे.

बुमराहला पाच आठवड्यांसाठी मैदानाबाहेर राहण्यास सांगण्यात आले आहे व तो इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन वन-डे सामन्यांसाठी उपलब्ध राहणार नाही, असे निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**भारतीय संघ**

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, के. एल. राहुल, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा, हर्षित राणा (केवळ इंग्लंड मालिकेसाठी).

◄(वृत्तसंस्था)

# कर्नाटकचा विदर्भावर विजय

## विजय हजारे चषक

## ध्रुव शोरीचे शतक व्यर्थ

◆ **वडोदरा, १८ जानेवारी**

विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील कर्नाटक संघाने विदर्भावर ३६ धावांनी विजय नोंदवून विजेतेपदाचा मान मिळविला. प्रथमच स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या करुण नायरच्या विदर्भाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

विदर्भाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. रविचंद्रन स्मरणचे (१०१) शतक, कृष्णन् श्रीजित (७८) व अभिनव मनोहरच्या (७९) अर्धशतकांच्या बळावर कर्नाटकने ५० षटकांत ६ बाद ३४८ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात विदर्भाला ४८.२ षटकांत सर्वबाद ३१२ धावांपर्यंतच मजल मारता आली.

विदर्भ संघाचा कर्णधार करुण नायरचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. मध्यम गती गोलंदाज नचिकेत भुतेने कर्नाटकचा कर्णधार व सलामीवीर मयंक अग्रवाल (३२) व केव्ही अनिशला (२३) बाद केले, तर मध्यम गती वेगवान गोलंदाज यश ठाकूरने देवदत्त पडिक्कलला (८) लवकरच तंबूत परत पाठविले. १४.३ षटकांत कर्नाटकची ३ बाद ६७धावा अशी स्थिती झाली होती. रविचंद्रन व श्रीजितने चौथ्या गड्यासाठी १६० धावांची भागीदारी केली. कृणनने ७४ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह ७८ धावांची खेळी केली. त्यानंतर रविचंद्रनने अभिनवसोबत पाचव्या गड्यासाठी ६६ धावांची भागीदारी केली. रविचंद्रनने ९२ चेंडूंत ७ चौकार व ३ षट्कारांसह १०१ धावांची शतकी खेळी केली. अभिनवने अवघ्या ४२ चेंडूंत १० चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ७९ धावांचे योगदान दिले. हार्दिक राज (नाबाद १२) व श्रेयस गोपाल (नाबाद ३) नाबाद राहिले. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सलामीवीर ध्रुव शोरीने १११ चेंडूंत ८ चौकार व २ षट्कारांसह ११० धावांची खेळी केली. आठव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या हर्ष दुबेने ६३ धावांची खेळी करून विदर्भाच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या. परंतु सरतेशेवटी विदर्भाला ४८.२ षटकांत ३१२ धावांपर्यंत मजल मारता आली. ◄(वृत्तसंस्था)

# कडवा संघर्ष करूनही बालाजी-वरेला पराभूत

## ऑस्ट्रेलियन ओपन

◆ **मेलबर्न, १८ जानेवारी**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत शनिवारी पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात कडवा संघर्ष करूनही भारताचा एन. श्रीराम बालाजी व त्याचा मेक्सिकन साथीदार मिगुएल एंजेल रेयेस-वरेलाला नुनो बोर्जेस व फ्रान्सिस्को कॅब्राल या पोर्तुगीज जोडी कडून पराभव पत्करावा लागला.

मेलबर्न पार्क येथे झालेल्या दोन तास व नऊ मिनिटांच्या चुरशीच्या लढतीत ६-७ (७), ६-४, ३-६ असा पराभव पत्करावा लागला. पहिला सेट ५६ मिनिटे चालला व दोन्ही जोडी सर्व्हिस तोडू शकल्या नाहीत व सामना टायब्रेकरमध्ये गेला व तिथे बोर्जेस व कॅब्रालने आपले आव्हान कायम राखण्यासाठी दबावाखाली संयम राखला. इंडो-मेक्सिकन जोडीने जोरदार सुरुवात केली आणि ५-४ अशी आघाडी मिळवत आपला वेग कायम ठेवला. तथापि, पोर्तुगीज जोडीने चोख प्रत्युत्तर देत ६-६ अशी बरोबरी साधली आणि सेट टायब्रेकमध्ये ढकलला. अखेर त्यांनीच बाजी मारली.

मिश्र दुहेरीत भारताकडून आता रोहन बोपण्णा आव्हान शिल्लक असेल. बोपण्णा व त्याचा चीनचा जोडीदार झांग शुईने अंतिम १६ व्या फेरीत प्रवेश केला. त्यांनी फ्रेंच-क्रोएशियन जोडी क्रिस्टीना म्लाडेनोविच व इव्हान डोडिग या जोडीचा ६-४, ६-४ असा पराभव केला. ◄(वृत्तसंस्था)

# इगा स्वियातेकचा राडुकानूवर सहज विजय

◆ **मेलबर्न, १८ जानेवारी**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या तिसऱ्या फेरीत ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेत्यांचा समावेश असलेला एकमेव महिला सामना शनिवारी इगा स्वियातेक व एम्मा राडुकानू यांच्यादरम्यान झाला व यात इगाने जबरदस्त विजय नोंदवला.

इगा स्वियातेकने गत ११ सामने जिंकत २०२१ च्या अमेरिकन ओपन विजेत्या राडुकानूचा ६-१, ६-० असा पराभव केला आणि ती चौथ्या फेरीत पोहोचणारी पहिली खेळाडू ठरली. द्वितीय विश्वमानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकने चार वेळा फ्रेंच ओपन व २०२२ मध्ये अमेरिकन ओपन जिंकले आहे. ती





इगा स्वियातेक

संभाव्य ऑस्ट्रेलियन जेतेपदाच्या जवळपास अर्ध्यावर आहे.

आठव्या मानांकित एम्मा नवारोनेही ऑन्स जाबेरला ६-४, ३-६, ६-४ असा पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला आहे.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत स्टीफनोस सितसिपासला हरविणाऱ्या अमेरिकन २० वर्षीय ॲलेक्स मिशेलसेनने रशियाच्या करेन खाचानोव्हला ६-३, ७-६ (५), ६-२ असे हरवले. ◄(वृत्तसंस्था)

# केएल राहुल पंजाबविरुद्धच्या रणजी सामन्याला मुकण्याची शक्यता

◆ **बंगळुरू, १८ जानेवारी**

कोपराच्या दुखापतीतून सावरण्यासाठी केएल राहुल गुरुवारपासून येथे सुरू होणाऱ्या पंजाबविरुद्धच्या रणजी करंडक सामन्याला मुकण्याची शक्यता आहे.

केएल राहुलच्या या समस्येबद्दल बीसीसीआयच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी चिंता व्यक्त केली असून ते सध्या त्याच्यावर लक्ष ठेवून आहेत.

तथापि, ३० जानेवारीपासून सुरू होणाऱ्या हंगामातील शेवटच्या लीग सामन्यात हरयाणाविरुद्ध खेळण्याची संधी आहे.

कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना एक-दोन दिवसांत पंजाबविरुद्धच्या सामन्यासाठी संघ जाहीर करणार आहे. तथापि, इतर भारतीय खेळाडू - प्रसिध कृष्णा व देवदत्त पडिक्कल - निवडीसाठी उपलब्ध असतील. हे दोघेही सध्या विजय हजारे चषकांत खेळत आहेत.

**कोहलीची सौराष्ट्रविरुद्धच्या रणजी सामन्यातून माघार**

ज्या दिवशी भारताचा कर्णधार रोहित शर्माने जम्मू-काश्मीरविरुद्ध मुंबईच्या पुढील रणजी करंडक सामन्यासाठी आपली उपलब्धता निश्चित केली, त्याच दिवशी स्टार खेळाडू विराट कोहलीने मानेच्या दुखापतीमुळे राजकोट येथे सौराष्ट्रविरुद्ध दिल्लीच्या सामन्यासाठी आपण उपलब्ध नसल्याचे कळवले. रणजी करंडक सामने २३ जानेवारीपासून पुन्हा सुरू होत आहे.

**पंत, गिलही खेळणार**

रणजी सामने खेळणाऱ्या सर्वात मोठ्या स्टार खेळाडूंमध्ये भारताचा कर्णधार रोहित व यशस्वी जयस्वाल (मुंबई विरुद्ध जम्मू आणि काश्मीर), ऋषभ पंत (दिल्ली विरुद्ध सौराष्ट्र) आणि शुभमन गिल (पंजाब विरुद्ध कर्नाटक) यांचा समावेश आहे. ◄(वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचा दक्षिण आफ्रिकेवर ५० गुणांनी विजय

## पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा

## अंतिम फेरीत नेपाळशी गाठ

## वैष्णवी पवार सामनावीर

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या पहिल्या खो-खो विश्वचषक २०२५ स्पर्धेत शनिवारी उपांत्य सामन्यात भारतीय महिला संघाने कमालीच्या खेळाचे प्रदर्शन केले व सहजपणे अंतिम फेरीत प्रवेश केला.



उपांत्य सामन्यातील रोमांचक क्षण

पहिल्या डावातच भारताने आपले इरादे दाखवून देत प्रतिस्पर्धी द. आफ्रिकेला सळो की पळो करून सोडले. या सामन्यात दोन्ही डावात भारताने प्रत्येकी ५ असे १० ड्रीम रन गुण मिळवत द. आफ्रिकेला धक्का दिला. आज पुन्हा एकदा प्रियांका इंगळेने (४ गुण) खो-खो विश्वचषकाचे आम्हीच दावेदार आहोत हे दाखवून दिले. पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांनी हा सामना पाहण्याचा आनंद लुटला. भारताने हा सामना ६६-१६ (मध्यंतर ३३-१०) असा ५० गुणांनी जिकला.

भारतीय संघाने सामन्याला दमदार सुरुवात केली. चैत्रा बी. यांच्या अद्वितीय ड्रीम रनमुळे संघाने पहिल्याच टप्प्यात मजबूत पकड मिळवली. नाझिया बिबी आणि निर्मला भाटी यांना दक्षिण आफ्रिकेच्या बचावपटूंनी टिपल्यानंतरही चैत्राने एकटीने ५ गुण मिळवले. मात्र, अखेर सिनेतेंबा मोसिया यांनी तिला बाद केले. या ड्रीम रनने भारताने दक्षिण आफ्रिकेच्या ८ गुणांच्या जवळ जाण्याची तयारी केली.

आता भारतीय महिला संघ रविवारी, १९ जानेवारी रोजी नेपाळविरुद्ध अंतिम लढतीसाठी मैदानात उतरणार आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात नेपाळने युगांडावर ८९-१८ असा एकतर्फी विजय मिळविला.

**सामन्याचे पुरस्कार**

सर्वोत्तम आक्रमक : सिनेतेंबा मोसिया (दक्षिण आफ्रिका), सर्वोत्तम संरक्षक : निर्मला भाटी (६ गुण) (भारत), सामन्याची सर्वोत्कृष्ट खेळाडू : वैष्णवी पवार (२.१५ मि. संरक्षण व ६ गुण) (भारत). ◄(तभा वृत्तसेवा)

# मेहनत करा, शासन सेवेत थेट नियुक्ती मिळेल

## भारतीय खो-खो कर्णधार प्रियंका इंगळे हिचा उदयोन्मुख खेळाडूंना संदेश

## मला दोन संधी मिळाल्या

**अजितकुमार संगवे**

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**

खो-खो हा केवळ खेळ नाही, तर तो जीवनातील स्वप्ने पूर्ण करण्याचा मार्ग आहे. आज खो-खोमुळे थेट नियुक्तीच्या संधी उपलब्ध आहेत. तर केंद्र शासनाची आयकर खात्यात व राज्य शासनाची क्रीडा खात्यात अश्या दोन संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कौशल्यावर विश्वास ठेवून मेहनत करावी, कारण खो-खो हा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला ओळख मिळवून देणारा खेळ आहे, असा असा संदेश भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे (पुणे) हिने उदयोन्मुख खेळाडूंना दिला आहे.

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा सुरू आहे. भारतीय संघाचे ती नेतृत्व करीत अष्टपैलू खेळी करीत आहे आहे. यावेळी दैनिक 'तरुण भारत'शी बातचीत करताना तिने हा संदेश दिला.



**माती ते मॅट : एक कठीण प्रवास**

प्रियंका सांगते, खरा खो-खो हा मातीतलाच खेळ. मातीवर कमी गती व ताकद लागते, तसेच दुखापतींचे प्रमाणही कमी असते. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवर खेळावे लागते. जिथे वेग आणि ताकद यांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो. दुखापतींचे प्रमाण जास्त असले तरी या आव्हानांवर मात करून आम्हाला हा बदल स्वीकारावा लागला.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील कळमआंबा हे तिच्या वडिलांचे मूळ गाव. प्रियांकाने मेहनत, चिकाटी व कुटुंबाचा आधार यामुळे भारतीय खो-खो क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. खो-खो कडे कशी वळली हे सांगताना प्रियांका म्हणते, खो-खो हा खेळ मला लहानपणापासून आवडायचा. पुण्यातील आळंदी रोडवरील श्री सयाजीनाथ महाराज विद्यालय वडमुखवाडी शाळेत पाचवीमध्ये शिकत असताना रोज आमच्या मैदानावर खो-खो या खेळाचा सराव चालायचा, तो सराव मी पाहत असायचे. त्यानंतर माझ्या मनामध्ये खो-खो या खेळाविषयी आवड निर्माण झाली. त्यामुळे २००९ पासून मी खो-खो खेळायला सुरुवात केली. माझ्या घरच्यांना खो-खो या खेळाविषयीची माहिती नव्हती. त्यावेळेस थोडाफार का होईना, पण घरच्यांचा नकार असायचा. पण नंतर जसजसं मी पुढे जाऊन वरच्या स्तरावर खेळायला लागले, तेव्हापासून घरच्यांचा पाठिंबा खूप वाढला. माझे अविनाश करवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळात शास्त्रशुद्ध प्रशिक्षण सुरू झाले. इंद्रायणी महाविद्यालय तळेगाव येथे शिकत असताना महाविद्यालयीन व विद्यापीठ स्पर्धाही गाजविल्या. माझ्या पालकांनी मला पाठिंबा दिला म्हणून आज मी आंतरराष्ट्रीय पातळी गाठू शकले, आज त्यांना माझा खूप अभिमान वाटतो. तिने खो-खोच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ५ स्पर्धेतून सुवर्ण व २ कांस्यपदकांची, तर २३ राष्ट्रीय स्पर्धेतून १८ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्यपदकांची कमाई केली आहे. यातील तिचे बरेच अविस्मरणीय क्षण आहेत, हे सांगताना ती म्हणते, राष्ट्रीय स्पर्धेतील १४ वर्ष गटातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा 'इला' या पुरस्काराने मला गौरवण्यात आले तो एक. दुसरा म्हणजे महिला 'राणी लक्ष्मीबाई' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे चौथ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी माझी निवड झाली, त्यावेळी मला खूप आनंद झाला होता. माझ्या आयुष्यातील हे खूप मोठे यश आहे आणि मला नुकताच महाराष्ट्र राज्य शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाला. हे असे बरेचसे क्षण मी कधीच माझ्या आयुष्यात विसरू शकत नाही. ज्यामुळे मला खूप आनंद होत आहे आणि हे सगळं माझे मार्गदर्शक व आई-वडिलांचा पाठिंबा असल्यामुळे मी आज हे विश्व निर्माण करू शकले.

# अंतिम फेरीचा थरार आशियायी देशांतच

## भारतीय पुरुषांचा अंतिम सामना नेपाळविरुध्द; भारतीय पुरुषांना द. आफ्रिकेने झुंजवलं

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, १८ जानेवारी-**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय पुरुष संघांने उपांत्य फेरीच्या आजच्या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाचा पराभव करून जरी अंतिम फेरीत स्थान मिळवले असले तरी त्यांना आज दक्षिण आफ्रिकेने कडवी लढत दिली. भारताने जरी हा विजय साकारला असला तरी आज दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी भारताच्या खेळाडूंना विजयासाठी झुंजवल. हा सामना भारताने ६०-४२ असा १८ गुणांनी जिंकला.

आज मैदानात खो देण्यापासून ते खेळाडू बाद करण्यापर्यंत दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू सूर मारताना दिसले. खुंट मारताना काही वेळा भारतीय खेळाडूंना कळलेच नसल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावावरून कळत होते. त्यांच्या खेळाडूंचा वेग वाखानण्यासारखा होता. या वेगाच्या जोरावरच दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी पहिल्या डावात २० तर दुसऱ्या डावात २२ गुण असे ४२ गुण मिळवत भारतीय संघाला कडवी लढत दिली. मध्यंतराला भारताकडे २८-२० अशी फक्त ८ गुणांचीच आघाडी होती.





तिसऱ्या टर्नमध्ये दक्षिण आफ्रिकेने आक्रमणाचा वेग वाढवत २२ गुण मिळवले जे सहज या विश्वचषकात इतर संघांना जमले नव्हते. चौथ्या टर्नमध्ये भारताने १.५० मि. दक्षिण आफ्रिकेची पहिली तुकडी बाद केली तर पुढच्या ३३ सेकंदात दुसरी तुकडी बाद करून सामन्यात जोरदार पुनरागमन केले. तिसरी तुकडीने १.४६ मि. संरक्षण करत लढत दिली. पण चौथ्या तुकडीला भारताने फक्त २२ सेकंदात बाद करून पहिल्या डावातील उट्टे काढले. तर पाचवी तुकडीने १.३१ मिनिटे मैदानात तग धरत पुन्हा एकदा सामन्यात रंगत आणण्याचा प्रयत्न केला. या सामन्यात भारताच्या प्रतीक वाईकर (४ गुण), आदित्य गनपुले (१ मि. संरक्षण ६ गुण), मोहित, सचिन भार्गो, अनिकेत पोटे (४ गुण) , गौतम एम. के. (१.२९ मि. संरक्षण व १० गुण) व निखील बी. सुयश गरगटे (१.०६ मि. संरक्षण) यांनी विजयात महत्वाची कामगिरी करत विजय साकारला.

**सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू :**

सर्वोत्कृष्ट आक्रमक: बोंगानी म्ट्स्वेनी (दक्षिण आफ्रिका)

सर्वोत्कृष्ट बचावपटू: सचिन भार्गो (भारत)

सामन्याचा उत्कृष्ट खेळाडू: गौतम एम.के. (भारत)

# अकलूजच्या समीक्षा मनकुमरेला रौप्य

## मोहोळला राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेस सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

मोहोळ येथे सुरु झालेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जूनियर ७६ किलो वजनी गटात पुण्याच्या सेजल मोहेकर हिने सुवर्ण पदक पटकाविले. अकलूजच्या समीक्षा मनकुमरे हिने रौप्य तर रत्नागिरीच्या श्रावणी पवार हिने कांस्य संपादिले.

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने सोलापूर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने तालीम फिटनेस जिमचे विलास बेलदार यांनी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पैलवान नितीन निळे यांनी केले. ते म्हणाले, शक्ती आणि युक्तीचा वापर करत यशस्वी व्हा, असा सल्ला खेळाडूंना मार्गदर्शन करताना दिला. याप्रसंगी अक्षय खताळ, महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी संजय देसाई, शिवश्याम गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष शाम कांबळे, रवींद्र निळे, रामचंद्र बेलदार ,अण्णा निळे, बापू वाघमारे, दादाराजे बेलदार अप्पा हांडे, सतीश पारवे यांचे सोलापूर जिल्हा पावर लिफ्टिंग असोसिएशनचे सचिव प्रा. संतोष गवळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सुनिता बेलदार यांचा राज्य संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या स्पर्धेसाठी राज्यभरातून १६ जिल्ह्यातून साडेचारशे खेळाडूंचा सहभाग नोंदवलेला आहे या स्पर्धेत सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनियर ,मास्टर वन, मास्टर टू, मास्टर थ्री आणि मास्टर फोर यांच्या पुरुष व महिला गटात स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेतून भटिंडा पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड केली जाईल.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# ती २० मिनिटे... माझी हत्या झाली असती

## शेख हसीना यांचा दावा

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**

बांगलादेश सोडण्यास २० मिनिटे उशीर झाला असता, तर माझी आणि माझ्या बहिणीची हत्या झाली असती, असा मोठा दावा बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी केला आहे. बांगलादेश अवामी लीग पक्षाच्या फेसबुक पेजवरील ऑडिओ भाषणात त्यांनी हा दावा केला.

५ ऑगस्ट रोजी शेख हसीना बांगलादेशमधून पलायन करून भारतात आश्रयाला आल्या. तेव्हापासून त्यांचे वास्तव्य भारतात आहे. बांगलादेशने त्यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली. मात्र, भारताने ती धुडकावून लावली. आता बांगलादेशमधील निदर्शने आणि भारतात येण्यापर्यंतचा प्रवास शेख हसीना यांनी पक्षाच्या फेसबुक पेजवर एक ऑडिओ भाषणाच्या माध्यमातून सांगितला.



यात शेख हसीना यांनी म्हटले की, ५ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली ढाक्यात हिंसक निदर्शने सुरू होती. ढाका सोडून पळून जाण्यापूर्वी काही क्षण आधी माझ्या व बहिणीच्या हत्येचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, देवाच्या कृपेने यातून बचावलो. विमानतळावर २०-२५ मिनिटे उशिरा पोहोचलो असतो, तर आमची हत्या झाली असती.

अलिकडेच भारत सरकारने शेख हसीना यांच्या व्हिसाची मुदत वाढवली आहे. बांगलादेशातून पळून गेल्यानंतर शेख हसीना भारतातील हिंडन एअरबेसवर पोहोचल्या. येथून त्यांना दिल्लीतील एका सुरक्षित घरात हलविण्यात आले होते.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनुस यांनी २३ डिसेंबर रोजी भारत सरकारला शेख हसीनाच्या प्रत्यार्पणाची विनंती केली होती. शेख हसीना यांच्यावर बांगलादेशात अनेक गुन्हेगारी खटले दाखल आहेत आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयातही त्यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्यात आला आहे. शेख हसीना २००९ पासून बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या. सर्वांत जास्त काळ पंतप्रधानपद भूषवणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. (वृत्तसंस्था)




राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे शुक्रवारपासून सुरू झालेल्या भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पोमध्ये देश-विदेशातील महागड्या आणि आकर्षक मोटारींचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शनिवारी येथे आलेल्या नागरिकांना स्कोडाच्या या विशेष कारने आकर्षित केले होते

# भारतीय अर्थव्यवस्था अमेरिका, चीनपेक्षा सुसाट

## जागतिक बँकेचा अहवालातून अंदाज

◆ **वॉशिंग्टन, १८ जानेवारी**

पुढील दोन वर्षांत भारताची अर्थव्यवस्था अमेरिका, चीनपेक्षा अधिक वेगवान राहणार असल्याचा अंदाज जागतिक बँकेने अहवालातून वर्तवला आहे. पुढील दोन आर्थिक वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.७ टक्क्यांपेक्षा अधिक राहणार आहे, तर चीनचा विकास दर ४ ते ४.५ टक्क्यांच्या आत राहील, असे अहवालात म्हटले आहे.

चालू आर्थिक वर्षापेक्षा एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात भारताच्या विकास दरात आणखी सुधारणा होणार आहे. चालू वर्षात भारतीय विकास दर ८.२ टक्के राहील, असा अंदाज जागतिक बँकेने वर्तविला आहे.

अमेरिकेची अर्थव्यवस्था जगातील सर्वांत मोठी आहे. गेल्या वर्षी अमेरिकेचा विकास दर २.८ टक्के होता. चालू आर्थिक वर्षात हा दर २.३ टक्के राहणार असून, पुढील वर्षी २ टक्क्यांवर स्थिरावणार असल्याचा अंदाज जागतिक बँकेने वर्तवला. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विदेशी कंपन्यांवर जबर कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे व्यापारयुद्ध भडकल्यास भारतीय अर्थव्यवस्थेवरही परिणाम होणार असल्याचे अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### सेवा, उत्पादन क्षेत्रात तेजी

केंद्र सरकारकडून व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीने धोरणे आखली जात आहेत. उद्योगवृद्धीसाठी सेवा सवलती जाहीर केल्या जात असल्याने उद्योग क्षेत्रात सकारात्मक घडामोडी सुरू आहे. सेवा क्षेत्रासह उत्पादन क्षेत्रात पुढील दोन वर्षांत मोठी उलाढाल होण्याची शक्यता या अहवालात वर्तवण्यात आली आहे. भारतीय उपखंडातील देशांचा विकास दर २०२५-२६ मध्ये ६.२ टक्के राहील, असा अंदाज आहे. ■

# गुन्ह्यांच्या तपासासाठी भारत-अमेरिकेत सामंजस्य करार

◆ **नली दिल्ली, १८ जानेवारी**

भारत आणि अमेरिका संबंध अधिक बळकट होण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे. दोन्ही देशांत सायबर आणि डिजिटल गुन्हेगारीबाबत माहितीच्या देवाणघेवाण संबंधी शनिवारी महत्त्वपूर्ण करार पार पडला, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिली.



गुन्हेगारी तपासात सायबर धोक्याची गुप्तचर यंत्रणा आणि डिजिटल फॉरेन्सिकवर सहकार्य आणि माहितीच्या देवाणघेवाणीसाठी भारत-अमेरिका एकत्र आले आहेत. त्यांनी सायबर गुन्ह्यांच्या तपासाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. सायबर गुन्ह्याच्या तपासाबाबत सामंजस्य करारावर अमेरिकेतील भारतीय राजदूत विनय मोहन क्वात्रा आणि अमेरिकेच्या गृह सुरक्षा उपसचिव क्रिस्टी कॅनेगालो यांनी डीसी येथे करारावर स्वाक्षरी केली, असे जयस्वाल यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# विप्रोचा नफा २४ टक्के वाढला

◆ **मुंबई, १८ जानेवारी**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या विप्रोच्या निव्वळ नफ्यात सरलेल्या ऑक्टोबर ते डिसेंबर तिमाहीत २४.४ टक्क्यांनी वाढ होऊन, तो ३,३५४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. कंपनीचा महसूल मात्र २२,३१९ कोटी रुपयांसह ०.१ टक्के नगण्य वाढीसह स्थिर राहिला.

या तिमाहीत माहिती-तंत्रज्ञान सेवांमधून मिळणारे उत्पन्न अनुक्रमे १.२ टक्क्यांनी घटून २.६३ अब्ज डॉलर्स झाले. मात्र, डॉलरच्या तुलनेत रुपयातील घसरणीमुळे तिमाहीगणिक ते ०.१ टक्क्यांनी वाढले. सरलेल्या तिमाहीत विप्रोने एकूण ३.५ अब्ज डॉलर्सचे कार्यादेश प्राप्त केले तसेच डिसेंबर तिमाहीत कंपनाची राखीव गंगाजळी ४,९३१ कोटी रुपयांवर पोहोचली. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तान, बांगलादेशने गुंतवणूकदारांचा विश्वास गमावला

पाकिस्तान, बांगलादेशने गुंतवणूकदारांचा विश्वास गमावला असून, या देशांची अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याची शक्यता कमी आहे. श्रीलंकेतील अर्थव्यवस्थेत वाढ होण्याची शक्यता आहे. आर्थिक अडचणींना तोंड देण्यासाठी स्वीकारलेल्या कठोर सुधारणांमुळे अर्थव्यवस्था उभारी घेईल. ■




## सुंदर डोळ्यांची माळा विकणारी ठरली महाकुंभात लोकप्रिय



**१४४ वर्षांनंतर** प्रयागराज शहरात महाकुंभ होत आहे. भव्य कार्यक्रम, विविध विधी, परंपरा आणि चालीरीतीसह हा महाकुंभ सुरू आहे. या महाकुंभात आपल्या वस्तू विकण्यासाठी दूरदूरवरून लोक येत आहेत. यातील अनेक व्हिडीओ, फोटो रोज सोशल मीडियावर येत आहेत. अनेक लोक यामुळे व्हायरल झाले आहेत. अशीच एक इंदूरमधील मोनालिसा नावाची १६ वर्षीय मुलगी महाकुंभात माळा विकण्यासाठी आली आहे. या मुलीच्या सौंदर्याची सगळीकडेच चर्चा आहे. त्यामुळे तिच्यावर अनेक रिल्स बनवले जात आहेत. या रीलवरही यूजर्स प्रेमाचा वर्षाव आहेत.

सावळा रंग, घारे आणि बोलके डोळे, सुंदर लांब केस आणि स्मित हास्य अशा आपल्या सौंदर्यामुळे या मुलीने सर्वांचे लक्ष आकर्षित केले आहे. खरं तर, ही मलगी महाकुंभात रुद्राक्ष माळा विकत आहे. पण, शांत स्वभाव आणि सुंदरतेमुळे ती देखील आता सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. ही सुंदर तरुणी महाकुंभात चर्चेचा विषय आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होणारी सुंदर तपकिरी डोळ्यांची मुलगी मध्यप्रदेशची आर्थिक राजधानी इंदूरची रहिवासी आहे. तिचे नाव मोनालिसा असल्याचे सांगितले आहे. ती विविध धार्मिक स्थळांवर रुद्राक्ष आणि मोत्यांचे मणी विकते. मोनालिसा हार विकण्याच्या एकमेव उद्देशाने महाकुंभाला आली, पण तिचे सौंदर्य इंटरनेटवर खळबळ उडवून देईल, याची तिला कल्पना नव्हती. ■

# कारलाच घर मानणारे ॲम्बेसेडर बाबा

**संगम** शहर महाकुंभ भाविकांच्या आगमनासाठी सज्ज आहे. या काळात कोट्यवधी भाविक संगमात स्नान करीत आहेत. एकामागून एक बाबा महाकुंभात पोहोचत आहेत. योगी आणि हठयोगींपासून ते बाबांपर्यंत असे लोक आहेत, ज्यांनी आपले घर सोडले, पण त्यांनी ॲम्बेसेडर कारला आपले घर बनवले. असेच एक बाबा म्हणजे महंत राजगिरी आहेत.

इंदूरहून महाकुंभाला आलेले महंत राजगिरी यांनी महाकुंभात झोपडी उभारली; परंतु त्यांच्यासोबत पार्क केलेली भगव्या रंगाची जुनी ॲम्बेसेडर कार सर्वाधिक चर्चेत आहे. लोक महंत राजगिरी यांना टार्झन बाबा किंवा ॲम्बेसेडर कारबाबा असेही म्हणतात.



या बाबाने ॲम्बेसेडर कारला आपले घर बनवले आहे. ही गाडी ३५-४० वर्षांपूर्वी महंत राजगिरी यांना दान करण्यात आली होती. तेव्हापासून ही गाडी बाबांचे निवासस्थान आहे. बाबा कुठेही जातात, ते याच गाडीने. या गाडीने त्यांच्यासाठी एका चालत्या आश्रमाचे रूप धारण केले आहे. यात त्यांना आध्यात्मिक शांती आणि समाधान मिळते. या जीवनशैलीमुळे ते सांसारिक समस्यांपासून दूर राहून स्वावलंबी आणि आत्मकेंद्रित झाले आहेत. महंत राजगिरी यांनी या गाडीतून अनेक ठिकाणी प्रवास केला आहे.

या ॲम्बेसेडर कारमध्ये काही खास वैशिष्ट्ये आहेत. बाबांनी आपल्या जुगाडाने या कारला जगण्यायोग्य बनवले आहे. बाहेरून एक पंखा बसवलेला आहे आणि आत पाईप्सना जोडलेला एक चेंबर आहे. बाबांनी ती एसी कार बनवली आहे. या कारच्या दोन्ही हेडलाईट्सवर डोळे बनवण्यात आले आहेत आणि कारचे छत एका मचानात रूपांतरित करण्यात आले आहे. हा एक हलणारा पलंग आहे. मी माझी गाडी जिथे पाहिजे तिथे पार्क करतो आणि छतावर झोपू शकतो.

त्यांचे स्वतःचे कुटुंब नाही. त्यांनी बालपणात घर सोडले. पण, या गाडीबद्दलची ओढ सोडू शकले नाही. ही ४० वर्षे जुनी ॲम्बेसेडर कार आयुष्यभर चालेल, असे बाबा राजगिरी म्हणतात. ■

# वय १२८, स्वामी सीवानंद बाबांच्या दर्शनासाठी गर्दी

**वय १२८...** पण तरुणांनाही लाजवेल असा उत्साह आणि आरोग्य... योगसाधनेत निपुण... अनेक आसने अतिशय लीलया करून दाखवतात. स्वामी सीवानंद बाबा असे त्यांचे नाव असून, गेल्या १०० वर्षांत त्यांनी एकही कुंभमेळा चुकवलेला नाही. प्रयागराज, नाशिक, उज्जैन आणि हरिद्वार येथे आयोजित कुंभमेळ्यात त्यांनी हजेरी लावली असून, त्यांच्या दर्शनासाठी दररोज शेकडो भाविक येत असल्याची माहिती त्यांचे शिष्य संजय सर्वराजन यांनी दिली. स्वामी सीवानंद यांच्या दिनचर्येबाबत माहिती देताना सर्वराजन म्हणाले, बाबा रोज पहाटे ३ वाजता उठून किमान तासभर योगा करतात. त्यातून ते नव्या पिढीला सुदृढ आरोग्याचा कानमंत्र देतात. ते दिवसातून एकदाच जेवतात. २१ मार्च २०२२ मध्ये राष्ट्रपती भवनात तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. स्वामी सीवानंद यांची जन्मतारीख ८ ऑगस्ट १८९६ अशी असून, ते सध्या १२८ वर्षांचे आहे. ते पोट भरेल इतकेच जेवतात, रात्री ९ वाजता झोपतात. योगा तसेच ध्यानसाधनेच्या जोरावर ते आजही निरोगी आहे. ■

# महाकुंभामुळे प्रयागराजच्या महसुलात वाढ

**महाकुंभामुळे** प्रयागराज शहराचा व्यवसाय दोन ते तीन पटीने वाढला आहे. हॉटेल उद्योगात सर्वांत मोठी तेजी दिसून आली. बहुतेक हॉटेल्समधील खोल्या बुक झालेल्या आहेत. एवढेच नाही, तर खाद्यपदार्थ, ब्लँकेट, लोकरीचे कपडे आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या विक्रीतही लक्षणीय वाढ झाली आहे. महाकुंभ १३ जानेवारी रोजी सुरू झाला असला तरी, २५ डिसेंबरपासून महाकुंभनगरीत लोकांची ये-जा वाढू लागली. जगाच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक व पर्यटक येथे येत आहेत. आतापर्यंत सात कोटींहून अधिक भाविकांनी पौष पौर्णिमा आणि मकर संक्रांतीच्या अमृतस्नानासह त्रिवेणी संगमात स्नान केले आहे. यामुळे शहरातील व्यवसाय आणि अर्थव्यवस्थाही प्रचंड वाढली. जवळजवळ सर्व प्रकारचे व्यवहार पूर्ण वेगाने सुरू आहेत. मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक हॉटेलमध्ये बुकिंग करीत आहेत. हॉटेल उद्योगाने ३० ते ४० टक्के नफा कमावला आहे. येत्या काळात ५० टक्क्यांपर्यंत नफा अपेक्षित आहे, असे प्रयागराज हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष हरजिंदरसिंग म्हणाले.दरम्यान, महाकुंभाच्या निमित्ताने २,५००-३,००० कोटी रुपयांचा व्यवसाय फक्त हॉटेल्स आणि तंबू शहरांमध्येच होऊ शकतो, असा कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राज्य अध्यक्ष महेंद्र गोयल यांचा अंदाज आहे. ■

# सहा कोटींचे सोने घालून महाकुंभात फिरणारे गोल्डन बाबा

**प्रयागराजच्या** संगम नगरीच्या महाकुंभात ऋषी-मुनींची अनेक अद्भुत रूपे पाहायला मिळत आहेत. यापैकी भक्तांचे लक्ष वेधून घेणारे बाबा म्हणजे गोल्डन बाबा आहेत. त्यांचे नाव एसके नारायण गिरीजी महाराज आहे. ते मूळचे केरळचे आहेत. सध्या ते दिल्लीत राहतात. निरंजनी आखाड्याशी संबंधित हे बाबा त्यांच्या अनोख्या शैली आणि सोन्याने सजवलेल्या व्यक्तिमत्त्वामुळे महाकुंभात चर्चेचा विषय ठरले आहेत.

मागील १५ वर्षांपासून ते अंगावर ६.८ किलो सोने घालून आहेत. बाबांच्या प्रत्येक रत्नाची चमक वेगळी असते. त्याच्या हातात सोन्याच्या अंगठ्या, बांगड्या, घड्याळे आणि सोन्याची काठी आहे. काठीला देवी-देवतांचे लॉकेट जोडले आहे, जे त्याच्या भक्तीचे प्रतीक आहे. हे सोने साधनेशी जोडलेले आहे आणि प्रत्येक रत्नात आध्यात्मिक शक्ती असते, असे बाबा म्हणतात.

६७ वर्षीय गोल्डन बाबांनी आखाड्याचे अध्यक्ष रवींद्र पुरी महाराज यांच्याकडून दीक्षा घेतली आणि निरंजनी आखाड्यात सामील झाले. बाबा शिक्षण क्षेत्रातही काम करतात. धर्म आणि शिक्षण दोन्ही एकत्र घेऊन समाजात सकारात्मक बदल आणता येतो, असे ते म्हणतात. जर मी पँट आणि शर्ट घातले असते, तर तुम्ही माझ्याशी बोलायला देखील आले नसते. देवाने मला सकारात्मक ऊर्जा पसरवण्याची संधी दिली आहे. माझ्या अंगावर ६.८ किलोपेक्षा जास्त सोन्याचे दागिने आहेत, असे ते म्हणाले.

बाबा जिथे जातातण तिथे त्यांच्यावर श्रद्धा असलेल्या लोकांची गर्दी जमते. भक्त त्यांना सुवर्ण बाबा म्हणतात. बाबा म्हणतात की, मला या गोष्टीवर कोणताही आक्षेप नाही. बाबांकडे ६ सोन्याचे लॉकेट आहेत, ज्यापासून सुमारे २० माळा बनवता येतात. त्याचा मोबाईलही सोन्याने मढवलेला आहे. ■



## चित्रपट वार्ता

### तुळजाभवानी मालिकेच्या १०० भागांचा टप्पा पूर्ण

**मुंबई** : कलर्स मराठी वाहिनीवर सध्या गाजत असलेल्या आई तुळजाभवानी या मालिकेने १०० भागांचा टप्पा पूर्ण केला आहे. या मालिकेने महाराष्ट्रातील लोकांच्या मनात अल्पावधीतच अढळ स्थान निर्माण केले. वाढता प्रतिसाद आणि प्रेक्षक मायबाप यांच्या आशीर्वादामुळे मलिकेने आपले १०० भाग यशस्वीरीत्या पूर्ण केले. महिषासूर आणि देवीचे चाललेले प्रदीर्घ काळ युद्ध नेमके कसे लढले गेले? दैत्यमाता दीतीची महत्त्वाकांक्षा नेमकी काय होती? ही आजवर माहीत नसलेली गोष्ट उलगडणार आहेच, पण देवीला पृथ्वीतलावर साथ देणारे महादेव आणि भक्तांच्या कल्याणात रममाण झालेली तुळजारूपातली पार्वती यांचे गोड गंमतीदार नातेही पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मालिकेत तुळजाभवानीची कधी ना पाहिलेली महागाथा प्रेक्षकांची मने जिंकत आहे. मालिकेचे गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून कोल्हापूरमध्ये चित्रीकरण सुरू आहे. ही मालिका रोज रात्री नऊ वाजता कलर्स मराठी वाहिनीवर लोकांच्या भेटीस येत आहे. ■



### 'मुक्काम पोस्ट देवाचे घर' ३१ जानेवारीला होणार प्रदर्शित

**मुंबई** : 'मुक्काम पोस्ट देवाचे घर' येत्या ३१ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मनीष कुमार जायस्वाल आणि मंगेश देसाई यांनी या चित्रपटाची प्रस्तुती के ली आहे. या चित्रपटातील 'सुंदर परीवानी' हे गाणे रसिकांच्या पसंतीस उतरले आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून एक हृदयस्पर्शी गोष्ट सांगण्यात आली. एका लहान मुलीच्या दृष्टीकोनातून तिच्या शोधाचा प्रवास उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गावात राहणाऱ्या या मुलीचे घर, घरातले वातावरण, शाळा, मैत्रीणींबरोबरचे तिचे खेळणे यातून तिच्या भावविश्वाचा वेध घेण्यात आला आहे. या चित्रपटातील गाण्याचे लेखन मंगेश कांगणे यांनी केले, तर स्वरा बनसोडे या गायिकेने हे गाणे गायले आहे. महेश कुमार जायसवाल, किर्ती जायसवाल हे या चित्रपटाचे निर्माते असून, त्यांची ही पहिलीच निर्मिती आहे. चित्रपटात मायरा वायकूळ, मंगेश देसाई, कल्याणी मुळे, प्रथमेश परब, रेशम श्रीवर्धन, उषा नाडकर्णी यांची भूमिका पाहायला मिळणार आहे. ■

### 'पाताल लोक २' सीरिजची धमाकेदार सुरुवात

**मुंबई** : बहुचर्चित 'पाताल लोक' वेब सीरिजचा नवा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सीरिजचा पहिला सीझन हिट ठरला होता, तेव्हापासून प्रेक्षकांना दुसऱ्या सीझनची प्रतीक्षा होती. 'पाताल लोक २' मध्ये ८ एपिसोड असून, प्रत्येक एपिसोड सुमारे ४० मिनिटांचा आहे. जयदीप अहलावत हाथीराम चौधरीच्या भूमिकेत पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसत आहे. हाथीराम चौधरी जमनापार पोलिस ठाण्यात निरीक्षक आहे, तर ईश्वाक सिंह म्हणजेच त्याचा ज्युनियर अन्सारी आता एसीपी बनला आहे. नागालँडमध्ये एका महत्त्वाच्या शिखर परिषदेपूर्वी एक खून होतो, हे प्रकरण अतिशय संवेदनशील आहे. एसीपी अन्सारी चौकशी करतो आणि हाथीराम चौधरीला सोबत घेऊन जातो. ■



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

दिनेश गुणे

# राजकारणातील संस्कृतिसंघर्ष!

स्वातंत्र्यपूर्वीच्या काही दशकांपासून व पुढे स्वातंत्र्यानंतरही या देशात राष्ट्रवाद या संकल्पनेविषयी संभ्रम माजविण्याचे प्रयोग सुरू असल्याचे दिसून येते. मुळात एकोणिसाव्या शतकापासून, विशेषत: औद्योगिक क्रांतीनंतर युरोपच्या इतिहासाला दिशा देणारी प्रेरणा म्हणून राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा जन्म झाला अशी एक मांडणी केली जाते. जसजशी भौतिक प्रगती होत गेली, विज्ञानावर आधारित विकासाची व्याप्ती विस्तारत गेली आणि सारे काही विज्ञानाच्या कसोटीवर पडताळून पाहण्याची प्रवृत्ती वाढत गेली, तसतशी जुन्या रूढी, परंपरा आणि मूल्येदेखील याच कसोटीवर तपासली जाऊ लागली आणि यापैकी अनेक रूढी समाजाच्या हिताश पोषक नाहीत असे स्पष्ट होऊ लागले. त्या रूढींचा त्याग करून नवी मूल्ये, नव्या निष्ठा निर्माण केल्या गेल्या, त्यामध्ये राष्ट्रवाद या संकल्पनेचा समावेश झाला असे म्हटले जाते. एका राजकीय दृष्टीने पाहिल्यास, राजकारणातील राष्ट्रवादाच्या विचाराची मुळे रुजण्याची प्रक्रिया अशी असू शकते. पण ही संकल्पना केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही, तर समाजव्यवस्थेचा आणि समूहांना एकत्र राखण्यासाठी ज्या काही अस्मितांची भावनिक जाणीव जागी ठेवावी लागते, त्यापैकी राष्ट्रवाद ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे भारतीय समाजव्यवस्थेकडे पाहताना दिसून येते. केवळ भौगोलिक सीमांमुळे विभागले गेलेले प्रदेश काही सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक सामायिकतेमुळे एकमेकांशी भावनिकदृष्ट्या जोडले जातात आणि त्यातून परस्परांविषयी बंधुत्वाची, आपुलकीची भावना निर्माण होते, हे राष्ट्रवादाच्या विचाराचेच संस्कार आहेत. त्यामुळेच, भारताच्या प्राचीन परंपरांमध्ये राष्ट्रवाद हाच सामाजिक ऐक्याचा धागा असल्याचे दिसून येते. महाभारतासारख्या प्राचीन काव्यातही, परस्परांशी संघर्ष करणारे कौरव आणि पांडव आपल्या सामायिक शत्रूशी लढण्याची वेळ येताच एकत्र होतात आणि 'वयम् पंचाधिक शतम्' असे सांगत ऐक्याचे दर्शन घडवितात, तेव्हा त्यामागची प्रेरणाही राष्ट्रवादाचीच असते आणि देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणतेही संकट हे देशावरील संकट असल्याची भावना आजही जागी राहते, त्यामागेही राष्ट्रवादाचीच भावना असते. थोडक्यात, राष्ट्रवादाच्या संकल्पनेतून भारताच्या इतिहासातील सामाजिक ऐक्याच्या जाणिवा अधोरेखित होत असतात. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी बांधला गेलेला जमिनीचा तुकडा नाही, तर तो जिवंत राष्ट्रपुरुष आहे, हिमालय हे त्याचे मस्तक आहे, काश्मीर हा मस्तकावरील मुकुट आहे, पंजाब आणि बंगाल हे त्या राष्ट्रपुरुषाचे दोन विशाल बाहू आहेत आणि पश्चिम व पूर्व घाट या त्याच्या मजबूत मांड्या आहेत. कन्याकुमारी हे त्याचे पाऊल आहे, असे वर्णन माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या एका कवितेतून केले आहे. राष्ट्र या संकल्पनेचा असा काव्यात्म आविष्कार समाजाच्या अस्मिता आणि भावनिक ऐक्यासाठी साह्यभूत असताना, राष्ट्र या संकल्पनेसच छेद देऊन सामाजिक ऐक्याचा एकमेव मजबूत धागा खिळखिळा करण्याचे काही प्रयत्न सध्याच्या राजकीय संघर्षातून सुरू असल्याचे विचित्र चित्र अलिकडे देशात दिसू लागल्याने, हजारो वर्षांपासूनचा सामाजिक ऐक्याचा धागा दुबळा होण्याची भीती बळावत चालली आहे. कदाचित यामुळेच, काँग्रेसचे सर्वेसर्वा नेता राहुल गांधी यांच्या राष्ट्रविचाराचे दीर्घकालीन परिणाम गांभीर्याने विचारात घेण्याची गरज निर्माण झाली असावी.

सुसंस्कृत राष्ट्रे म्हणून जगाच्या पाठीवर ज्या काही मोजक्या देशांची ओळख इतिहासकाळापासून निर्माण झालेली आहे, त्यापैकी भारत हा एक देश आहे. भारताच्या समाजव्यवस्थेला आणि सांस्कृतिक परंपरेला थेट कांस्ययुगपूर्व काळाची परंपरा लाभलेली आहे. अलिकडच्या काही शतकांत कांस्ययुगपूर्व संस्कृतीपैकी काही संस्कृती लयास चाललेल्या असून त्यांचे केवळ अवशेष पाहावयास मिळतात. पण भारत मात्र, आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे तितक्याच भावनिकतेने पालन करतो आणि त्यांचे जतन करतो. आजही सिंधू-सरस्वती संस्कृतीच्या किंवा त्याहूनही आधीच्या हजारो वर्षांपूर्वीचे रीतिरिवाजांचे आणि संस्कारांचे आचरण भारतात होते आणि मानवी संस्कृतीचा उदय झाला तेव्हापासून लिहिल्या, सांगितल्या गेलेल्या कालकथांचे आजही भारताच्या कानाकोपऱ्यात एकाच सामूहिक भावनेने पारायण केले जाते. हजारो वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या वेद-पुराणांचा उद्घोष आजही तितक्याच भक्तिभावाने देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात केला जातो. सुसंस्कृत राष्ट्राची सारी लक्षणे भारतामध्ये आजही रसरशीतपणे जिवंत दिसतात, त्यामागेही राष्ट्रवादाची पिढ्यानपिढ्यांपासून जपली गेलेली भावना हेच मूळ कारण आहे. राष्ट्र आणि सुसंस्कृत राष्ट्र यांमधील हा फरक भारतामध्ये पाहावयास मिळतो. इसवी सनाच्या सातव्या शतकात वेस्टफेलियाच्या शांततेतून राष्ट्र-राज्यपद्धती उदयास आली असे मानले जाते. राज्यपद्धती एखाद्या राष्ट्राच्या कारभारावर नियंत्रण ठेवते, राज्यकारभार चालविते व त्याचे व्यवस्थापन करते. सामान्यत:, धर्म, वंश, भाषा आणि संस्कृती यांचा संगम असलेला भूभाग म्हणजे राष्ट्र अशीही एक व्याख्या केली जाते. त्या दृष्टीने भारत हे एक संपूर्ण राष्ट्र तर आहेच, पण राष्ट्राची संस्कृती किंवा राष्ट्रीय सभ्यता ही त्याहूनही विशुद्ध अशी सामूहिक संकल्पना पिढ्यानपिढ्यांपासून भारतात अस्तित्वात आहे. शक्य तितक्या अधिकाधिक मानवीसमूहांचे सर्वात मोठे एकत्रीकरण आणि असा संपूर्ण मानवतापूर्ण समूह म्हणजे संस्कृती आणि असा समूह धारण करणारे ते राष्ट्र, अशी आपल्या राष्ट्रवादाची आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना भारतात केवळ अस्तित्वातच नव्हे, तर आचरणात आहे.

अशा संस्कृतिसंपन्न भारताकडे पाहण्याची दृष्टी स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय कारणांमुळे बदलत गेली. भारताला प्राचीन काळापासून एक जिवंत ओळख आहे याचा आज अनेकांना विसर पडत असून, स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर असलेल्या काहींचाही त्यामध्ये समावेश आहे. भारत हा



एक अखंड, सामाजिक, सांस्कृतिक आणि पारंपरिकदृष्ट्या एकमेकांस अतूटपणे जोडलेला प्रदेश असल्याच्या जाणिवा पुसट होत गेल्या आणि भारतीय उपखंडातील बराचसा भाग जिंकल्यानंतर ब्रिटिशांनी एकत्र जोडलेला प्रदेश अशी भारताची नवी ओळख करून दिली जाऊ लागली. आपल्या शिक्षण व्यवस्थेनेही त्यास प्रोत्साहन दिले आणि भारताच्या सांस्कृतिक, शैक्षणिक परंपरा नाकारण्याची व भारतीयांना आपल्या प्राचीन आचारविचारांपासून दूर करण्याच्या प्रयत्नांची स्पर्धा सुरू झाली. आधुनिक भारताचे नेतृत्व करण्यासाठी सुरू असलेल्या धडपडीत परंपरा पुसण्याच्या प्रयत्नांना वेग आला. आपण कोण होतो आणि कोण आहोत या जाणिवांचा देशाला विसर पडण्यास सुरुवात होण्याआधीच सामाजिक जाणिवांच्या स्मृती पुसून टाकणे, त्यांचे ग्रंथविश्व, संस्कृती, इतिहास नष्ट करणे हा अस्मिता संपविण्याचा पहिला मार्ग असतो, असे कोणा पाश्चिमात्य विचारवंताने म्हटले आहे. गेल्या काही दशकांपासून भारतात याचेच प्रयोग सुरू असल्याचे दिसू लागले आहे.

एका बाजूला अशा प्रयत्नांची चढाओढ सुरू असताना, आपण कोण आहोत याच्या जाणिवा जाग्या राखण्यासाठी पंतप्रधान मोदी यांचे प्रयत्न सुरू झाले. आपण कोण आहोत हे विसरता कामा नये, हा संदेश देणारे अनेक उपक्रम सरकारी स्तरावर सुरू झाले आणि बहुसंख्य भारतीयांवर त्याचा प्रभावही दिसू लागला आहे. संस्कृतिसंपन्न इतिहासाशी आपले नाते जडलेले आहे, या संस्कृतीचे आपण वारस आहोत आणि ती आजही रसरशीतपणे जिवंत आहे, विविधतेमध्ये एकता हे या समाजजीवनाचे जिवंत उदाहरण आहे, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. आपल्या संस्कृतीची पाळेमुळे रुजली आहेत, त्याबद्दल भारतीयांना अभिमानच वाटला पाहिजे, त्यातूनच आपला देश आत्मविश्वासाने भारलेला देश म्हणून उभा राहील, आत्मनिर्भर होईल हे ओळखून इतिहासाचे व संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न आता सुरू झाले असताना राष्ट्र या संकल्पनेचाच संकोच करण्याचे प्रयत्न सुरू व्हावेत हा केवळ योगायोग मानता येणार नाही.

सुमारे तीन वर्षांपूर्वी, २०२२ च्या मे महिन्यात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केंब्रिज विद्यापीठात भारताच्या राष्ट्रसंकल्पनेस धक्का दिला. भारत हे ब्रिटनसारखे राष्ट्र नसून युरोपियन युनियनसारखा राज्यांचा समूह आहे, या त्यांच्या विधानाने तेव्हाही खळबळ माजली होती. भारताला एक भौगोलिक ओळख आणि परंपरा असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मानतो, पण काँग्रेसचे तसे मत नाही. संघ आणि काँग्रेस यांमध्ये हाच फरक आहे, असे वक्तव्य त्यांनी त्या मुलाखतीत केले होते. त्यांच्या या भूमिकेकडे सहजपणे पाहता येणार नाही. आता तर ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते असताना त्यांनी या भूमिकेचाच पुनरुच्चार केला आहे. दिल्लीतील इंदिरा भवन या काँग्रेस मुख्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर गेल्या बुधवारी राहुल गांधी यांनी केलेल्या एका विधानामुळे त्याच वादाला आता नव्याने तोंड फुटले आहे. काँग्रेसचा संघर्ष हा राज्यांच्या विरोधात आहे, असे राहुल गांधी म्हणतात, तेव्हा ते भारताकडे एक संपूर्ण देश म्हणून पाहात नाहीत हे स्पष्ट होते. भारतीय राज्ये ही एक व्यापक संकल्पना आहे आणि त्यामध्ये राज्यघटनेनुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणांचा समावेश आहे. या सर्व यंत्रणांशी संघर्ष करण्याची काँग्रेसची भूमिका असेल, तर भारत हे एक राष्ट्र नाही, तर विविध राज्यांमधील चर्चेतून निर्माण झालेला एक करार आहे, ही काँग्रेसची विचारसरणी ठरते आणि अशी विचारसरणी म्हणजे भारताच्या सांस्कृतिक व सामाजिक ऐक्यावरील अविश्वासाचा पुरावा ठरतो. अशा अविश्वासामुळेच देशाच्या फाळणीसाठी काँग्रेस अनुकूल राहिली असा आक्षेप समाजातील अनेकांकडून आजही घेतला जातो. राहुल गांधी यांच्या ताज्या वक्तव्यांतूनही हाच अविश्वास डोकावताना दिसतो. भारतीय राज्यांविरुद्ध युद्ध पुकारण्याची इच्छा व्यक्त करणारे त्यांचे वक्तव्य साम्यवादी मानसिकतेशी साधर्म्य सांगणारे असून राहुल गांधी हे साम्यवादी किंवा नक्षल चळवळीच्या हातातील बाहुले झाले आहेत, असाही आक्षेप आता घेतला जाऊ लागला आहे. याच मानसिकतेतून लोकशाही व्यवस्थेवरही अविश्वास दाखविला गेला होता आणि श्रमिक वर्गाच्या हुकूमशाही निर्माण करण्याचा विचार मांडला गेला होता. लोकशाही व्यवस्थेतील एका जबाबदार पदावर असलेल्या राहुल गांधी यांनी जे वक्तव्य अलिकडेच देशात केले, तेच त्यांनी तीन वर्षांपूर्वी परदेशातही केले होते, हे या संदर्भात लक्षात घेणे गरजेचे आहे. ही विचारसरणी प्रचलित व्यवस्थेच्या व्यवस्थापनाशी सुसंगत नाही, उलट लेनिनच्या क्रांतिकारी विचारसरणीशी मिळतीजुळती आहे, असा आक्षेपही त्यामुळेच घेतला जात असून, राष्ट्रहिताशी विसंगत असलेली ही विचारसरणी देशात प्रस्थापित करण्यासाठी राहुल गांधी यांना वापरले जात असल्याची शंकाही आता व्यक्त होऊ लागली आहे. देशात जवळपास संपुष्टात येत असलेल्या नक्षलवादास राहुल गांधी यांच्या या भूमिकेमुळे संजीवनी मिळेल अशी भीतीही उघडपणे व्यक्त होऊ लागल्याने, राहुल गांधी यांच्या या विधानाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

एका बाजूला सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या पुनरुज्जीवनाचे शिस्तबद्ध प्रयत्न सरकारी स्तरावर सुरू आहेत, तर दुसरीकडे साम्यवादी चळवळीचे नेते चारू मुजुमदार यांनी साडेपाच दशकांपूर्वी नोंदविलेल्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय राज्य ही भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधांची रचना आहे आणि त्या राज्यांशी युद्ध करून भारतीय राज्यव्यवस्थेस उद्ध्वस्त करणे हे नक्षलवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे मत १९६६ मध्ये मुजुमदार यांनी त्यांच्या 'हिस्टॉरिक एट डॉक्युमेंट्स' या दस्तावेजात मांडले होते. राहुल गांधी यांच्या वक्तव्यात या विचारांचेच प्रतिबिंब असल्याची भावना आज व्यक्त होत असून, नक्षलवाद व साम्यवादाचा हात धरून लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्हे उभी करण्याचा हा डाव नाही ना, अशी शंकाही व्यक्त होऊ लागली आहे. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यामुळे सध्याच्या दोन राजकीय पक्षांमधील सांस्कृतिक संघर्षाचे रूप नेमके स्पष्ट होऊ लागले आहे. एका बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सांस्कृतिक परपरांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामाजिक प्रयत्नांस प्रोत्साहन देत आहेत, भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक वारशाची विदेशास ओळख करून देण्यासाठी पुढाकार घेत आहेत आणि दुसरीकडे राहुल गांधी यांच्या विचारातून भारतीय सांस्कृतिक एकतेच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्हे उमटवत आहेत. एका दृष्टीने देशात राजकीय संस्कृतिसंघर्षाची चिन्हे आता दिसू लागली असून, नव्या पाश्चिमात्य संस्कृतीचा संपूर्ण स्वीकार करावयाचा की संपन्न ऐतिहासिक वारसा कायमचा पुसून टाकायचा याचा निर्णय करण्याकरिता समाजाने आपली समज पणाला लावायची वेळ आली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### इंडिया आघाडीला घरघर

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीच्या बहुतेक सगळ्या घटक पक्षांनी आम आदमी पक्षाला आपला पाठिंबा जाहीर केल्यामुळे काँग्रेससह इंडिया आघाडीचे प्राण कंठाशी आले आहेत. समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि उबाठा गटाने आम आदमी पक्षाला थेट पाठिंबा देऊ केला आहे. अर्थात या पक्षांची दिल्लीमध्ये किती ताकद आहे हा प्रश्न असला तरीही हा निर्णय इंडिया आघाडीच्या नरडीला नख लावण्यासाठी तो पुरेसा आहे. राष्ट्रीय जनता दलाच्या तेजस्वी यादव यांच्यासह बहुतेक पक्षांनी इंडिया आघाडीची निर्मिती केवळ लोकसभा निवडणुकीपुरतीच होती आणि भाजप हटाव हाच आपला एकमेव उद्देशासाठी ती स्थापन झालेली होती असे स्पष्ट केले आहे. प्रादेशिक स्तरावर आपापल्या राज्यात हे पक्ष, आपापल्या सोईप्रमाणे स्वतंत्रपणे/एकत्रित निवडणुका लढवू शकतात, असे स्पष्ट केले आहे.

दिल्लीमध्ये एकही आमदार-खासदार नसलेला काँग्रेस पक्ष यंदा स्वतंत्रपणे पूर्ण ताकदीने उतरला आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये भाजपा, आम आदमी पक्ष आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. काँग्रेसनेत्यांनी अरविंद केजरीवालांवर जी विखारी टीका केली आहे ती बघता इंडिया आघाडीचे काही अस्तित्व आहे असे म्हणणे मतदारांना धोका देण्यासारखेच आहे. तरीही काही काँग्रेस नेते इंडिया आघाडी अजूनही अस्तित्वात असल्याचा जो डांगोरा पिटत आहे तो किती खोटा आहे हे घटक पक्षांच्या नेत्यांनी काँग्रेसवरच केलेल्या चिखलफेकीने सिद्ध झाले आहे.

केवळ २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी, भाजपाविरोधात एकत्र आलेल्या, पण एकमेकांबरोबर अन्य कोणत्याही बाबतीत एकमत नसलेल्या पक्षांनी, प्रादेशिक निवडणुकांमध्ये, काँग्रेसचा वरचष्मा सहन करायला इंडिया आघाडीच्या घटक पक्षांनी स्पष्टपणे नकार दिला आहे. राहुल गांधींच्या नावावर नाईलाज म्हणून लोकसभा विरोधी पक्षनेतेपदावर समझोता झालेला असला तरीही इंडिया आघाडीचे नेतेपद काँग्रेसला देण्यास एकही घटक पक्ष तयार नाही. अनेक निवडणुकांमध्ये एकटी काँग्रेस भाजपाबरोबर समोरासमोर टक्कर घ्यायला असमर्थ असल्याचे सिद्ध झाले. तेव्हा आता हेच प्रादेशिक पक्ष काँग्रेसलाच नखं दाखवायला तयार झाले आहेत. आपापल्या राज्यात प्रबळ असलेले प्रादेशिक पक्ष उघडपणे काँग्रेसला आव्हान देण्यास सिद्ध झाले आहेत.

प्रादेशिक स्तरावर एकमेकांना भ्रष्टाचारी/देशद्रोही म्हणणारे नेते राष्ट्रीय स्तरावर मात्र इंडिया आघाडीच्या नावाखाली एकत्र लढत असतील तर जनता त्यांना कशी मान्यता देईल? एखादा नेता राज्य निवडणुकीच्या वेळी भ्रष्टाचारी/देशद्रोही असणे आणि तोच लोकसभा निवडणुकीच्या वेळेस प्रामाणिक/देशभक्त होणे असा प्रचार करणे जनतेला मूर्ख समजण्यासारखेच आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी तर इंडिया आघाडीचे काहीही औचित्य राहिलेले नसल्याने ही आघाडी अधिकृतरीत्या बरखास्त करण्याची जी सूचना केली आहे, ती रास्तच आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### इस्रायल-हमास युद्धबंदी

अमेरिकनचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुचविल्याप्रमाणे आता, इस्रायल व हमास यांच्यात युद्धबंदी करार झाल्यामुळे पश्चिम आशियात शांतता नांदेल, अशी अपेक्षा करूया. इस्रायल जनतेच्या एका शांततेत चालू असलेल्या संगीतनृत्य कार्यक्रमात हमास अतिरेक्यांनी बेछूट गोळीबार करून अनेक निरपराध नागरिकांना ठार मारले, स्त्रियांवर अत्याचार केले व अनेकांना ओलिस ठेवले. इस्रायलने बदला घेण्यासाठी हमास व त्यांच्या मित्र संघटनांवर हल्ले केले. त्यात शहरे नष्ट झाली. यात दोन्हीकडले हजारो निरपराध लोक हकनाक मारले गेले. ही घटना मानवतेच्या दृष्टीने लज्जास्पद अशीच आहे. आशा आहे की आता हमास व इतर अतिरेकी हिंसक संघटना योग्य तो धडा शिकतील.

अमेरिकेत राष्ट्राध्यक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आता रशिया-युक्रेन संघर्षात सुद्धा मध्यस्थी करून सर्वत्र शांतता नांदेल याबद्दल प्रयत्नशील राहतील. अशाच प्रकारे बांगलादेश, पाकिस्तान या देशात हिंदू व इतर अल्पसंख्यकांवर होणारे अत्याचार व हिंसा थांबण्याबद्दलही प्रयत्न होतील याबद्दल आशावादी राहूया.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

### 'पनून काश्मीर'ची मागणी योग्य!

१९ जानेवारी १९९० या दिवशी मुस्लिमांनी मशिदींमधून 'हिंदूंनो, काश्मीरमधून चालते व्हा!' अशा घोषणा देत लाखो हिंदूंना काश्मीरमधून हाकलून लावले. एका रात्रीत काश्मीरमधील हजारो हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या आणि साडेचार लाख काश्मिरी हिंदू विस्थापित झाले. एका रात्रीतून हिंदूंना वडिलोपार्जित शेती, वास्तू सगळं काही जसेच्या तसे सोडून जावे लागले. त्यांच्या मनाला किती वेदना झाल्या असतील, याची कल्पनाही करवत नाही. दुर्दैव म्हणजे हे स्वतंत्र भारतात घडलं आणि आजही आपले बांधव आपल्याच देशात आश्रिताचे जीवन जगत आहेत.

मुसलमानांनी प्रचंड प्रमाणात हिंसाचार केला, सामूहिक हत्या केल्या, हिंदू स्त्रियांवर बलात्कार केला. या नरसंहारात पीडित हिंदूंच्या भूमी आणि संपत्ती त्यांनी बळकावली. तेव्हापासून आजपर्यंत काश्मिरी हिंदू त्यांची काश्मीरमधील मालमत्ता आणि सांस्कृतिक वारसा परत मिळवू शकलेले नाहीत. या क्रूर घटनेला ३५ वर्षे पूर्ण झाली, तरी काश्मिरी हिंदू अद्याप विस्थापितांचेच जीवन जगत आहेत. काश्मिरी हिंदूंना तेथे परतण्यासाठी सुरक्षित वातावरणाची आवश्यकता आहे. त्याकरिता शासनाने कठोर निर्णय घेणे अपेक्षित आहे. तसा थोडा प्रयत्न शासनाने कलम ३७० निष्प्रभ करून केला आहे. त्यानुसार आता देशातील हिंदू काश्मीरमध्ये जागा विकत घेऊन राहू शकणार आहेत. परंतु काश्मीर खोऱ्यात हिंदूंची सुरक्षितता हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ती मिळवण्यासाठी काश्मीरमधील जिहादी मानसिकता आणि जिहादी आतंकवाद दोन्ही नष्ट करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच काश्मिरी हिंदू करत असलेली 'पनून काश्मीर'ची मागणी देखील योग्य आहे. त्यामुळे तेथील हिंदूंचे निश्चितपणे संरक्षण आणि त्यांचा विकास होऊ शकेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### राष्ट्रीय मतदार दिन आणि आधुनिक तंत्रज्ञान

आपल्याकडे वेगवेगळ्या स्तरावर नेहमीच निवडणुका होत असतात. अगदी पंचवार्षिक निवडणुकांना एक वर्ष पूर्ण होण्याआधीच पुढील निवडणुकांचे पडघम वाजू लागतात. बँका, पतसंस्था, सोसायट्या, स्थानिक स्वराज्य संस्था याबरोबरच विद्यापीठासारख्या उच्च शैक्षणिक संस्थांमध्येही वेगवेगळ्या अधिकार मंडळांच्या निवडणुका होत असतात. त्यामुळे सातत्याने या ना त्या निवडणुकीच्या धामधुमीत सर्वच राजकीय पक्ष, समाजातील सर्वच घटक व्यस्त राहतात. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय काम आहे आणि ते एक पवित्र कर्तव्य असल्यामुळे अधिकाधिक तरुण मतदारांना राजकीय प्रक्रियेत भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकार दरवर्षी २५ जानेवारीला 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा करते. २५ जानेवारी हा भारतीय निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस होता. दरवर्षी, राष्ट्रीय मतदार दिन नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत साजरा केला जातो.

निवडणूक हा लोकशाहीचा गाभा असून भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. प्रत्येक नागरिकाला मतदानाचे मूलभूत अधिकार आहेत. देशाच्या नेतृत्वात, सामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यास, बदल घडवून आणण्यास सक्षम वाटतो असा नेता निवडण्याचा प्रत्येक मतदाराला अधिकार आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत प्रभावी सहभाग वाढवणे आवश्यक आहे. यापूर्वी मतदारांचे पात्रता वय २१ वर्षे होते; परंतु १९८८ मध्ये ते कमी करून १८ वर्षे केले गेले. भारतीय




तरुणांची राजकीय जागरूकता पातळी प्रौढांपेक्षा खूपच जास्त आहे आणि येत्या काळात ते देशातील राजकीय बदलांमध्ये सर्वांत मोठे योगदान देतील. भारत हा युवकांचा देश आहे व त्यामुळे युवा पिढीशी सहभागासाठी संवाद अत्यावश्यक आहे आणि इथेच आधुनिक तंत्रज्ञान आपल्याला मदत करू शकते. आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञान आता प्रत्येक मतदाराच्या हाती आलं आहे. त्यामुळे सभा फोनवर बसल्याबसल्या ऐकता येतात. त्यासाठी सभास्थानी जायची गरज नाही. यापुढची पायरी गाठण्याची वेळ आता आली आहे. मतदान केंद्रात न जाता मोबाईल अथवा संगणकावर ऑनलाईन व्होटिंग निवडणूक आयोगाने एक पर्याय म्हणून स्वीकारला पाहिजे. अनेक मतदारांना प्रत्यक्ष मतदान अनेक सबळ कारणाने इच्छा असूनही करता येत नाही. अशा मतदारांना हा पर्याय मिळेल व त्यामुळे मतदानाची टक्केवारी नक्कीच वाढेल. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अस्टोनिया, फिनलॅण्ड, फ्रान्स आणि नॉर्वे या देशांत याचे प्रयोग केले आहेत. व्होटर हेल्पलाईन ॲपदेखील सुरू करण्यात आले आहे. मतदार यादीतील मतदारांच्या नावे पडताळणीसाठी मतदारांना ते वापरता येते. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी मतदारांसाठी निवडणूक छायाचित्र ओळखपत्रांचा वापर केल्याने अनेक गैरप्रकार टळत आहेत. मतदार संघातील डी-डुप्लिकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून मतदारयादीतील एकाच नावाच्या विविध व्यक्तींची ओळखपत्राद्वारे खातरजमा केली जाते. पूर्वी अनेक मतदारसंघात समान नाव असल्यामुळे गैरप्रकार होत असत. मुख्यालयाशी सीसीटीव्ही जोडून रेकॉर्ड करणे, ड्रोन कॅमेरे मतदान केंद्रावर टेहळणीसाठी वापरावे व त्या माहितीचे वेब अनलिटिकसद्वारे पृथक्करण करून फक्त अपवादात्मक विशेष परिस्थितीचे नियंत्रण करता येणे शक्य झाले आहे.

निवडणुकादरम्यान नागरिकांना आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाचा अहवाल देण्यासाठी सिव्हिजिल हे एक अभिनव मोबाईल ॲप आहे. कुठलाही नागरिक ही सेवा वापरू शकतो. या ॲपचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्थान ग्रहणासह थेट फोटो/व्हिडीओला अनुमती देते. कुठल्याही प्रकारची आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याची घटना पाहिल्यानंतर काही मिनिटांतच आयोगाला कळू शकते व त्यावर गरज पडल्यास सुधारात्मक कृती करता येऊ शकते.

आपल्याकडे २०१४ ला झालेल्या निवडणूकीपासून सोशल मीडियाचे महत्त्व सर्वच राजकीय व्यक्ती आणि पक्षाच्या ध्यानात आल्याने या संवाद माध्यमांचा वापर खूप वाढला आहे. सोशल मीडिया सामाजिक आहे आणि त्यानुसारच त्याची शक्ती वापरली जावी. युवा मतदारांची वाढलेली जाणीव, जात, धर्म आणि वक्तृत्व यांच्या पलीकडे जाण्याची शक्यता आहे. अजून एक क्षेत्र तितकेच महत्त्वाचे आहे ते म्हणजे आरोग्यसेवा आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न. हे असे क्षेत्र आहे जेथे मला वाटते की तरुण लोक अधिक कृतीसाठी सरकारकडे पाहत आहेत.

**डॉ. चंद्रकांत कुलकर्णी**/९९६०९६७१३२

●● ●●

### मोटारोला-अदानी

मोटारोला या अमेरिकन कंपनीची स्थापना १९२८ मध्ये झाली. १९७३ मध्ये कंपनीने जगातील पहिला हातात घेण्याजोगा मोबाईल फोन बनविला व लवकरच जगावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. १९९८ मध्ये नोकियाने मोटारोलाला मागे टाकून प्रथम क्रमांक मिळविला.

मोटारोलाने पेजर बनविला व १९७८ पर्यंत तो जगात अग्रेसर होता-पण जपानमध्ये नाही. जपानमध्ये निप्पोन टेलिग्राफ आणि टेलिफोन या सरकारी संस्थेचा एकाधिकार होता व तिने जपानी कंपन्यांना गैरजपानी माल आयात करण्यास मज्जाव केला. मोटारोलाला तर तो प्रचंड जपानी बाजार खणावत होता पण अनेक प्रयत्न करूनही जपानपुढे डाळ शिजत नव्हती. वास्तविक मोटारोला तांत्रिकदृष्ट्या जपानी उत्पादनांपेक्षा सरस होता, पण जपानी लोकांचे व सरकारचे स्वदेशीचे प्रेम आड येत होते. मोटारोलाने दहा वर्ष सतत संघर्ष केला, सरकारी स्तरावर हा प्रश्न नेला. अमेरिकन सरकारने जपान सरकारशी उच्च पातळीवर चर्चा केल्या परंतु जपान अडेल राहिले. त्या काळात गृहमंत्री जॉर्ज शुल्ट्झ यांनी वैयक्तिकरीत्या मध्यस्थी केली व थोडे का होईना यश मिळाले. त्या चर्चेदरम्यान शुल्ट्झ सतत मोटारोलाच्या जपान एक्सपर्टशी संपर्कात राहात होते. १९८७ मध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे जपानच्या काही भागात मोटारोलाच्या पेजर विक्रीला परवानगी मिळाली.

१९९३ मध्ये अमेरिकेचा जपानशी व्यापारी तोटा ६० बिलियन डॉलरवर गेला. जुलै १९९३ मध्ये अध्यक्ष क्लिंटनने जपानचा दौरा केला, बोलणी फिसकटली. मग संतापून फेब्रुवारी १९९४ मध्ये क्लिंटनने जपानवर व्यापारी निर्बंध लादण्याची धमकी दिली-मोटारोलाला एंट्री दिली नाही तर. हा मात्र जमालगोटा ठरला व नंतर जपान हळूहळू वठणीवर आले. मुद्दा हा की एका कंपनीसाठी सरकारने एवढे टोकाचे पाऊल उचलले. आता जरा आपल्या अदानी -अंबानींकडे पाहा. अदानी-अंबानीच नव्हे तर सध्या भारतातल्या बहुतांश बड्या कंपन्यांना मोठे केले ते काँग्रेसनेच, कारण स्वातंत्र्यानंतर अनेक वर्ष काँग्रेसचीच सत्ता होती. विदेशी कंपन्यांना मोठमोठे ठेके देण्यापेक्षा आपल्याच भारतीय कंपन्यांना दिले तर त्यांना अनुभव मिळेल व त्या अधिक मोठ्या होऊन त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळेल, असा विचार जर सरकारने केला तर त्यात काय चुकले?

असे बघा एका कंपनीचा - मोटारोलाचा - अधिक विस्तार व्हावा, त्या कंपनीला जपानचा बाजार खुला करून द्यावा या उद्देशाने अमेरिका सरकारी स्तरावर प्रयत्न करते व जेव्हा ध्येय साध्य होत नाही हे लक्षात आले तेव्हा साक्षात अमेरिकन अध्यक्ष त्यासाठी आर्थिक निर्बंध लादण्याचे टोकाचे पाऊल उचलण्याची धमकी देतो. जगातील सर्व विकसित राष्ट्रांची सरकारे आपल्या कंपन्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहतात कारण त्यात त्या राष्ट्रांचा फायदा व सन्मान असतो. लोकांची सरकारकडून हीच अपेक्षा असते. तर आपल्याकडे आपले करंटे भारतीय विरोधी पक्ष मात्र अदानी-अंबानीविरुद्ध आणि सरकारविरुद्ध (खरे तर मोदींविरोधात) त्यासाठी बोंबा मारतात. याला राष्ट्रविरोधी म्हणतात.

**सुभाष कौशिककर**/९१६८८८०१५१

●● ●●

### ताकाला जाऊन भांडे लपविणे

उबाठा नेते आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर तिसऱ्यांदा भेट घेतली असे वाचण्यात आले. प्रथम उबाठा पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत नागपूर हिवाळी अधिवेशनात एकत्रितपणे फडणवीसांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी आपण लोकांसाठी विरोधक आणि सत्ताधारी यांनी एकत्रितपणे काम करायला हवे, अशी भूमिका घेऊन भेट घेतली असे बोलले होते. त्यानंतर आता परत एकदा तिसऱ्यांदा त्यांनी मुंबईतील विविध भागांतील समस्यांसाठी ही भेट घेतली. या वेळी मोकळ्या मनाने इथे आलो आणि मुंबईतील समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असे बोलून दाखविले.

या सगळ्यांवर शिवसेना पक्ष प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जी प्रतिक्रिया वाचण्यात आली, ''एवढ्या लवकर रंग बदलतील असं वाटलं नव्हतं.'' वस्तुस्थितीला धरून आणि त्यांची कानउघडणारी आहे. गेली अडीच वर्षे आदित्य ठाकरे घटनात्मक पदावर असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल त्यांच्या प्रणीत सरकारला आणि त्या सोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने वाट्टेल ते बोलत असत. आदित्य ठाकरे यांच्या प्रतिक्रिया सर्वसामान्य माणसाला ऐकवत सुद्धा नसत. त्यामध्ये सातत्याने घटनाबाह्य सरकार, घटनाबाहय मुख्यमंत्री, पन्नास खोके एकदम ओके तर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना फडतूस म्हणणे, एक तर तू तरी राहशील नाही तर मी तरी राहील अशी टोकाची भाषा काढली होती.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे आज कोणतेच स्थायी घटनात्मक पद नाही. सध्या विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेतेपद उद्धव ठाकरेंकडे असले तरी काँग्रेसचे सर्वाधिक विधान परिषद सदस्य असल्याने त्यांनी विधान परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी त्यावर दावा ठोकण्याची भाषा सुरू केली आहे. विधानसभेतील मुख्य विरोधी पक्ष पद सध्या रिक्त असून नियमांनुसार आवश्यक संख्या बळ निवडणुकीत महाविकास आघाडीमधील कोणत्याच घटक पक्षाकडे नसल्याने त्यातल्या त्यात शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे सगळ्यात जास्त म्हणजे २० आमदार निवडून आले असल्याने त्यांनी त्यावर आपला दावा ठोकण्याची भाषा सुरू केली. पण हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा विधानसभा अध्यक्ष आपला विशेष अधिकार वापरतील. मध्यंतरी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले होते की विरोधी पक्षनेते पदासाठी कोणत्याही पक्षाकडून अद्याप अर्ज आला नाही.

आपण लोकांसाठी विरोधक आणि सत्ताधारी यांनी एकत्रितपणे काम करायला हवे, असे उद्धव ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे कितीही दावा करत असले तरी त्यांची धडपड कशासाठी सुरू आहे ते आता लपून राहिले नाही. याला ताकाला जाऊन भांडे लपविणें असे म्हणतात.

**अविनाश देशपांडे**/पुणे

●● ●●

### फातिमा शेखच्या उदात्तीकरणाचे कारण काय?

आपल्या देशात अनेक वर्षांपासून काही स्वयंघोषित विद्वान मंडळीच्या टोळ्या चुकीच्या गोष्टी, खोटे नॅरेटिव्ह किंवा चुकीच्या ऐतिहासिक घटना समाजात प्रस्थापित करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश अर्थात ख्रिश्चनांनी आणि देश स्वतंत्र झाल्यानंतर देशातील काही तथाकथित लेखक डावे विचारवंत, कम्युनिस्ट, छुपे नक्षल समर्थक, ढोंगी पुरोगामी यांनी देशात खोटा इतिहास प्रस्थापित करण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. अकबर ग्रेट, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रतीक औरंगजेब, टिपू सुलतान यांचे आक्रमक मुस्लिम नव्हे तर मोगल बादशहा असे उदात्तीकरण करून इतिहासाचे विकृतीकरण केलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवकालीन इतिहासाची मोडतोड, संभाजी राजेंची हत्या व गुढीपाडव्याचा संबंध संत तुकाराम महाराज यांची हत्या, शनिवारवाडा पेशवाईमधील अमानुष प्रथा व म .फुले यांचा छळ, आर्य बाहेरून आले असे अनेक विषय समाजात संभ्रम निर्माण करण्यासाठी किंवा सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठी पेरले गेले व प्रस्थापित केले गेले आहेत. आता फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र उभे करून समाजात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. फातिमा शेख यांचे शिक्षणतज्ञ व समाज सुधारक असे खोटे कथानक व धादांत खोटी प्रतिमा उभी करण्यात येत असून म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या त्या सहकारी होत्या असे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न सुद्धा सुरू आहे.

महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी समाज सुधारक सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांचे स्मरण करताना हळूच फातिमा शेख यांचे काल्पनिक कथानक व पात्र समाजाच्या समोर उभे करण्यात आले होते. आता तर फातिमा शेख यांना सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये बसविण्याचा घाट घातला जात आहे तसेच समाजात संभ्रम निर्माण करण्याचे फार मोठे षडयंत्र रचले जात आहे. कर्नाटक सरकारने फातिमा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार सुद्धा जाहीर केला आहे. फातिमा शेख यांचा कोणताही समकालीन ऐतिहासिक पुरावा नाही किंवा म. फुले यांच्या साहित्यामध्ये नोंद नाही तरी सुद्धा ९ जानेवारीला फातिमा शेख यांची काल्पनिक जयंती साजरी करण्याचा घाट घालून कॉलेजमध्ये, सेमिनार, परिसंवाद व मोठे उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

सावित्रीबाई फुले यांचे पुण्यस्मरण करताना काल्पनिक फातिमा का उभी केली जाते याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

**अशोक राणे**/९४२३६५८३८५

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# श्रीकांत वेदपाठक यांना आदर्श कलाध्यापक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाचे ग्रामीण अध्यक्ष व वाखरी आश्रमशाळेचे कलाशिक्षक श्रीकांत वेदपाठक यांना शहादा (जि. नंदुरबार) येथे राज्यस्तरीय कलाशिक्षण परिषदेमध्ये आदर्श कलाध्यापक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, पुणे व नंदुरबार जिल्हा कलाध्यापक संघाची ४३ वी कला शिक्षण परिषद शहादा येथे झाली. यावेळी पंढरपूर येथील वाखरी आश्रम शाळेतील कलाध्यापक श्रीकांत प्रभाकर वेदपाठक यांच्या कला क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल दखल घेऊन त्यांना यंदाच्या राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी राज्याध्यक्ष पी. आर. पाटील, माजी सरचिटणीस कादरी, राज्याध्यक्ष नरेंद्र बारई, सरचिटणीस दिगंबर बेंडाळे, राज्य कोषाध्यक्ष विजयसिंह ठाकूर, माजी राज्य सचिव विठ्ठल बहिरे, पुणे विभागीय सहकार्यवाह दीपक कन्ना, जिल्हाध्यक्ष गणेश तडका, जिल्हा कलाध्यापक संघाचे सचिव मुकुंद मोरे, कार्याध्यक्ष देवेंद्र निंबर्गीकर, सुरेश मल्लाव, प्रकाश गुजेंटी, शशिकांत कनकी यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



## मि. इंडिया बॉडी बिल्डिंग : लोणारला रौप्य

**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचा खेळाडू पंचाक्षरी लोणार याने बेळगाव येथील मि. इंडिया स्पर्धेत ७० कि गटात रौप्य पदक प्राप्त केले. लोणार मॅक्सिमम् जिमचा खेळाडू असून त्याला अन्वर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संघटनेचे अध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस विशाल गायकवाड संघटनेचे कार्याध्यक्ष अनिल जाधव, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, संजय हिरेमठ, शासिकांत अक्कलवाडे, अविनाश गंजे, सहसचिव आतिक नदाफ यांनी अभिनंदन केले.

## बार्शीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

शहरातील मध्यवस्तीमध्ये असलेल्या चहा कॅफेमध्ये भरदिवसा अल्पवयीन मुलीला तिच्या आईच्या मोबाईलवर फोन करुन चहा पिण्याच्या निमित्ताने बोलावून घेऊन एकाने विनयभंग केला असून बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अजिंक्य व्हनकळस (रा. बार्शी) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित तरुणाचे नाव आहे.

पीडित मुलीने आई-वडिलांसमवेत येऊन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. ही घटना बुधवारी दुपारी तीन वाजता घडली. पीडित अल्पवयीन मुलीला चहाच्या निमित्ताने तिच्या आईच्या मोबाईलवर फोन करुन कॅफेमध्ये बोलावून घेतले. मुलीसोबत फोनद्वारे जवळीक साधत विनयभंग केला. पोलीस ठाण्यासमोर रात्री साडेआठ वाजेपर्यंत मोठी गर्दी जमली होती. बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक सोनम जगताप यांनी अल्पवयीन मुलीकडून सविस्तर माहिती घेत याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निधन वार्ता


### कलावती घाटे

**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

एन. जी. मिल चाळ येथील कलावती भालचंद्र घाटे (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील अधिकारी व अवंतीनगरमधील गणेश विठ्ठल मंदिरातील भजनी मंडळाचे प्रमुख जगदीश घाटे यांच्या त्या मातोश्री होत.

### संभाजी पवार


**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**



कसबा पेठेतील पवार गल्लीत राहणारे संभाजी भगवान पवार यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### धनप्पा मिटकरी

**पंढरपूर, दि. १८ जानेवारी-**



तालुक्यातील ईश्वर वठार येथील ज्येष्ठ नागरिक धनप्पा अर्जुन मिटकरी (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ईश्वरवठार येथील भूवैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वाईच्या तहसीलदार सोनाली मिटकरी यांचे ते वडील होत.

# महापालिकेच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

- ज्येष्ठ अभ्यासक डॉ. पुजारी यांच्या हस्ते सोमवारी उद्घाटन
- महापालिका ते डॉ. कोटणीस स्मारकपर्यंत काढणार ग्रंथ दिंडी
- व्याख्यान, चर्चासत्र, काव्यवाचन, गीत रामायणासह विविध कार्यक्रमांची पर्वणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघाच्या सहकार्याने २० जानेवारी ते ३० जानेवारीपर्यंत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

यामध्ये काव्य वाचन, व्याख्यान, मुलाखत, पुस्तक परिचय, गीत रामायण, नाटक, बालनाट्य, लेखन -वाचन-हस्ताक्षर कार्यशाळा, चर्चा सत्र आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध कार्यक्रमांची पर्वणी या निमित्ताने मिळणार आहे. सोमवार दि. २० जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक येथे संत साहित्याचे जेष्ठ अभ्यासक डॉ. अप्पासाहेब पुजारी यांच्या हस्ते या पंधरवड्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. उदघाटनापूर्वी सोलापूर महानगरपालिकेपासून ते डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे.

मंगळवार दि. २१ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता महापालिकेतील इंद्रभुवन इमारतीच्या मागील बाजूस काव्यवाचन कार्यक्रम होणार आहे. यामध्ये निमंत्रित कवी आपल्या काव्यरचना सादर करणार आहेत. बुधवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात मराठी भाषा-अभिजात दर्जा आणि आपण या विषयावर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे तसेच




मराठी भाषा आणि पत्रकारिता या विषयावर ज्येष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे यांचे व्याख्यान होणार आहे. गुरुवार दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांची मुलाखत होणार आहेत. शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी पुस्तक परिचय या कार्यक्रमात मान्यवर लेखक सहभागी होणार आहेत. शनिवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे गीत रामायण हा कार्यक्रम होणार आहे. सोमवार दि. २७ व २८ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात नाटक सादर कगुरुवार दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे लेखन-वाचन-हस्ताक्षर कार्यशाळा होणार आहे. त्यानंतर गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता मराठी भाषा व पत्रकारिता या विषयावर चर्चासत्राने या पंधरवड्याचा समारोप करण्यात येणार आहे. या चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी, प्रशांत जोशी, नितीन फलटणकर, आकाशवाणीचे सुजित बनसोडे, किरण बनसोडे आदी मान्यवर पत्रकारांचा सहभाग राहणार आहेत. या सर्व कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

यावेळी नियोजन बैठकीत पद्माकर कुलकर्णी (अध्यक्ष, मसाप जुळे सोलापूर), विजय साळुंखे (अध्यक्ष, अ.भा. मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखा), डॉ. शिवाजी शिंदे (सहकुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ), प्रशांत बडवे (कार्याध्यक्ष, मसाप दक्षिण सोलापूर), प्रशांत जोशी, किरण बनसोडे, गिरीश दुनाखे (प्रमुख कार्यवाह, मसाप जुळे सोलापूर), प्रा. डॉ. नानासाहेब गव्हाणे, प्रा. अमोगसिद्ध चेंडके, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ब्रह्मदेवदादा माने तंत्रनिकेतनमध्ये राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निक येथे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, संस्थेच्या सचिवा जयश्री माने व संकुलाचे संचालक प्रा.राहुल माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या प्रदर्शनात सोलापूर, लातूर, धाराशिव व इतर जिल्ह्यातून एकूण २०० शाळांनी सहभाग नोंदविला. एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृती 'मॉडेल' तसेच 'पोस्टर'च्या माध्यमातून सादर केल्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर सायन्स सेंटर चे सीईओ डॉ. राहुल दास, प्राचार्य डॉ. श्रीकांत जोशी, संकुल संचालक प्रा. राहुल माने, समन्वयक प्रा. शशिकांत फुलारी, प्रा.पवन माने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जोशी यांनी यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने यांनी आपल्या शालेय जीवनातील विज्ञान प्रदर्शनाचा अनुभव विद्यार्थ्यांना सांगितला व सध्याच्या युगात विज्ञान व तंत्रज्ञान याचे महत्त्व व विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रात्यक्षिक ज्ञान कसे महत्त्वाचे आहे ते स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या निरोप समारंभाला संस्थेच्या सचिवा जयश्री माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, संकुल संचालक प्रा. राहुल माने, प्राचार्य डॉ. जोशी या मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. आठवी, नववी, व दहावी या गटात ५५ हजारांची बक्षिसे वितरित करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. नितीन जाधव, तर आभार प्रा. शशिकांत फुलारी यांनी मानले. तसेच प्रा. प्रतिभा माने, प्रा.श्रीमती ख्याडे, प्रा. घोरपडे, प्रा. इजगार, प्रा.शेख, प्रा. बिराजदार, प्रा.चडचण, प्रा. ढेपे, प्रा.सप्ताश्व, प्रा.चौधरी या तज्ञ प्राध्यापकांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. घुले, प्रा.कंदले, प्रा.सोमा,प्रा.खंडागळे, प्रा.तुपे, प्रा.गवळी, प्रा.सोमा, प्रा.पवार, प्रा.चौगुले, कबाडे व प्रा. ढगारे यांनी परिश्रम घेतले.




### बक्षीस पात्र विद्यार्थी अन् शाळा

- **इयत्ता आठवी मॉडेलमध्ये :** प्रथम - प्रज्ञा मोटे (एस. बी. बी. एन. सोलापूर), द्वितीय- सोनी मतसुरे (नॅशनल उर्दू हायस्कूल), तृतीय- जुनेद शेख (हर्षवर्धन स्कूल)
- **इयत्ता नववी :** निखिल पवार (माध्यमिक आश्रम प्रशाला), आदित्य कांबळे (माध्यमिक आश्रम प्रशाला), अर्जुन कोळी (सिद्धेश्वर प्रशाला),
- **इयत्ता दहावी :** इरफान अमीन जमादार (कुमठे प्रशाला), उमर तांबोळी (बीटला प्रशाला), आरती लंगडे (महात्मा गांधी मेमोरियल स्कूल)
- **इयत्ता आठवी पोस्टरमध्ये :** संस्कृती घाटगे (लिटल हर्ट इंग्लिश स्कूल), गौतमी ओरकोंडा (नीलकंठेश्वर प्रशाला), जानवी गणपा (बीटला प्रशाला)
- **इयत्ता नववी पोस्टरमध्ये :** तेजस कोठे (निर्मलाताई प्रशाला), सत्यजित चाटेकर (निर्मलाताई प्रशाला), समर्थ एईवळे (के एस एम बी प्रशाला)
- **इयत्ता दहावी पोस्टरमध्ये :** पायल कसबे (बाळकृष्ण विद्यालय नंदेश्वर), प्रगती पवार (बाळकृष्ण विद्यालय), ईश्वरी घोडखिंडे (लोकनेते प्रशाला)

# सेवानिवृत्त शिक्षिकेवर लग्नाच्या आमिषाने अत्याचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सोशल मीडियावरून झालेल्या ओळखीतून तरुणाने सेवानिवृत्त शिक्षिकेला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला. तसेच नोकरी लागणार असल्याचे सांगून लाखो रुपये लाटून फसवणूक केली. हा प्रकार २०१९ पासून सुरू होता. याबाबत सेवानिवृत्त शिक्षिकेने दिलेल्या फिर्यादीवरून सुमित चंद्रकांत काळे (रा. वैष्णवी नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे.

यातील आरोपी आणि शिक्षिका यांची २०१९ मध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली. यानंतर त्यांची ओळख वाढल्याने ते एकमेकांना विविध ठिकाणी भेटत होते. यादरम्यान आरोपीने पीडितेचा विश्वास संपादन करून लग्न करणार असल्याचे सांगितले. यानंतर आरोपीने पीडितेवर विविध ठिकाणी नेऊन अत्याचार केले. या काळात आरोपी सुमित याने नोकरी लागणार असल्याचे सांगून पीडितेकडून सुमारे अडीच लाखाहून अधिक रोकड घेतली. यादरम्यान पीडितेने आरोपीकडे लग्नाबाबत विचारणा केली असता, उडवाउडवीचे उत्तरे देऊन पीडिता तसेच त्याच्या कुटुंबातील इतरांना जीवे मारण्याची धमकी दिली. या गुन्ह्याचा तपास पोसई कांबळे करत आहेत.

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय**
**अक्कलकोट यांच्या न्यायालयात ४१३२१६**
**संकलन अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email-tahakkalkotgmail.com

जा.क्र.२०२५ अभिलेखा/कावि/२०/२०२५ दि.१७/०१/२०२१

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्रीम. प्रियंका शंकर मदने**
रा. बादोले बु. ता. अक्कलकोट --अर्जदार

**विरुध्द**

जन्ना मृत्यू नौवणी, कार्यालय
ग्रामपंचायत, बादोले बु. ता. अक्कलकोट -- सामनवोला

ज्याअर्थी याती प्रियंका शंकर मदने रा. बादोले बु. ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी तेजस्वी शंकर मदने हिचा जन्म दि. ०५/०१/२०२१ रोजी मौजे बादोले बु. ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दत्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद करुन तेजस्वी शंकर मदने या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०१/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.
हे आज दि. १७/०१/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले आहे.

शिक्का

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार अक्कलकोट**

**जाहीर समन्स**

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर**
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१
**कविता अर्बन को. ऑप बँक लि, सोलापूर** -- अर्जदार
**- विरूध्द -**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) --जाब देणार

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ११५९/२०२४-२५ | १४६९३४.०० | २ | **सुभाष पुंडलिक रोडगे** रा.शिक्षक कॉलनी जवळ, कामती बु, सोलापूर |
| | | | ३ | **अजित भागवत पाटील** रा.२९७, ब्रह्मपुरी, चांभार गल्ली, मंगळवेढा सोलापूर |
| २ | ११५८/२०२४-२५ | १६११२५.०० | १ | **खंडाळ बसवराज शांतप्पा** रा.मु.पो. दुधनी, लक्ष्मी गल्ली, ता. अक्कलकोट |
| | | | २ | **सिध्दाराम नागण्णा नुला** रा.मु.पो.दुधनी, लक्ष्मी गल्ली, ता. अक्कलकोट |
| | | | ३ | **सोमनाथ नागनाथ गलांडे** रा.३ अ, प्रसन्न सोसायटी, इंदिरानगर, सोलापूर |
| ३ | ११६१/२०२४-२५ | १०२८९९.०० | १ | **सचिन यशवंत जाधव** रा. प्लॉट नं.१, माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | २ | **चव्हाण स्वप्नील प्रकाश** रा.प्लॉट नं.३७, माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | ३ | **महेश दशरथ रणदिवे** रा.प्लॉट नं.३७, माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्द होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे माडंण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि.०४/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाव देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

**आज दि. १८/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.**

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को. ऑप. असोसिएशन लि, सोलापूर**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी विशेषतः बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील सि.स.नं. ३८१३/६/७ याचे क्षेत्र १०८२.४३ चौ.मी. पैकी दक्षिण बाजूचे क्षेत्र १३९.४० चौ.मी. आहे. यासी चतु:सिमा- पूर्वेस- याच सि.स.नं. पैकी चव्हाण यांची मिळकत, दक्षिणेस- पूर्वीची रेल्वे लाईन हद्द व सध्या अस्तित्वात असलेला रस्ता, पश्चिमेस- कोंडीबा पवार व पोकळे यांची मिळकत, उत्तरेस- याच सि.स.नं.पैकी संदेश व प्रसाद पोकळे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तू हक्कासह व वहिवाटीसह संपूर्ण मिळकत.

सदरची मिळकत श्री. राजेंद्र काशिनाथ शिंदे यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत श्री. राजेंद्र काशिनाथ शिंदे यांनी रजि. खरेदी दस्त नं. १३२६/१९९७ ने श्री. राजीव पांडुरंग देशपांडे व संजीव पांडुरंग देशपांडे यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. त्याप्रमाणे श्री. राजेंद्र काशिनाथ शिंदे यांचे वर नमूद मिळकतीचे हक्कपत्रकी नाव नोंद असून सदरची मिळकत त्यांचे मालकीची आहे.

सदरची मिळकत ही श्री. राजेंद्र काशिनाथ शिंदे यांचे स्वसंपादीत खरेदी मालकी हक्काही व नांवे असलेली मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिला कायम खुषखरेदी देण्याचा ठराव करुन त्यांनी आमचे अशिलाकडून इसारादाखल रक्कम स्वीकारलेली आहे. त्यावेळी श्री. राजेंद्र काशिनाथ शिंदे यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमीची असलेची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे.

याउपरही वरील मिळकती संदर्भाने कोणाची काही हरकत, हक्क संबंध, गहाण, साठेखत, दानपत्र, भाडेकरार, मृत्यूपत्र, कोर्ट आदेश, वारसा हक्क वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क संबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०३ दिवसांत खालील पत्त्यावर समक्ष भेट घेवून योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी. त्यानंतर आमचे अशिल आपसात ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. तारीख : १८/०१/२०२५

सही/-
**ॲड. श्री. आर. यू. वैद्य,**
श्री. विठ्ठल निवास, आदित्य कृष्णानगर,
वायकुळे प्लॉट, उपळाई रोड, दोन लिंबाजवळ,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९८५०२७७९४४
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**नावात बदल**

मी **विजय बाळकृष्ण साळुंके** वय- ४१ वर्षे, धंदा- व्यवसाय, राहणार- देशमुख प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर- ४१३४११ माझे पूर्वीचे नाव विजयकुमार बाळकृष्ण साळुंके असे असून ते आता बदलून माझे नवीन नाव **विजय बाळकृष्ण साळुंके** असे झाले आहे.
नोंदणी क्रमांक-
(राजपत्र पी- २४११२७३५)

**IN THE COURT OF CIVIL JUDGE, INDI**
**AT: INDI**
**O.S.No. 377/2016**

1. Rayawwa W/o Bhaganna Koli
And others. ---- Plaintiffs
**Vs.**
1. Yallappa S/o Neelappa Talawar
And others. --- Defendants

**NOTICE TO DEFENDANT NO. 1(C) and 1(E)**
**Defendant No.1 legal heirs**

1(C) Dyamakka W/o Baburao Koli,
Age: 40 years, Occ: H.H.Work,
R/o Durga Nagar, Nasik,
Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

1(E) Sadashiv S/o Yallappa Koli
Age: 36 years, Occ: Driver
R/o Durga Nagar, Nasik,
Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

**NOTICE J/S 5 RULE 20(1A) OF C.P.C.**

Whereas the above named plaintiffs have instituted a suit against you in above said court, you are herby summoned to appear in this court either in person or through Advocate duly instructed by you on the date 17/2/25 of in the forenoon to answer the claim and you are directed to produced to produce on the day all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take summons that in default of your appearance on the day fixed your appearance in above mentioned suit will be heard and determined in your absence.
Given under my hand and seal of the court this day. -19/12/24

**Sign/-**
**Advocate for Plaintiff**
**S.G. Kulkarni, Advocate Indi**

**Sign/-**
**(St. S.I. Hosur)**
**Sr. Shirastedar (Admin)**
**Civil Judge Indi**

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
आज़ादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम १३ च्या उप-कलम (१२) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२, **डिमांड नोटिस जारी केले १९.०३.२०२०** खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचे आवाहन करत आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे की अधोस्वाक्षरीने उपकलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. **०७.०१.२०२४** रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम ८ सह अधिनियमाचे कलम १३ वाचले

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- येडशी शाखा** **कर्जदार:- १. श्री. कारंडे गिफ्ट एम्पोरियम.** **प्रोप्रा.- श्री. महेश रामेश्वर कारंडे** मु. पो. येडशी, ता. जि. उस्मानाबाद ४१३००५. **हमीदार :- १. उत्तम त्रिमक कारंडे** मु. पो. येडशी, ता. जि. उस्मानाबाद ४१३००५. | **सुरक्षा:- श्री. उत्तम त्रिमक कारंडे यांच्या नावे मालमत्ता गहाण** जमिनीचा सर्व तुकडा व पार्सल नोंदणी ता.जि. येडशी गावात आहे व पडून आहे. जि. धाराशिव ६४.८ चौरस मीटरचे आणि सीटीएस/सर्व्हे क्र. गॅट बी क्रमांक G.P.H नंबर २००६ असलेले. **खालीलप्रमाणे सीमा: -** उत्तर :- गोपाळ कारंडे पूर्व:- रस्ता पश्चिम :- हुसेन शेख दक्षिण :- रस्ता | **मागणी सूचना: दि. १९.०३.२०२०** १९.०३.२०२० पासून रु.४,८८,५६४.००/-अधिक लागू न केलेले व्याज १९,७४८.०० कर्जाची वसुली होईपर्यंत (चार लाख अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे चौसष्ट रुपये अधिक एकोणीस हजार सातशे अठ्ठेचाळीस रुपये **सांकेतिक ताबा तारीख : १६.०१.२०२५** |
| 2 | **शाखा- येडशी शाखा** **कर्जदार:- १. अमोल शामराव चव्हाण** पत्ता:- मु. पोस्ट सातेफळ ता. कळंब जि. उस्मानाबाद-४१३४०५ **२. श्यामराव बाबू चव्हाण** **३. छाया शामराव चव्हाण** पत्ता :- मु. पोस्ट सातेफळ ता.कळंब, जि. उस्मानाबाद | १.सातेफळ ता.कळंब जि.धाराशिव येथे प्लांट आणि मशिनरी सेंटरिंग प्लेटचे हायपोथेकेशन २. सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव येथील मिळकत नं. १४१ येथे असलेल्या जमिनीचे आणि इमारतीचे सर्व तुकडा आणि पार्सल गहाण. **खालीलप्रमाणे सीमा:-** पूर्व -सीताराम तुलाराम चव्हाण, पश्चिम-भीमा बाबू चव्हाण, दक्षिण -सर्वे, उत्तर-रस्ता शामरावबाबू चव्हाण आणि छाया शामराव चव्हाण या मालमत्तेचे मालक. ३. सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव येथे मिळकत क्र. १४१ येथे ९० दिवसांपर्यंतचा साठा आणि कर्जदार आणि इतर चालू मालमत्तेची माहिती. | **मागणी सूचना: दि. १९.०३.२०२०** रु.३,९६,७८६.००/- + लागू न केलेले व्याज रु.१,०८,०६७.००/- १९.०३.२०२० पासून कर्जाची वसुली होईपर्यंत (तीन लाख शहानऊ हजार सातशे श्याऐंशी रुपये अधिक एक लाख आठ हजार सदुशष्ठ रुपये) **सांकेतिक ताबा तारीख : १६.०१.२०२५** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - १६/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**




# माझी सखी



# राज्यातील पहिली महिला शेतकरी उत्पादक कंपनी



**सोलापूरपासून १५ किलोमीटरवर असलेले हैद्राबाद महामार्गावर बोरामणी हे प्रसिद्ध गाव आहे. याच गावातील अनिता माळगे या एक अतिशय मेहनती शेतकरी महिला. त्यांनी आपल्या परिसरातील महिलांना एकत्र करून शेतकरी गटाची स्थापना केली. गटाचे काम हळूहळू वाढू लागले तसतसे गटांची संख्या देखील वाढू लागली. आधी १० नंतर १८ गट गट तयार झाले. ३५० महिला जोडल्या गेल्या. केवळ जोडल्याच नाहीत तर त्यांना रोजगारही मिळाला. यामुळे खरी ताकद वाढली. कशाचाही विचार न करता यशस्विनी अॅग्रो प्रोड्युसर कंपनीची स्थापना केली. ही शेतकरी उत्पादक कंपनी आहे. यासाठी त्यांना पायाला भिंगरी बांधून एक ना दोन तब्बल ३२ गावांना भेटी द्याव्या लागल्या. तेव्हा कुठेतरी महिला सदस्या भेटल्या. त्यातून यशस्वी झालेल्या यशस्विनी अॅग्रो प्रोड्युसर कंपनीचा कार्यविस्तार सोलापूरच नव्हे तर महाराष्ट्र आणि देशात झाला. या कंपनीमार्फत बनविलेल्या प्रत्येक पदार्थांना वेगळी ओळख आहे. यामुळे अनिता माळगे आणि त्यांच्या सदस्यांचे योगदान, कष्ट, त्याग, मेहनतीची किनार आहे.**

संक्रांतकरिता बाजरीच्या भाकरी बनविण्याचे काम दोन महिन्यांपासून सुरू असते. या उद्योगासाठी महिलांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यासाठी मोठी साथ मिळते. १५ दिवस आधीच भाकरीची ऑर्डर देण्यात येते. शहरातील सर्व हॉटेल्स, सामुदायिक विवाह सोहळ्यात तसेच उदगीर, बीड, पुणे, उमरगा, बार्शी, पंढरपूर अशा अनेक आमच्या कंपनीच्या बाजारीच्या भाकरीची मागणी आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना चांगला रोजगार मिळत असून दुकानाच्या तुलनेत दर कमी असल्याने भाकरी घेण्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद आहेत.

दररोज २० महिला मिळून एक हजार भाकरी बनवत असतात. केवळ संक्रांतीमध्येच नव्हे तर वर्षभर बाजरीच्या भाकरींना मागणी असते. फक्त पावसाळ्यात मागणीचे प्रमाण कमी असते. सक्रांतीच्या काळात दररोज दोन हजार भाकरीची ऑर्डर असते.अनितताई यांनी कंपनीचे अध्यक्षस्थान भूषवित कंपनीतील आपल्या सदस्य महिलांना प्रोत्साहन देण्यास सुरवात केली. त्यासाठी सोलापूर, पुणे, मुंबई, बारामती या भागातील प्रदर्शने, चर्चासत्रे, प्रयोगशील शेतकऱ्यांकडे अभ्यास सहली असे नानाविध उपक्रम




त्यांनी आयोजित केले. निर्यातदार कंपन्यांसोबत भेटी घडवून चर्चासत्रे देखील आयोजित केले. यातूनच शेतमाल उत्पादन, त्याचे व्यवस्थापन, विपणन अशा अनेक गोष्टींमधील बारकावे महिलांना शिकण्याची संधी मिळाली. गटातील बऱ्याचशा महिला शिकलेल्या नसून कधी घराबाहेर देखील पडल्या नव्हत्या अशा महिलांना यातून मिळालेला अनुभव हा त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा असा ठरला.

काम करतांना कंपनीने प्रक्रिया उद्योगावर भर द्यायचे ठरविले, यासाठी डाळमिल, क्लिनिंग, ग्रेडिंग या सर्व यंत्रणा उभारण्याचे ठरले, यंत्रणा सज्ज करण्यासाठी साधारणपणे १८ लाख रुपयांचे भांडवल लागणार होते. स्वभांडवलासाठी गटातील सदस्यांचे चार लाख रुपये भांडवल होते. महाराष्ट्र स्पर्धात्मक प्रकल्पाच्या माध्यमातून कंपनीचे कार्य सुरु झाले. पाहता पाहता बोरामणी परिसरातील १२ गावांतून ४५ गट तयार झाले. सध्या या कंपनीची महिला सदस्य संख्या ही २,४९० एवढी असून एवढ्या मोठ्या संख्येने महिलांनी महिलांसाठी सुरु केलेली ही राज्यातील पहिलीच शेतकरी उत्पादक कंपनी आहे. या कंपनी अंतर्गत सर्व प्रकारचे धान्य व त्यापासून तयार केलेले प्रक्रियायुक्त पदार्थ विक्री केले जातात. तसेच इतर अन्य उत्पादने जसे लोणची, पापड, मसाले, शेवया तयार करून विकली जात आहेत.

कामाच्या नियोजनासाठी शासकीय योजना समन्वय समिती, मार्केटिंग, विक्री, सामाजिक अशा समित्या स्थापन केल्या. याद्वारे प्रत्येक महिलेला कामाची संधी उपलब्ध करून दिली जाते. कंपनीच्या संचालक मंडळावरही शेतकरी गटनिहाय संचालक नेमणूक केली आहे. यशस्विनी अॅग्रो प्रोड्युसर शेतकरी उत्पादक कंपनीअंतर्गत पिकविले जाणारे धान्य, डाळी थेट ग्राहकांना पुरविले जाते. कंपनीतून तयार केलेल्या डाळींना कोणत्याही प्रकारची पॉलिश नसल्याने बाजारातील दरापेक्षा २० ते ३० रुपये प्रती किलो जास्त दर त्यांच्या उत्पादनांना मिळतो. अनेक मॉलमध्ये सुद्धा यशस्विनी कंपनीचा माल पाठविला जातो. सोलापूरच्या या अनितताई माळगे यांचे खुद्द पंतप्रधानांनी सुद्धा कौतुक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यात महाराष्ट्रातील पहिली महिला शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून सोलापूरच्या अनिता माळगे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत बोलण्याची संधी मिळाली. अनितताई यांनी आपल्या शेतकरी कंपनीची यशोगाथा मोदींजी यांना सांगितली. ते ऐकताच मोदीजींनी अनितताई यांचे मनापासून कौतुक केले आणि शाबासकी दिली. शेतकरी उत्पादक कंपन्यांचं काम देशाला दिशा देईल, अशा शब्दात त्यांनी अनिता माळगे यांचा गौरव केला. खूप चांगलं काम करून दाखवलत असं मोदीजी अनितताई यांना म्हणाले. एका सामान्य महिलेने मोठ्या संघर्षातून मिळवलेले हे यश खरोखरच अभिमानास्पद आहे.

### चला बोरामणीच्या ज्वारीचे बिस्किट, केक, चकलीची चव चाखू या!

बोरामणीतील यशस्विनी अॅग्रो प्रोड्युसर कंपनी पारंपारिक खाद्यपदार्थांबरोबरच अनेक उत्पादनांची निर्मिती करते. कडक भाकरीसाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर जिल्ह्यात चक्क ज्वारीपासून बिस्किट, केक, रवा, पोहे, पापड, शेवया, चकलीही बनविण्याचा विक्रम या कंपनीने केला आहे. केवळ उत्पादन करुन न थांबता मार्केटमध्ये त्याला ओळख निर्माण करुन दिली. ग्राहकांची पसंतीही मिळविली आणि खवय्यांना भुरळही घोतले. शेंगदाणा चटणी, काळा मसाला, भाकरी, मिलेटचे पापडही बनविण्यात येत आहे. त्यांच्या या उत्पादनांना महाराष्ट्र , कर्नाटक, हैद्राबाद, दिल्ली, मुंबई, पुणे येथून मागणी आहे. आता बोरामणीच्या उत्पादनांना सातासमुद्रापारचे वेध लागले आहेत. लवकरच ही उत्पादने समुद्री मार्गासह हवाई उड्डाणे घेत परदेशातील खवय्यांच्या जीभेची चोचले पुरविणार आहेत.

### यशस्विनी कंपनीचे कार्य

- २४९० महिला सभासद; वार्षिक उलाढाल ३ कोटी
- नाबार्ड पॉपी कंपनीची निवड व त्या माध्यमातून ५ शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, सोलापूर जिल्ह्यामध्ये पंढरपूर, दक्षिण सोलापूर, करमाळा, सांगोला या ठिकाणी.
- नाबार्ड विदर्भ कोकण ग्रामीण बँक यशस्विनी कंपनीच्या माध्यमातून गडच्या योजनेंतर्गत ८०० महिलांना सभासदांना प्रत्येकी ५० हजारा प्रमाणे कर्ज दिले. एकूण ७ कोटी रुपयाचे वाटप. (व्यवसाय गुलाब शेती, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, भाजीपाला इ. व्यवसायाकरिता)
- कौशल्य विकास योजनेंतर्गत १,५०० महिलांना प्रशिक्षण (ब्युटी पार्लर, फॅशन डिझायनिंग, कॉम्पुटर, बॅग मेकिंग, भाजीपाला पॅकिंग, प्रक्रिया, ब्रडिंग)
- जलयुक्त शिवार योजनेंतर्गत नाला सरळीकरण, खोलीकरण, देहीकरण करण्यात आले. तलावातील गाळ काढण्यात आला त्यापासून ७ गावांचा पाण्याचा प्रश्न मिटला.
- स्वच्छ भारत अभियानांतर्गत ५०० शौचालयाची उभारणी व १२,००० रु. चा लाभ देण्यात आला.
- बोरामणीला दोनवेळा मेक्सिको टीमची व्हिजीट झाली मॅग्नेट प्रोजेक्टमध्ये १० कोटींचा प्रस्ताव दिला (भाजीपाला कटिंग, भाजीपाला ग्रेडिंग, भाजीपाला फ्रोझन)
- स्मार्ट प्रोजेक्टमध्ये ६० लाखांचे प्रस्ताव दिले, अॅडव्हान्स डाळ मिल, पॅकिंग मशीन, ऑईल मिल.

संपादन : आरती कुसेकर, मो. ९७६३७५१०००

# कॅन्सरमुक्तीचा ध्यास घेतलेले युगंधर फाउंडेशन..!


युगंधर फाउंडेशन सोलापूरच्या संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक रेश्मा माने यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पांगरी या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पांगरी गावातच पूर्ण झाले शाळेतच असताना विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमाचे बीज त्यांच्या मनावर रुजवले गेले असल्याने भविष्यात शिक्षण पूर्ण झाल्यानंतर युगंधर फाउंडेशन सोलापूर या सामाजिक संस्थेची स्थापना करून विविध सामाजिक उपक्रमास सुरुवात केली युगंधर फाउंडेशनच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरण संरक्षण यासाठी संस्था २०११ पासून संस्था कार्यरत आहे. युगंधर फाउंडेशन ही संस्था बहुउद्देशीय संस्था असल्याने पर्यावरण, महिला व बालकल्याण तसेच आरोग्य युवकांसाठी विविध सामाजिक उपक्रम युवकांसाठी उद्योजकता प्रशिक्षण तसेच नैसर्गिक शेती यासाठी मधमाशी पालन यासारखे विविध उपक्रम संस्थेच्या वतीने वेळोवेळी राबविण्यात येतात. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम संस्था वेळोवेळी राबवत असते हे कार्य करीत असताना महिलांच्या बाबतीत आणि त्यांच्या आरोग्याच्या बाबतीत विविध समस्या अगदी जवळून पाहिल्यामुळे युगंधर फाउंडेशनच्या वतीने २०१८ पासून महिलांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम संस्थेमार्फत राबविले जातात. महिलांसाठी आरोग्य तपासणी तसेच महिलांच्या आरोग्यासाठी लागणारे विविध उपक्रम विविध संसाधने यासाठी संस्था वेळोवेळी विविध उपक्रम राबवितात जसे महिलांना मासिक पाळीच्या दरम्यान होणारा त्रास याबाबत जाणीव जागृती करणे त्याचबरोबर ती वयात येणाऱ्या मुलींसाठी कळी उमलताना हा उपक्रम राबवून मुलींच्या आरोग्यासाठी विविध मान्यवरांच्या वतीने व्याख्यान आणि आरोग्य तपासणी शिबिर राबविले जातात. २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये वाढत्या कॅन्सर रुग्णांची संख्या लक्षात घेता तसेच वातावरणामध्ये होणारे बदल आणि त्याचबरोबर ती आपल्या बदलणाऱ्या जीवनशैलीमुळे दिवसेंदिवस कॅन्सरचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढत आहेत त्यामध्ये महिलांचा देखील मोठा आकडा असल्याचे अभ्यासात दिसून आले आहे पंजाब सारख्या राज्यामध्ये आज कॅन्सर एक्सप्रेस चालवली जाते मात्र आता महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणात महिलांमध्ये कॅन्सरचे रुग्ण सापडत आहेत. प्रत्येक घरामध्ये किमान एक तरी त्यांचं रुग्ण किंवा कॅन्सर बाधित व्यक्ती सापडतो या सर्व पार्श्वभूमीवर युगंधर फाउंडेशनने महिलांसाठी आरोग्य तपासणी आणि त्यांचा जाणीव जागृती शिबिराचे आयोजन करण्याचे योजिले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रभर या उपक्रमाच्या अंतर्गत किशोरवयीन मुली तरुणी आणि विवाहित महिला यांच्यामध्ये कॅन्सरविषयक जाणीव जागृती निर्माण करणे आणि जास्तीत जास्त महिलांपर्यंत त्यांची माहिती पोहोचवणे आणि वेळीच कॅन्सरचे रुग्ण तपासून त्यांच्यावरती योग्य औषधोपचार करणे असा या उपक्रमाचा हेतू आहे कोल्हापूर येथील अॅड. दिलशाद मुजावर यांच्या स्मृतिप्रित्यार्थ जगणं नव उमेदीचं एक पाऊल कॅन्सर मुक्त समाजासाठी या उपक्रमा अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील महिलांमध्ये कॅन्सर विषयक जाणीव जागृती आणि गर्भाशयाचा कॅन्सर तसेच स्तनाचा कॅन्सर आणि विविध प्रकारच्या कॅन्सरची तपासणी आणि त्या संदर्भात



पुढील उपचारासाठी महिलांना जागृत करणे त्याचबरोबर ती त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे असा या उपक्रमाचा हेतू आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये मार्च २०२५ अखेर एकूण ५० शिबीर घेण्याचे योजिले आहे. यामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान चार शिबिर आणि जाणीव जागृती कार्यक्रम तसेच सोलापूर शहरांमध्ये दोन महाआरोग्य शिबिर महिलांच्यासाठी आपण आयोजित करण्यात आहोत. युगंधर फाउंडेशनच्या वतीने भविष्यामध्ये कॅन्सरमुक्त समाज निर्माण करण्यासाठी अगदी लहान वयोगटापासूनच मुला-मुलींना कॅन्सरची लस देऊन त्यांना कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी जास्तीत जास्त मुलांना कॅन्सर ची लस पुरवण्यासाठी संस्था कार्यरत असणार आहे. महिलांसाठी केवळ कॅन्सर नव्हे तर महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळणारा आजार म्हणजे महिलांमध्ये असणारी रक्ताची आणि पर्यायाने हिमोग्लोबिनची कमतरता लहान वयामध्ये मुलींची लग्न झाल्यामुळे अगदी लहान वयात त्यांच्यावरती मातृत्व लादले जाते. त्यामुळे मुली विविध स्त्री रोगास बळी पडतात आणि त्यामुळे अकाली मृत्यू देखील येतात. भविष्यामध्ये शालेय मुली तरुणी आणि विवाहित महिला यांच्यासाठी पोषण आहार आणि त्याचबरोबर महिलांमध्ये आरोग्य तपासणी शिबिर महिलांच्यासाठी योग्य दरामध्ये सॅनिटरी नॅपकिन आणि महिलांच्या आरोग्यासाठी सोलापूर शहर तसेच संपूर्ण महाराष्ट्रभर राईट टू पी या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह तसेच हायवे वरती महिलांच्यासाठी स्वच्छता सुविधा तसेच शहरांमध्ये देखील विविध कार्यालय ,हॉटेल, सरकारी आणि निमसरकारी कार्यालय या ठिकाणी महिलांच्या साठी स्वच्छतागृह यांची उभारणी करणे यासाठी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करणे. युगंधर फाउंडेशन च्या वतीने महिला आणि बालकांच्या साठी भविष्यामध्ये स्वतःचे हक्काचे महिला आरोग्य केंद्र उभारणे हा आमचा मानस आहे. महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅन्सर होण्याचे कारण म्हणजे महिलांचे स्वतःच्या आरोग्याकडे अनास्थाने पाहणे स्वतःच्या आरोग्यासाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी तसेच विविध टाचण्या करून न घेतल्यामुळे वेळीच कॅन्सर लक्षात येत नाही पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजमध्ये कॅन्सरची जर तपासणी झाली तर मोठ्या प्रमाणात महिलांना कॅन्सर मुक्त करण्यासाठी आपण प्रयत्न करू शकतो याचसाठी युगंधर फाउंडेशनच्या वतीने महिलांच्या आरोग्य शिबिराचे आयोजन सध्या सोलापूर जिल्ह्यात करण्यात येत आहे भविष्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर महिलांच्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर आणि कॅन्सर मुक्त समाजासाठी जाणीव जागृती कार्यक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात येणार आहे. युगंधर फाउंडेशनच्या कार्याच्यासाठी विविध सामाजिक संस्था आणि शासनाच्या स्तरावरती विविध पुरस्कार सन्मानित करण्यात आले आहे.

युगंधर फाऊंडेशन स्वतःचे चे वतीने सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १५०० जिल्हा परिषद शाळा शिक्षकांना युनीसेफ च्या माध्यमातून हवामान बदल आणि पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले त्याच बरोबर जील्हातील १०जिल्हापरिषद प्राथमिक शाळा लाईट हाऊस स्कूल म्हणून तयार करून त्याद्वारे पर्यावरण विषयक उपक्रम अतिशय चांगल्या रीतीने राबविण्यात येतात.त्या शाळा मद्ये बायोगॅस प्रकल्प,सोलर पॅनल, वॉटर ऑडिट, परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टिंग,प्लास्टिक मुक्त शाळा आदी उपक्रम २०२२ पासून राबविण्यात येत आहे.



सामाजिक जीवनात कार्य करीत असताना प्रकर्षाने जाणवलेली बाब म्हणजे आपले विचार आणि आचार यामधे असणारी तफावत प्लास्टिक पिशव्या बंदी करीत असताना आपण प्लास्टिक बनविणाऱ्या कंपनी बंद करू शकत नाही ज्या ठिकाणी गर्भातच मुलींची हत्या होते त्यावेळी आमच्या मुलांच्या लग्नाला मुली भेटत नाहीत. युगंधर फाऊंडेशन सोलापूर च्या माध्यमातून पर्यावरण शिक्षण, महिला आरोग्य महिला सबलीकरण, मधमाशी पालन व्यवसाय प्रशिक्षण आणि नैसर्गिक शेती यासाठी महाराष्ट्रातील १८ जील्हातून संस्थेचे काम चालू आहे.भविष्यात संस्थेचे स्वतःचे निसर्ग अभ्यास केंद्र आणि पर्यावरण शिक्षण अभ्यासाठी स्वायत्त शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्र उभारणे तसेच महिल व तरुण उद्योगाजकांच्या साठी उद्योग प्रशिक्षण आणि संसाधन केंद्राची स्थापना करणे हे उद्दिष्ट ठेवून सस्था कार्यरत आहे.पर्यावरण, आरोग्य, व्यवसाय, प्रशिक्षण शिक्षण आणि संशोधन या क्षेत्रात काम करीत असताना आज देखील महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते यासाठी सावित्रीच्या वसा घेवून जिजाऊंच्या प्रेरणेने प्रत्येक मुलींमध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई रुजवली पाहिजे.

**– प्रा. रेश्मा माने,**
अध्यक्षा, युगंधर फाउंडेशन, सोलापूर

# गांडूळ खताला 'सुवर्ण' काळ

सोलापूर जिल्हा उमेद अभियानामध्ये २ लाख ५० हजार महिला सहभागी आहेत. सांगोला तालुक्यातील चोपडी या गावातील डॉ. सुवर्णा आनंदराव पाटील यांनी स्वंयसहाय्यता गटातील इतर महिलांच्या सहकार्याने समर्थ गांडूळ खत प्रकल्प उभारला आहे. डॉ. सुवर्णाताई या शेतकऱ्यांची लेक असून त्यांचे पती आर्मीमध्ये आहेत. त्यांनी बीएएमएसचे शिक्षण घेतलेले असून रासायनिक पद्धतीने शेती न करता सेंद्रीय पद्धतीने शेती करण्याचे ठरविले आणि त्यांनी इतर महिलांच्या सहकार्याने गांडूळ खत प्रकल्प उभारला. या सेंद्रिय खतामुळे आणि वर्मीवंशची फवारणी केल्यामुळे शेतीचा खर्च कमी होऊ लागला आहे. गांडूळ खत आणि वर्मीवंश यांची विक्री गावामध्ये तसेच तालुक्यात केली जात असून यापुढे राज्यात विक्री करणार आहे. महिलांना त्यांच्या व्यवसायासाठी लागणार भांडवल, निधी हे एसबीआय फाऊंडेशनतर्फे मिळणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली उमेद अभियानचे काम चांगल्या पद्धतीने सुरू आहे . ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने पहिल्यांदाच 'उमेद अभियान' ने महिला स्वयंसहायता समूहातील महिला उद्योजकांसाठी 'घे भरारी- मला पंख मिळालं टीव्ही नाईन या लोकप्रिय चॅनेलवर हा शो दाखविला जात आहे. स्त्रियांचं आयुष्य म्हटलं तर संसार, चूल, मूल यांसारख्या असंख्य गोष्टी सांभाळण्यात जातं. पण सध्याच्या बदलत्या काळात स्त्री संसार सांभाळून स्वतःच्या पायावर खंबीर उभं राहिलेली पाहायला मिळत आहे. ही अत्यंत कौतुकाची बाब आहे. पण तरीही स्त्रीला प्रोत्सहन, योग्य मार्गदर्शन मिळणे तितकंच महत्त्वाचं आहे. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्सहन दिले जाते. पण 'उमेद अभियान' मधून 'घे भरारी- मला पंख मिळाले' या कार्यक्रमातून तब्बल ७० लाख महिलांना प्रेरणा मिळत आहे. 'उमेद अभियानने' या अनोख्या कार्यक्रमासाठी ३९ महिलांची निवड केली आहे. या महिलांची यशोगाथा ऐकून इतर महिला प्रोत्साहीत होतील. त्यांनाही त्यांची अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरणा मिळेल. यावेळी महाराष्ट्रातील उद्योजिका अनघा घैसास आणि उद्योजक विशाल सोलासकर, राहुल पापल यांच्या मार्गदर्शन महिलांना मिळत आहे. यामध्ये महिलांना त्यांच्या व्यवसायासाठी लागणार भांडवल, निधी हे एसबीआय फाऊंडेशनतर्फे मिळणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रायोजकत्व एसबीआय फाऊंडेशनने घेतल्यामुळे हा नाविन्यपूर्ण शो महाराष्ट्राला आणि देशाला अनुभवायला मिळत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानचे मुख्य अधिकारी रुचेश जयवंशी या अभियानात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत. प्रत्येक ग्रामीण महिलेला तिची स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळायला हवी. या कार्यक्रमाच्या निमित्ताने तब्बल ७० लाख महिलांपर्यंत पोहचण्याच आमचं ध्येय आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक महिला उद्योजिका बनली पाहिजे. बदलत्या काळानुसार महिलांनी आणखी पुढे यायला हवं आणि त्यासाठीच 'उमेद अभियान' हे अभियान राबवत आहोत. या कार्यक्रमाचा परिणाम हा राज्याच्या ग्रामीण अर्थशास्त्राचा पाया मजबूत करण्यासाठी होणार आहे.



स्त्रियांना प्रत्येक कठीण प्रसंगातून जावं लागत. मुख्यतः ग्रामीण भागातील महिलांना त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन, प्रोत्सहन मिळत नाही. पण 'उमेद अभियान' अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना त्यांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन मिळत आहे. प्रत्येक महिलेच्या आयुष्यात खचून जाणारा क्षण येतोच, पण आता प्रत्येक स्त्रीला स्वतःच्या पायावर उभं राहण्याची नवी उमेद मिळेल. आता स्त्री फक्त चूल, मूल सांभाळणारी नसेल तर ती एक उद्योजिका ही असेल, असं सांगतानाच 'उमेद अभियान' चं खूप कौतुक वाटतं आणि या अभियानाचा मला एक भाग होता येतंय या गोष्टीचा आनंद आहे. 'घे भरारी- मला पंख मिळाले' या कार्यक्रमाद्वारे स्वबळावर उभ्या राहिलेल्या ३९ महिलांचे अनुभव आणि यशोगाथा ऐकायला मिळत आहे. या शोमध्ये ३९ महिलांमध्ये सोलापूरच्या डॉ. सुवर्णा पाटील या एकमेव उद्योजिका महिलेचा सहभाग आहे. उमेद अभियान आणि एसबीआय फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने घे भरारी-मला पंख मिळाले हा टीव्ही शो सुरू झालेला असून यामध्ये ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील ३९ महिलांच्या यशोगाथा या शोमध्ये दाखवल्या जात आहेत.



सांगोला तालुक्यातील चोपडी येथील डॉ. सुवर्णा पाटील यांनी स्वयंसहाय्यता गटातील इतर महिलांच्या सहकार्याने समर्थ गांडूळ खत प्रकल्प उभारला आहे. त्याची दखल उमेदने घेतली असून उमेद अभियानामध्ये सोलापूर जिल्ह्यातील अडीच लाख महिला सहभागी असून त्यांनी इतर उद्योग उभारून उद्योजिका बनाव्यात.

**-सचिन चवरे,**
जिल्हा व्यवस्थापक, उमेद अभियान, सोलापूर

## संक्षिप्त वृत्त



### उंडेगावातील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात भाई एन. डी. पाटील स्मृतीदिन साजरा

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल उंडेगाव विद्यालयात भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे नेते, पुरोगामी चळवळीचे मार्गदर्शक, विचारवंत भाई एन. डी. पाटील यांना स्मृतिदिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी तुकाराम मोहनराव पाटील होते. मुख्याध्यापक विजयकुमार डूरे पाटील यांनी एन. डी. पाटील यांचा जीवनपट उलगडून सांगितला तर तात्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात एन. डी. यांच्यासोबतचे चळवळीचे अनुभव सांगितले. विद्यार्थ्यांना कमवा व शिका ही योजना ज्यांनी अतिशय प्रभावीपणे संस्थेत राबवली. आजच्या दिनाचे औचित्य साधून कवी आपल्या भेटीला या उपक्रमाअंतर्गत करपी कविता संग्रहाचे कवी व इयत्ता ६ वी च्या बालभारती पुस्तकातील माझ्या आज्यान पंजाण या कवितेचे लेखक कवी शंकर कसबे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या ग्रामीण बोलीभाषेतील कविता सादर करुन मुलांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी जगताप गुरुजी, भीमराव पवार, नागनाथ बरबडे, राणी गुंजेगावकर, चंदना रणदिवे व बारीकराव देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल डोईफोडे यांनी तर आभार नानासाहेब झालटे यांनी मानले.

### पीक कर्ज देताना निरीक्षकाच्या सहीची अट रद्द करा : सूर्यकांत चिकणे

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

पिक कर्ज वाटप करत असताना विविध कार्यकारी सोसायटीच्या कर्ज बेबाकच्या दाखल्यावर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बँक इन्स्पेक्टरची सहीची अट रद्द करा अन्यथा २७ जानेवारी रोजी उपोषण करणार, असा इशारा भैरवनाथ शेतमजूर संघटनेचे अध्यक्ष अध्यक्ष सूर्यकांत चिकणे यांनी दिला आहे. ही अट रद्द न केल्यास २७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी ढगे मळा येथे आमरण उपोषण करणार आहे याची सर्वस्वी जबाबदारी बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर यांचेवर राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी सोलापूर, तहसीलदार बार्शी, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक ऑफ इंडिया शाखा सोलापूर,. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन बार्शी शहर, पोलीस निरीक्षक तालुका पोलीस स्टेशन बार्शी तालुका बार्शी, शाखाधिकारी बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी, प्रशासक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मध्यवर्ती सोलापूर यांना निवेदन देण्यात आले आहे.



### तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत संस्कृती बसवंत हिला प्रथम क्रमांक

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

सुलाखे इंग्लिश मेडीयम स्कुलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित तालुकास्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेत सुयश विद्यालयातील विद्यार्थिनी संस्कृती सिद्धार्थ बसवंत हिने प्रथम क्रमांक मिळवला. संस्कृतीच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक शिवदास नलावडे, मार्गदर्शक प्रसाद नलावडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक यांनी अभिनंदन करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### दत्तात्रय गुरव यांचा गौरव

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

सामाजिक क्षेत्रामध्ये नेहमीच मोलाचे योगदान देणारे, बार्शी तालुक्यातील भोईंजे येथील ग्रामीण भागातील सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय महादेव गुरव यांचा श्रीमान रामभाई शहा रक्तपेढीच्यावतीने प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. दत्तात्रय गुरव हे गेल्या पाच वर्षांपासून गावामध्ये रक्तदान शिबीर घेत आहेत. तसेच सर्वसामान्य, निराधार, गरजू व्यक्तींना शिबिरामुळे मोठा फायदा झाला आहे. त्यांच्या कार्याची दाखल घेऊन, इंडियन रेडक्रोस सोसायटीचे डॉ. दिलीप कराड व प्रशांत बुडूख यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### अनुभवात्मक संगीत महोत्सव तिसऱ्या आवृत्तीसह परतला

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

लवकरच अनुभवात्मक संगीत महोत्सव आपल्या तिसऱ्या आवृत्तीसह परतला आहे.सीग्राम्स रॉयल स्टॅग बूमबॉक्स,ज्यामध्ये बॉलीवूडच्या सदाबहार स्वरांना आधुनिक हिप-हॉप बीट्ससह संमिश्रित करण्यात आले आहे.या हंगामाचे निर्मिती संयोजन मिर्चीने केले असून, या अनोख्या अनुभवात्मक संगीत महोत्सवाने १४ जानेवारी २०२५ रोजी मुंबईत खास मीडिया प्रीव्ह्यू दरम्यान आपल्या आगामी कलाकारांची झलक सादर केली.पारंपरिक आणि आधुनिक भारतीय संगीताच्या संगमाचा उत्सव साजरा करत, हा सांस्कृतिक मिलाफ ब्रँडच्या 'लिव्हिंग इट लार्ज' तत्त्वज्ञानाचे प्रतीक ठरत आहे. संगीत हा ब्रँडसाठी ग्राहकांशी संवाद साधण्याचा महत्त्वाचा आधार राहिला आहे.हा महोत्सव हैदराबाद,मुंबई,गुरुग्राम आणि गुवाहाटी या चार प्रमुख युवा केंद्रांमध्ये आयोजित केला जाणार आहे, जिथे प्रमुख संगीत सादरीकरणांसोबत अत्याधुनिक इंटरॲक्टिव्ह अनुभव देखील मिळणार आहेत.मागील दोन आवृत्त्यांना संपूर्ण शहरांमध्ये सुमारे १ लाख प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला होता आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर २०० मिलियनहून अधिक व्ह्यूज मिळाले होते.

### एसटी स्टॅन्डवरून मोबाईलची चोरी

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

एसटी स्टॅन्डवरून चोरट्याने प्रवाशाचा ३५ हजार रुपयांचा मोबाईल चोरून नेला. याबाबत अभिनय दयानंद भगत (वय २४, रा. भगत अली नाका, आवास, जि. रायगड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १४ जानेवारी रोजी दुपारी अभिनय भगत हे सोलापूर ते तुळजापूर जाणाऱ्या एस टी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने भगत यांच्या पॅन्टच्या खिशातील ३५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

# वातावरणातील कार्बनचे वाढते प्रमाण चिंताजनक

## जीवसृष्टी वाचविण्यासाठी बांबू लागवडीवर भर देण्याचे पाशा पटेल यांचे आवाहन; उत्तर सोलापूर पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

वातावरणातील कार्बनडाय आक्साईडचे वाढते प्रमाण चिंताजनक असून २०५० नंतर मानवावर मोठी अपत्ती येणार असल्याचा इशारा जागतिक स्तरावर संशोधन करणा-या इंटरनॅशनल गव्हर्नमेंटल पॅनल आफ क्लायमेट चेंज या संस्थेतील शास्त्रज्ञांनी केला आहे. तेव्हा जीवसृष्टी वाचवायची असेल तर बांबू वनस्पतीची मोठ्या प्रमाणात लागवड करावी, असे आवाहन राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशाभाई पटेल यांनी येथे केले.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून उत्तर सोलापूर पत्रकार संघ व उत्तर सोलापूर सरपंच समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यातील गुणीजनांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी ना. पटेल बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बळीरामकाका साठे अध्यक्षस्थानी होते. माजी आमदार दिलीप माने, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, भाजपाचे जिल्हा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार, ओ.बी.सी.सेलचे जिल्हाध्यक्ष अविनाश मार्तंडे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष प्रल्हाद काशीद, शिवसेना तालुकाप्रमुख संजय पौळ,पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप गायकवाड, सरपंच समितीचे अध्यक्ष उमेश भगत, भाजपाचे तालुका अध्यक्ष राम जाधव, वडाळा गावचे सरपंच जितेंद्र साठे, भाजपा महिला आघाडी तालुका अध्यक्षा वृषाली पवार, माजी सभापती रजनी भडकुंबे,शेतकरी संघटनेचे नेते शिवानंद दरेकर यांच्यासह



पदाधिकारी उपस्थित होते.

प्रा.डॉ. किशोर शिंदे,पाकणी (कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल), सरस्वती पवार,अकोलेकाटी (प्राथमिक शिक्षणातील भरीव कामगिरी), अतिश शिरगिरे (पाणी फाऊंडेशन), विजय थोरात (पत्रकारिता), वामन भोसले, कोंडी (उद्योग), कविता शिंदे (महिला व्यसायिक, प्लंबिंग) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकार मधुकर गिरी महाराज (नान्नज), पोलीस निरीक्षपदी निवड झालेले रोहित

माने, तळेहिप्परगा, भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून निवड झालेले रोहन इनामदार (मर्डी), ग्रामविकास अधिकारी ज्योती बिराजदार, बिबीदारफळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा खराडे व माजी आमदार दिलीपराव माने यांची निष्ठेने सेवा बजाविल्याबद्दल शिवाजी घोडके पाटील यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

काका साठे म्हणाले, उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व नेतेमंडळींना एकत्रित करण्याचे काम पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून उत्तर सोलापूर पत्रकार संघ करीत असून तालुक्यातील गुणीजनांचा सन्मान करण्याचा पत्रकारांचा हा उपक्रम स्तुत्य आहे.

पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी स्वागत केले. सरपंच समितीचे अध्यक्ष उमेश भगत यांनी प्रास्तविक केले. दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. सुदर्शन सुतार यांनी आभार मानले.



# बार्शीत शंकरा आयडॉल विविध कला दर्शन स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

येथील शंकरा रेकॉर्डिंग स्टुडिओ आणि संगीत क्लासेस बार्शी आयोजित शंकरा आयडॉल विविध कला दर्शन स्पर्धा उत्साहात झाल्या. भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शंकर वाघमारे यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या स्पर्धेमध्ये गायन, वादन, नृत्य अशा तिन्ही कलागुणांचा अविष्कार होता. या स्पर्धेसाठी सोलापूर, धाराशिव, लातूर, पुणे, बीड जिल्ह्यातून स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता. शंकराला प्रसन्न करणारे बहारदार तांडव नृत्य बरोबरच मला जाऊद्या ना घरी, आता वाजले की बारा असे म्हणत सवाल-जबाब आणि चंद्रासारख्या लावणी वरती छोट्या कलाकारांनी बहारदार लावणी नृत्य केले. ये जाते हुए लम्हो, जरा ठहरो जरा ठहरो याबरोबरच चढता सुरज धीरे धीरे ढलता है ढल जायेगा या कव्वाली सोबत विठू माऊली तू, माऊली जगाची या भावगीतावर व इतर अनेक बहारदार गीतांवर अक्षरशः प्रेक्षकांच्या टाळ्यांचा पाऊस पडला. स्पर्धेसाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा गौरी रसाळ, संगीत विशारद बाळासाहेब गरड, आनंद समुद्रे, सुनील अवघडे, अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी वृषाली वाघमारे, पुनम वाळके, विनोद कांबळे, शुभम झोंबाडे, राहुल झोंबाडे आदींनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून निहाल शेख, साजिद बागवान यांनी काम पाहिले. आभार संयोजक शंकर वाघमारे यांनी मानले. स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे- तबलावादन विजेते- प्रथम क्रमांक विभागून संमोहन जोशी लातूर आणि दिपराज हमने बार्शी, द्वितीय क्रमांक विभागून अथर्व गवळी, अनुराग पाटील, तृतीय क्रमांक विभागून कृष्णा काळे अनिरुद्ध वाळके, उत्तेजनार्थ - कौस्तुभ पाठक

गायन स्पर्धेतील विजेते- प्रथम क्रमांक विभागून हर्षदा पवार सोलापूर, कौशल्य पवार बार्शी, द्वितीय क्रमांक विभागून तनुश्री हांडे सोलापूर व जौसलिया मुर्शद सोलापूर, तृतीय क्रमांक विभागून श्रुती लोखंडे बार्शी, मधुरा झांबरे अकलूज, उत्तेजनार्थ श्रेया बोरा, रितेश कजाळे.

### नृत्य स्पर्धा ग्रुप, सोलो विजेते

नृत्य स्पर्धा ग्रुप व सोलो प्रकारातील विजेते-प्रथम क्रमांक विभागून खांडवी डान्स ग्रुप खांडवी व स्नेहल विधाते बार्शी, द्वितीय क्रमांक विभागून शारदेय डान्स अॅकॅडमी बार्शी व ऐश्वर्या लोंढे बार्शी, तृतीय क्रमांक विभागून एस के डान्स अॅकॅडमी बार्शी व अवनी उमाटे. उत्तेजनार्थ महाराष्ट्र विद्यालय बार्शी, शिव डान्स अकॅडमी बार्शी.

# चलन-मूल्याचे राजकारण

**जगातील वेगवेगळ्या देशांची वेगवेगळी चलने असतात. त्या त्या चलनाचे त्याचे त्याचे असे एक देशांतर्गत असे मूल्य असते. असे मूल्य त्या त्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या तात्कालिक आणि टॉलनिक समृद्धीवर अवलंबून असते. एका देशांच्या चलनाच्या तुलनेत दुसऱ्या देशाच्या चलनाच्या विनिमायाचा दर यालाही चलनमूल्य असे म्हणता येईल किंवा म्हणले जातेही ! उदाहरणार्थ , सध्याच्या स्थितीत एक अमेरिकी डॉलर म्हणजे सुमारें ८७ भारतीय रुपये. आता खरं म्हणजे , यापैकी कोणत्याही अर्थाने चलनमूल्य ही मुळात आर्थिक घटना असते. तशी ती असतेही.**

पण ती फक्त आर्थिक घटनाही नसते. त्याला सामाजिक - राजकीय पार्श्वभूमीही निश्चितच असते. अगदी स्थानिक पातळी पासून राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय (जागतिक) पातळीपर्यंतचे घटक अशा चलन -मूल्याचे कारणही असतात आणि परीणामही !

अनेकदा परिमाणही ! तात्पुरते ते चिरकालिक असेही त्याला पदर असतात. आणि हे असे असणे आजचे नाहीये हे इथे आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे. देशाचे चलन आणि त्याचे चलनमूल्य हा फार मोठया प्रमाणावर राजकारणाचा प्रभाव, प्रचार, प्रसार असतो हे इथे जरासुद्धा विसरून चालणार नाही. भूतानला जसे स्वतःचे लष्कर नाहीं तसे काही देशांना स्वतःचे चलन नाहीं किंवा नव्हते. त्यांतही स्वतःचे लष्कर ठेवायचे नाहीं हा भूतानाचा स्वतःचा निर्णय आहे. भूतानची अर्थव्यवस्था GDP (Gross Domestic Product) या संकल्पनेवर आधारीत नसून GNHP (Gross National Happiness Product / Index) वर आधारीत आहे. आणि त्या विचारसरणीत लष्करावर सरकारी पैसा नियमितपणे खर्च होणे वर्ज्य मानले जाते.

पण ज्या देशांना स्वतःचे चलन नाहीं त्यातील प्रत्येक देशाने स्वतःचे चलन ठेवायचे नाही हा निर्णय काही स्वखुशीने किंवा आप-मर्जीने घेतलेला नाहीं. तो त्यांच्यावर तात्कालीन राजकारणाने लादलेला आहे. अशा तऱ्हेने चलनबंदी लादली जाण्याची स्थलसापेक्ष, कालसापेक्ष, प्रसंगसापेक्ष, व्यक्तीसापेक्ष उदाहरणे त्या त्या काळात घडली आहेत. आजही घडत आहेत. पुढेही निश्चितच घडत राहतील. कदाचित भविष्यकाळात ती जास्त घडतील. कारण आताच्या जमान्यात एखाद्या देशाचा भौगोलिक ताबा घेत त्यावर राज्य करण्यापेक्षा त्या त्या देशाची आर्थिक व राजकीय नाकेबंदी करत त्या त्या देशाच्या चलनाचे मूल्य अवमानित करणे जास्त सोयीचे जाते. भारतीय अर्थव्यवस्था कीतीही सुदृढ झाली अथवा झाली नाही तरी भारतीय रुपयाचा समावेश जगाच्या निवडक चलनाच्या समूहात करायला (आणि भारताचा सिक्युरिटी कौन्सिल मधे समावेश करायला) चीनचा असणारा सातत्यपूर्ण व कडवा विरोध हे त्याचेच उदाहरण आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानला जागतिक व्यापारापासून लांब ठेवण्यात त्यांच्या चलनाची मान्यता काढून टाकणे किंवा अमान्य करणे हेही चलनमूल्याचे राजकारण याचे झळाळते उदाहरण ठरेल. कारण आर्थिक किंवा सांख्यिकी तत्त्वावर कांहीही मूल्य नसणे हेही एक प्रकारे त्याचे मूल्यच दाखवत असते की! एखादा सांस्कृतिक कार्यक्रम कोणतेही तिकिट न आकारता केला जातो तेंव्हा आपणही म्हणत असतोच की हा कार्यक्रम विनामूल्य आहे. आता विनामूल्य शब्दात सुध्दा मूल्य हा शब्द आहेच की! इतकेच नव्हे तर असे विनामूल्य हे विशेषण त्या कार्यक्रमाच्या प्रवेशाचे असते; कार्यक्रमाच्या दर्जाचे नाहीं हे उघड आहे. (आता एखाद्या लग्न समारंभात आहेर आणू नये असे सांगितलेले असते) चलन मूल्याचे राजकारण आजमितीला आपल्या देशाचा परकीय चलनाचा साठा स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वोच्च पातळीवर आहे. पण अशी स्थिती काही सदासर्वकाळ नव्हती. १९९१ साली तर जेमतेम दोन आठवड्याचा आयातीला पुरेल इतपतच परकीय चलनाचा साठा आपल्या देशाजवळ होता. त्यावेळी तो तुटपुंजा साठा वापरताना आपल्या देशाच्या तत्कालीन सरकारने केलेल्या कसरती (अगदी रिझर्व्ह बँकेकडचे सोने गहाण ठेवावे लागणे सुध्दा) हे एका चांगल्या अर्थानं चलनमूल्याचे राजकारण च आहे की! चलन मूल्याचे राजकारण. यातही गंमत पाहा जेंव्हा परकीय चलनाचा साठा अत्यंत खालावलेला असतो तेंव्हा तो भारत सरकार चा असतो. पण जेंव्हा परकीय चलनाचा साठा अत्यंत सुखदायक पातळीवर असतो तेव्हा तो मोदी सरकारचा असतो. अर्थात हे फक्त आपल्याच देशात होते असे नाही. कारण कोणत्याही देशाच्या अधिकृत चलनाचे मूल्य ठरवताना जे घटक कळत नकळत लक्षात घेतले जाणारे जे अनेक घटक असतात त्यातला एक घटक हा असे त्या त्या वेळी त्या त्या देशाकडे असणारा परकीय चलनाचा साठा हा असतो.

चलनमूल्य ठरत असताना त्या-त्या देशाच्या चलनाचे आंतरराष्ट्रीय मूल्य आणि कदाचित सामर्थ्य ठरताना जसा त्या त्या देशाकडे असणाऱ्या परकीय चलनाच्या साठ्याचा विचार केला जातो तसा लक्षात घेतला जाणारा दुसरा घटक म्हणजे त्या देशाच्या सरकारकडे किंवा त्या देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे असणारा सोन्याचा साठा. १९७० च्या दशकाच्या आधी जगातील अनेक देशात सोन्यावर आधारीत अशी चलन व्यवस्था (Gold Based Currency ) होती. आता तो प्रकार शिल्लक राहीलेला नाही. तरीही चलन आणि सोन्याचा साठा याची सांगड मनोमन घातली जातेच . कोरोनाच्या काळात अनेक देशांच्या सरकारानी त्यांच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील हाताशी असणारी गुंतवणूक - योग्य रक्कम मोठया प्रमाणावर सोन्यात गुंतवली हे त्याचेच उदाहरण आहे. त्यातूनच सोन्याची निर्यात करणारे देश , त्यांच्यावर पकड असणारे देश यांची दादागिरी हे जागतिक चलनबाजाराचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. चलन - मूल्याचे राजकारण असा विचार करताना याबाबतचे अत्यंत प्रकर्षाने आठवणारे उदाहरण म्हणजे पेट्रोल. पेट्रोल निर्माण आणि निर्यात करणारे देश (Oil Producing nd Exporting Countries åhUOoM OPEC किंवा ओपेक) आणि त्यांना पेट्रोल विक्रीतून मिळणारा पैसा. असा पेट्रोल -पैसा ही या देशांच्या अर्थ व्यवस्थेची रक्तवाहिनी होती आणि आहे. पण त्या पैशाला या आखाती देशात आणि इतरत्रही म्हणले मात्र जायचे पेट्रो - डॉलर्स याचे कारण म्हणजे तेल किती आणि कधी निर्माण करायचे हे तेल उत्पादक देश एकत्रितपणे ठरवायचे. हे तेल किती व कोणत्या भावाने विकायचे हेही हे तेल उत्पादक देश ठरवायचे निदान सकृतदर्शनी तरी! याबाबतही पडद्याआडचा त्यांचा बोलविता धनी अमेरिका असल्याची चर्चा त्यावेळी खूप रंगात असे. पुढें या तेल उत्पादक देशांच्या एकजूटीत फूट पडली. ही फूटही अमेरिकेनेच पाडली असेही त्याकाळी सर्रास म्हणले जायचे. पण यातल्या प्रत्येक टप्प्यावर या तेल उत्पादक देशांना त्यांच्या तेल निर्यातीचे पैसै मिळायचे ते मात्र अमेरिकी डॉलर्समधे म्हणून ते पेट्रो-डॉलर्स चलनमूल्यांचे राजकारण! अमेरिका ही दादागिरी तेल उत्पादक देशांवर करू शकत असे याचे कारण म्हणजे अमेरिका हा तेलाचा सगळ्यात मोठा आयातदार देश आहे. गंमत म्हणजे अमेरिकेत स्वतःच्या देशात तेलाचे उत्पादन लक्षणिय प्रमाणात होते. पण हे उत्पादन अमेरिकेची तेलाची देशांतर्गत मागणी पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे अमेरिकेला तेलाची आयात करावी लागते. यावर सर्वार्थाने नियंत्रण ठेवणे सोपे व्हावे म्हणून आधी अमेरिकेने तेल उद्योगासहीत या तेल उत्पादक देशांच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेत प्रचंड गुंतवणूक केली. आणि त्याच्या बदल्यात एक महत्वाची अट घातली की हे तेल उत्पादक देश अमेरिका सहीत जगातील इतर देशांनाहीं तेल पुरवठा करु शकतात. पण या तेलाचे पैसे मात्र फक्त अमेरिकी डॉलरमधेच या तेल उत्पादक देशांनी स्वीकारायचे ! जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप नंतरच्या काळात बदलत गेले.

त्यातून फक्त अमेरिकी डॉलर असे स्वरूप न राहता जगातील निवडक देशांच्या चलनाचा समावेश असणारी Global Basket of Selected Currencies ' चा जमाना सुरू झाला. या संचात निवड होणे आणि झालेली निवड टिकवून ठेवणे हा एका स्वतंत्र लेखाचा नव्हे तर , एका स्वतंत्र पुस्तकाचा विषय होईल. याचे थोडे वेगळे स्वरूप म्हणजे युरोपियन युनियन हा युरोपीय राष्ट्रांचा समूह स्थिर - स्थावर झाल्यावर त्यांनी त्या समूहाचे म्हणून ' युरो हे चलन सुरू केले. ही सरळ सरळ इंग्लंडला दिलेली चपराक होती. इतिहासात तुमची दादागिरी सहन केली; , आता तुम्हीं ना आर्थिक दृष्ट्या युरोपमधील इतर काही राष्ट्रंपेक्षा सामर्थ्यवान आहात , ना राजकीय दृष्ट्या सक्षम आहात असे युरोच्या अस्तित्वात येण्यातून इंग्लंडला सांगितलें गेले. एका अर्थाने वस्तू-सेवा कर (GST) जे भारतीय अर्थव्यवस्थेत करत आहे ते किंवा तसे युरो युरोपियन युनियन मधे करत आहे. इथे अजून एक मुद्दा लक्षात घेण्याजोगा आहे. सध्या एक अमेरिकी डॉलर म्हणजे सुमारें ८७ भारतीय रुपये. गेली काही वर्षे एक ब्रिटिश पौंड म्हणजेही सुमारे ८३-८५ रुपये आहेच की! मग काय अमेरिकी अर्थव्यवस्था आणि ब्रिटिश अर्थव्यवस्था साधारणपणे एकाच पातळीवर आहे असे म्हणायचे का? गेली अनेक वर्षे ग्रेट (?) ब्रिटन अमेरिकेची राजकीय व आर्थिक मांडलिक असल्या सारखे वागत आहे आणि त्याच्या बदल्यात ब्रिटिश पाउंडअमेरिका सावरून धरत आहे असा त्याचा अर्थ आहे का? युरोपियन युनियनला धाकात ठेवण्यासाठी इंग्लंडला त्या युरोपियन युनियनपासून बाजूला ठेवणे भाग पाडण्याच्या अमेरिकी राजकीय पावित्र्याची अमेरिका देत असलेली ही आर्थिक किंमत आहे का? या सगळ्या चर्चेला नगण्य ठरवणाराही एक मुद्दा आहे. आणि तो म्हणजे चीनने आपले चलन या सगळ्यापासून स्वतंत्र ठेवणे. त्याचा विनिनमयाचा दर पूर्णपणे चीनी सरकार ठरवते. तो का ठरवला, तो दर कसा ठरवला, तो दर कधी ठरवला याबाबत कधीही एक चकार शब्द न सांगता चीनी सरकार आपले चीनी चलन Pegged Currency म्हणून गेली कित्येक वर्षे चालवत आहे आणि चालवत असते. याबाबतचे चीनी सरकारचे सातत्य जरासुद्धा दुर्लक्ष करण्याजोगे नाही हे निखळ राजकारण आहे हे स्पष्ट असूनही ! आणि म्हणून तर नेहमी म्हणले जायचे आणि जाते की ग्लासनॉस्त झालेच असते तर ते एकवेळ सोव्हिएत रशिया मधे होईल (मिखाईल गोर्बाचेव्हच्या राजवटीत ते झालेही); पण ते चीनमधे कधीही होणार नाही! आपले स्वतःचे चलन अशा आधिकारीक दराने (Pegged Currency) चालवणे चीनला कसे पेलवते हे फार मोठे राजकीय अर्थकारण आहे.

**-चंद्रशेखर टिळक, डोंबिवली**
**मो. ९८२०२९२३७६**

## संक्षिप्त वृत्त

### टीजेएसबी बँकेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड

**अध्यक्षपदी शरद गांगल; उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी**




**ठाणे, दि. १८ जानेवारी-**

देशात नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात सातत्याने आघाडीवर असणाऱ्या टीजेएसबी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली. सदर संचालक मंडळाचा कालावधी २०२४-२५ ते २०२९-३० असा पाच वर्षांसाठी आहे. शरद गांगल, वैभव सिंघवी, शैलेंद्र खांडेकर, रामदास हेगडे, पवनकुमार माहेश्वरी, समीर पाटणकर, सचिन ताटके, डॉ.अश्विनी बापट, पौर्णिमा रानडे, कवी आरसीव्ही शेषाचलम, आणि भाऊसाहेब गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. संचालक मंडळाच्या निवडीसह बँकेच्या अध्यक्षपदी शरद गांगल तर उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी यांची निवड झाली आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष शरद गांगल हे सहकार भारती या सहकारी क्षेत्रात कार्यरत असलेल्या संघटनेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आहेत. बँकेच्या संचालक मंडळात लेखा परिक्षक, उद्योजक, मनुष्यबळ विकास, विधिज्ञ, आर्थिक-सहकार-बँकिंग जाणकार आणि सामाजिक कार्यकर्ते अश्या विविध क्षेत्रातील घटकांचा समावेश आहे.टीजेएसबी सहकारी बँकेच्या महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश अशा पाच राज्यात १४३ शाखा आहेत. बँकेचा एकूण व्यवसाय बावीस हजार कोटींपेक्षा अधिक आहे. बँकेतून अत्याधुनिक तंत्रज्ञान आधारित सर्व प्रकारच्या सेवा दिल्या जातात. टीजेएसबी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बहुराज्यीय सहकारी संस्थाच्या वर्ष २००२ च्या कायद्यानुसार झाली. ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी अशोक शिनगारे यांनी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून तर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे डॉ. किशर मांडे यांनी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून काम पहिले.

### अंत्ययात्रेत ३० हजारांचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

माजी महापौर महेश कोठे यांच्या अंत्ययात्रेत चोरट्याने ३० हजारांचा मोबाईल चोरून नेला.याबाबत लक्ष्मण शेटप्पा इडागोटे (वय ३३, रा. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जानेवारी रोजी रात्री कल्पना टॉकीजजवळ लक्ष्मण इडागोटे हे माजी महापौर महेश कोठे यांच्या अंत्ययात्रेत असताना गर्दीचा फायदा घेत मोबाईल चारेट्याने चोरून नेला. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.


### तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) **टेलिकॉलिंग एक्झिकेटीव्ह** ४ पदे
किमान १२ वी पास

२) **वसुली प्रतिनिधी** ४ पदे
किमान १२ वी पास

३) **मार्केटिंग एक्झिकेटीव्ह** ४ पदे
किमान १२ वी पास

४) **अकौंटंट** २ पदे
पदवीधर, टॅलि व २ वर्षाचा अनुभव

५) **डीटीपी ऑपरेटर** २ पदे
फोटो शॉप, कोरल ड्रॉ, इन डिझाइन व किमान ३ वर्षाचा अनुभव

६) **एच आर** १ पद
एम एस डब्ल्यू, एम.बी.ए.इन एचआर अनुभव आवश्यक

संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क: ७७७४०४४४५९**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.


# समतेच्या यात्रेत सुरक्षेची शिकवण

**कलासंगम फाउंडेशनतर्फे नंदीध्वज मार्गावर बाल न्यायासह प्रबोधनपर रांगोळ्यांच्या पायघड्या**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वरांची यात्रा समतेची यात्रा म्हणून ओळखली जाते. या यात्रा कालावधीत नंदीध्वज मार्गावर रांगोळ्यांच्या पायघड्या घालण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जाते. होमविधीसाठी जाणाऱ्या नंदीध्वज मार्गावर कलासंगम फाउंडेशनतर्फे रांगोळ्यांच्या पायघड्या घातल्या जातात. यंदाच्या वर्षी बालन्यायालय, सिर्फ नजर नही, नजरियाँ बदले यासह विविध सामाजिक संदेश, बालकांच्या हक्काबरोबरच महिला सुरक्षेची शिकवण रांगोळी कलाकृतीतून देण्यात आली.

> 
>
> दरवर्षी विविध विषयांवर रांगोळी साकारण्यात येते. यंदा महिला अत्याचार या विषयांवर रांगोळीच्या माध्यमातून संदेश देण्यात आला. वीरशैव व्हिजनने अल्पोपहाराची सेवा रुजू केली. यासाठी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.
>
> **- रुपा कुताटे,** पदाधिकारी, कलासंगम फाउंडेशन




दरवर्षीप्रमाणे यंदाही कलासंगम फाउंडेशनतर्फे शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या १४ जानेवारी रोजी निघणाऱ्या नंदीध्वज मार्गावर पायघड्या घालण्यात आल्या.




यासाठी एक महिन्यापासून शिवानुभव मंगल कार्यालय येथे मोफत रांगोळी प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये १५० युवक व युवतींसह महिलांचा सहभाग होता. ७०० किलो पांढरी रोगोळी, ८०० किलो कलर रांगोळी, दोन पोती करडी वापरण्यात आला. २३ वर्षांपासून माजी महापौर शोभाताई बनशेट्टी व श्रीशैल बनशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली रांगोळी काढण्यात येत आहे.



### जिजामाता प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची सोय

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदास नगर कोंडी येथे बालाजी अम ईन्स लि. कंपनीच्यावतीने विद्यार्थ्यांकरिता बांधण्यात आलेल्या स्वच्छता गृहाचे उदघाटन बालाजी अमाईन्स लि.कंपनीचे सी.एस.आर अध्यक्ष मल्लीनाथ बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूरचे अध्यक्ष सचिन ठोकळ, व उपाध्यक्ष ॲड. बिपीन ठोकळ, सी.एस.आर.उपाध्यक्ष प्रसाद सांजेकर, मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर, उदय जाधव, इजि.नचिकेत शहा. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. जिजामाता प्राथमिक शाळेतील मुलां-मुलींकरिता बालाजी अमाईन्सने सुसज्ज व सर्व सुविधा युक्त सुमारे साडेपाच लाखाहून अधिक रुपये खर्च करून स्वच्छतागृह बांधून दिले आहे. मुख्याध्यापक कुंटेलू यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### पाकणी फाट्याजवळ अपघातात एकाचा मृत्यू

**सोलापूर, १८ जानेवारी-**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील पाकणी फाट्याजवळ झालेल्या रस्ते अपघातात एकाचा मृत्यू झाला. अपघातात मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव समजू शकलेले नाही. १८ जानेवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास पाकणी फाटा येथे रस्ते अपघातात डोक्यास गंभीर मार लागलेल्या अवस्थेत अनोळखी व्यक्तीला सावळेश्वर टोळ नाक्यावरील रुग्णवाहिकेतील डॉ. इरेश कस्सा यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्यावेळी डॉ. राजदीपसिंग भिसे यांनी त्या अनोळखी व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे घेणार जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे हे सोमवार (दी.२०) जानेवारी रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते जिल्हा परिषद जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा आढावा घेणार आहेत.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर शनिवार ( दि.१८) जानेवारी रोजी सुट्टीच्या दिवशीही सोलापूर जिल्हा परिषदेतील बहुतांश विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयात उपस्थित होते. ही आढावा बैठक सोमवार ( दि.२०) जानेवारी रोजी पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात होणार आहे. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून ना. गोरे यांच्या नावाची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर ग्राम विकास मंत्री गोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या आढाव्यासाठी बोलाविलेल्या बैठकीस महत्त्व प्राप्त झाले आहे. या आढावा बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, यांच्यासह प्रशासन विभागाच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांच्यासह इतर विभाग प्रमुख उपस्थित राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र ना. गोरे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या आढावा बैठकीच्या तपशीला संदर्भात जिल्हा परिषद मुख्यालयास अद्याप कोणतेही अधिकृत पत्र प्राप्त झाले नसल्याचे सांगितले जात आहे.

## महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धा

**प्रथमच होणाऱ्या स्पर्धेचे नियोजन अंतिम टप्प्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १८ जानेवारी-**

सोलापूर : सोलापूर महापालिकेतील अधिकारी - कर्मचाऱ्यांसाठी लवकरच क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

महापालिका अधिकारी- कर्मचारी यांचे आरोग्य उत्तम रहावे. या उद्देशातून आता महापालिका प्रशासन आणि महापालिका क्रीडा विभागाकडून या क्रीडा स्पर्धेचे नियोजन करण्यात येत आहे. अशा प्रकारची ही क्रीडा स्पर्धा प्रथमच होत आहे .

महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून यापूर्वी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी त्यांच्या अखत्यारित येणारे मालमत्ता कर विभाग भूमी व मालमत्ता विभाग यासह इतर विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी योगा प्रशिक्षण वर्ग आणि योगाचे आयोजन केले होते. महापालिकेतील त्या विभागासह इतर विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील यामध्ये चांगला सहभाग नोंदविला होता. महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांच्या प्रतिसादामुळे त्यांना सतत खेळाच्या माध्यमातून त्यांच्या उत्तम आरोग्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना आखण्यात आल्या. याच धर्तीवर आता महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांना दैनंदिन कामकाजाबरोबर खेळाप्रती आवड निर्माण व्हावी यासाठी लवकरच महापालिकेच्या वतीने क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भातील तसे निर्देशही महापालिका आयुक्तांनी दिलेले आहे. त्यासाठी इच्छुक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घ्यावा यासाठी विभाग निहाय अधिकारी कर्मचारी यांचे त्या त्या खेळासाठीची यादी तयार करण्यात येत आहे. इच्छुक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कोणत्या खेळामध्ये भाग घ्यायचा आहे त्यांची नावे संकलित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. ही प्रक्रिया पूर्ण झाली असून मोठ्या प्रमाणात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नावे विभाग प्रमुखांच्या शिफारशीनुसार विविध खेळांसाठी घेऊन तशा याद्या तयार करण्यात आल्या आहेत. या याद्या उपायुक्त आशिष लोकरे यांच्या निर्देशानुसार त्या त्या विभागाकडून क्रीडा विभागाकडे सादर करण्यात आले आहेत. लवकरच महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसाठीच्या विविध अकरा खेळांना घेऊन क्रीडा स्पर्धा पार पडणार असल्याने याचा आनंद घेण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी तयारीला लागले आहेत. प्रथमच अशा पद्धतीने क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

> **या खेळांचा राहणार समावेश**
>
> आता महापालिकेतील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२४-२५ या वर्षासाठीची महापालिका क्रीडा विभागाकडून क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. क्रीडा स्पर्धेमध्ये क्रिकेट, बुद्धिबळ, सायकलींग (रोड रेस- ट्रॅक रेस), व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कॅरम, खो-खो, बॅडमिंटन, शूटिंग बॉल, जलतरण (वॉटर पोलो- डायव्हिंग) आणि अन्य मैदानी खेळ अशा खेळांचा समावेश राहणार आहे.


## बैद्यनाथ शंखपुष्पी- एक आयुर्वेदिक ब्रेन टॉनिक

**शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक मुलाची व त्याच्या आई-वडिलांची ही इच्छा असते की, त्यांचा मुलगा/मुलगी उत्तम गुण मिळवून पास व्हावा. त्यामुळे परिक्षेची तयारी म्हणजे एक मिशनच बनून जात. प्रत्येकच जणू हे मिशन उत्कृष्ट रीतीने पार पाडू इच्छितो. परंतु भीती पोटी काही संवेदनशील मुले ह्या मानसिक तणावामुळे नैराश्यग्रस्त होतात. मुलांवर हा मानसिक तणाव तीन स्तरांवर दिसून येतो. शाळेच्या प्री-बोर्ड व बोर्डाची वार्षिक परिक्षा व विद्यार्थ्यांना हयाबाबत वाटणारे भय हा आज एक चिंतेचा विषय बनला आहे. कधी कधी पेपर फुटल्यामुळे अभ्यास करणाऱ्या मुलांवर टेन्शन (तणाव) अधिकच वाढतांना दिसून येते.**

---




वेगवेगळ्या (प्रोफेशनशी) व्यवसायाशी संबंधीत स्पर्धात्मक परिक्षा देतांना, करिअर विकासाच्या तणावामुळे मुलं आत्मघाती बनत आहेत. आजच्या या आंधळया (नेत्रहीन) प्रतियोगितेच्या काळात आई वडिलांच्या मुलांकडून अभ्यासा संबंधीच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. आई वडील मुलांच्या क्षमतेचा विचार न करता अपेक्षा करतात की, मुलगा एकदम मेरीट मध्येच यावा किंवा त्याने ९०% गुण मिळवावेत जेणेकरून त्यांचा समाजात रूबाब वाढेल. त्यांच्या स्टेटसचे हे एक चिन्ह बनलेले आहे. त्यांचे हे विचार मुलांवर दबाव आणून त्यांना मानसिक व्याधीनी पिडीत बनवितात किंवा मुलं, आपण हे सगळ करू शकत नाही म्हणून हीन भावनेनी ग्रस्त होतात. आणि अशावेळी त्यांना समजून घेणारे कोणीच राहत नाही. वर वर्णित स्थितीमुळे मुलांकरिता परिक्षा म्हणजे एक भीतीदायक बाब बनून जाते. त्यांची जेवणाची इच्छा मरून जाते. चिडचिडेपणा वाढतो, सतत डोकं दुखत राहतं, कधी कधी तर नैराश्यामुळे तर तो विचित्र वागू लागतो. आई वडिलांनी, मुलाच्या (विद्यार्थ्यांच्या) मानसिक स्थितीवर संपूर्ण लक्ष द्यायला पाहिजे. त्यांच्यावर अभ्यासाचा आवश्यकते पेक्षा जास्त भार देऊ नये किंवा त्याची क्षमता पाहून त्यांना अभ्यास करावयास लावावं व त्यासोबत त्याला योगासन करावयास लावावे व हया सोबत हानीरहीत आयुर्वेदिक जडीबुटी (ब्राम्ही व शंखपुष्पी) वापराव्यात. हयाच ब्राम्ही व शंखपुष्पीच्या मिश्रणाने बनलेला योग बैद्यनाथ शंखपुष्पी सिरप मुलांना दयायला हवे. ब्राम्ही व शंखपुष्पी ला सेन्ट्रल ड्रग रिसर्च इंस्टीट्युट ने एकाग्रता वाढविण्यास सहाय्यक जडी बुटीच्या रूपात मान्यता दिली आहे. ब्राम्ही व शंखपुष्पीचे सिरप मुलांना दिल्यास त्यांना परिक्षेच्या वेळी होणारी डोके दुःखी, चिडचिडेपणा दूर होऊन मुले शांत मनस्थितीने कार्य करण्यात रूची दाखवितात. श्री वैद्यनाथ आयुर्वेद भवन मध्ये शंखपुष्पी सिरप ची निर्मीती आयुर्वेद तज्ञांच्या देखरेखीत व आयुर्वेद ग्रंथात वर्णित विधीने केली जाते.

**- डॉ. रमेश शर्मा** एम.डी. (आयुर्वेद)


# भारतीय पुरुषसुध्दा उपांत्यफेरीत फेरीत

**दक्षिण आफ्रिकेविरुध्द लढणार, भारतीय पुरुषांकडून श्रीलंकेचा ६० गुणांनी धुव्वा**

**पुरुष संघाचेसुध्दा गुणांचे शतक**

**रामजी कश्यप सामन्याचा मानकरी**

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, १८ जानेवारी-**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारताच्या पुरुष संघाने सुध्दा महिलांपाठोपाठ गुणांचे शतक करत मोठा विजय साजरा केला. या सामन्यात भारताने श्रीलंकेवर १००-४० (मध्यंतर ५८-१८) असा ६० गुणांनी चमकदार विजयाची नोंद केली व उपांत्य फेरीत धडक मारली. रामजी कश्यप, प्रतीक वाईकर, आणि आदित्य गणपुले यांच्या अप्रतिम कामगिरी भारताने उपांत्य फेरीत प्रवेश केला. रामजी कश्यप या सामन्यात सामन्याचा मानकरी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. भारताच्या दोन्ही संघाची उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेशी लढत होईल.

**सामन्याचा आढावा :**

पहिल्या टर्नमध्ये श्रीलंकेला एकही गुण मिळवू न देत भारताने वर्चस्व गाजवले. दुसऱ्या टर्नमध्ये श्रीलंकेच्या आक्रमकांनी प्रयत्न केले; अनिकेत पोटे आणि आदित्य गणपुले यांनी मैदान गाजवले. मात्र, भारतीय संघाने मिळवलेली मोठी आघाडी श्रीलंकेसाठी फारशी आव्हानात्मक ठरली नाही. तिसऱ्या टर्नमध्ये भारताने आक्रमणात गती आणली. शिवा रेड्डी, व्ही. सुब्रमणी, आणि वजीर प्रतीक वाईकर यांनी अप्रतिम स्काय डाईव्ह व पोल डाईव्ह करत श्रीलंकेला दबावाखाली ठेवले. तिसऱ्या टर्नच्या शेवटी भारतीय संघाने १०० गुणांचा पल्ला गाठून सामना जवळपास जिंकला होता. शेवटच्या टप्प्यात पाबनी सबर, अनिकेत पोटे, आणि शिवा रेड्डी यांनी संयमाने खेळ करत विजयावर शिक्कामोर्तब केले. सामन्याचा अंतिम गुफालक १००-४० असा होता. या विजयासह भारताने उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. आज झालेले अन्य उपांत्यपूर्व निकाल (विजयी व उपविजयी याप्रमाणे) : पुरुष : इराण वि. केनिया ८६-१८, दक्षिण आफ्रिका वि. इंग्लंड ५८-३८, नेपाळ वि. बांगलादेश ६७-१८. या स्पर्धा पाहण्यासाठी देशासह विदेशातील क्रीडाप्रेमींनी हजेरी लावली होती.



> **असे होणार उपांत्य सामने :**
>
> पुरुष : भारत वि. दक्षिण आफ्रिका, इराण वि. नेपाळ.
>
> महिला : भारत वि. दक्षिण आफ्रिका, नेपाळ वि. युगांडा.


**तृतीय पुण्यस्मरण**
**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**



**स्व. श्रीमती लिलावती वेंकटसा मेघराज**
स्वर्गवास - १९/०१/२०२२
शके १९४३, पौष कृ. २ आश्लेषा

**आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !**

* शोकाकुल *
**ॲड.अनिलकुमार मेघराज व अरुण मेघराज परिवार सोलापूर**
**भाग्यनगर-कर्नाटक**
**खटवटे परिवार-गदग (कर्नाटक)**

**भावपूर्ण श्रद्धांजली**



**कै. महेश (अण्णा) विष्णुपंत कोठे**
(माजी महापौर, सोलापूर)

**शोकाकुल**
**विरेंद्र विश्वनाथ हिंगमिरे**
**मंगल भांडार व कर्मचारी वृंद**



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जुना बोरामणी नाका येथे धडक देणाऱ्या ट्रकचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

शहरातील जुना बोरामणी नाका येथे दुचाकीस्वारास धडक देऊन जखमी करणाऱ्या ट्रकचालकाविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल आनंदराव शिंदे (वय ५२, रा. बसतवड, ता. तासगाव, जि. सांगली) यांच्या फिर्यादीवरुन रोहित महादेव बिंदले (वय ३०, रा. आरग, ता. मिरज, जि. सांगली) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ जानेवारी रोजी अनिल शिंदे हे मार्केट यार्ड येथून मोटारसायकलवरून फळे घेऊन जाताना जुना बोरमानी नका येथे एमएच १३ ऐके ४६८७ क्रमांकाच्या ट्रकने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत अनिल शिंदे हे जखमी झाल्याने याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात ट्रकचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करणाऱ्या दोघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अब्दुल रेहमान अफसर शेख (वय १९, रा. संजय गांधी नगर गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २, जुना विजापूर नाका, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन गंगा राम चंद्र जेलबंडी आणि सिध्दू मदन मडिखांबे (रा. आम्रपाली चौक, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ जानेवारी रोजी रात्री ११ च्या सुमारास नुराणी मशिदजवळील अलवाहिद किराणा दुकानामध्ये अब्दुल रेहमान शेख हा दुध पाकिट व पाणी बॉटेल घेण्यासाठी चुलत भाऊ कासिम महंमद अली शेख सोबत थांबला होता. त्यावेळी गंगा जलबंडी व सिध्दू मडीखांबे या दोघांनी हातातील लोखंडी रॉड व चामडी बेल्टने मारहाण करून जखमी केले. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक वाल्मिकी पुढील तपास करीत आहेत.

### बांधकामाचे डस्ट टाकण्याच्या कारणावरून महिलेस दमदाटी

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

बांधकामाचे डस्ट टाकण्याच्या कारणावरून महिलेस दमदाटी करून शिवीगाळ करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. याबाबत वृषाली मोहनराव देशपांडे (वय ३९, रा. शिवाजी नगर, सात रस्ता, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अकलाक रफिक शेख (वय २७, रा. शिवाजी नगर, मोदी, सात रस्ता, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकलाक शेख याच्या घराचे बांधकाम चालू आहे. १७ जानेवारी रोजी अकलाख शेख हा घरासमोर बांधकामाचे डस्ट रिकामा करीत होता. त्यावेळी वृषाली देशपांडे यांच्या घरात धुळ आल्यानो त्यांनी अकलाक शेख यास तुमच्या घरासमोर डस्ट खाली कर असे म्हणाल्यानंतर शेख याने देशपांडे यांच्या अंगावर धावून जाऊन शिवीगाळ व दमदाटी केली. सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर तपास करीत आहेत.

### सिध्देश्वर पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

शहरातील सिध्देश्वर पेठेतून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत नरेश अनिल संगा (वय ४५, रा. किरण नगर, स्वागत नगर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास नरेश संगा यांनी त्यांची एचएच १३ सीडी ५५८१ क्रमांकाची दुचाकी ही सिध्देश्वर पेठेत हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

### जोडभावी पेठेत बंद दुकान फोडून ८५ हजारांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

जोडभावी पेठेतील साईनाथ ट्रेडिंग कंपनीचे बंद दुकानाचे कुलूप तोडून चोरट्याने ८५ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत किशार बंकटलाल भट्टड (वय ६४, रा. सम्राट चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईनाथ ट्रेडिंग कंपनी नावाचे दुकानाचे कुलूप १६ जानेवारीच्या रात्री तोडून चोरट्याने दुकानातून ईलायची, पिस्ता, काजू, बदाम, काळी मिरी, केशर, फ्लेवर काजू आदी ड्रायफ्रुटची पोती व डब्बे आणि रोख रक्कम असा ८५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पडसळकर तपास करीत आहेत.

### रस्ते अपघातात वृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

टेंभुर्णी-करमाळा रोडवरील कंदर गावाजवळील पाटील पेट्रोल पंपाजवळ रस्ते अपघातात वृध्दाचा मृत्यू झाला. त्रिंबक पांडुरंग बेडकुते (वय ६०, रा. लक्ष्मी देवी मंदीराजवळ, पारगा, पुणे) असे मरण पावलेल्या वृध्दाचे नाव आहे. १७ जानेवारी रोजी सायंकाळी पाटील पेट्रोल पंपाजवळ रस्ते अपघातात त्रिंबक बेडकुते हे डोक्यास मार लागून बेशुध्दावस्थेत मिळून आले होते. त्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारापूवीच मृत्यू झाल्याचे डॉ. राजदिपसिंग भिसे यांनी घोषित केले.

# शिवचरित्र अभ्यासाबरोबरच आचरणाचा विषय

## प्रशांत देशमुख | पंढरपूर अर्बन बँकेच्या व्याख्यानमालेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र हे केवळ ऐकण्याचा, अभ्यासाचा किंवा अभिमानाचा विषय नसून आजच्या युवकांनी याचे आचरण करण्याचा विषय आहे. महाराजांच्या एक एक घटना पाहिल्या तर यामधून याकाळात देखील जगण्याचा मंत्र मिळतो असे प्रतिपादन रायगड येथील प्रसिध्द शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले.

येथील दि पंढरपूर अर्बन को.ऑप.बँकेच्या वतीने आयोजित देशभक्त कै.बाबुराव जोशी व्याख्यानमालेस प्रारंभ झाला असून याच्या पहिल्या दिवशी देशमुख हे बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन सौ.सीमा प्रशांत परिचारक यांच्या हस्ते तसेच बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्षा माधुरी जोशी यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले.प्रशांत देशमुख यांनी आपल्या अतिशय ओघवत्या व उत्स्फुर्त शैलीमध्ये उठ युवका जागा हो शिवचरित्राचा तू धागा हो या विषयावर जवळपास दीड तास उपस्थित प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

देशमुख यांनी, छत्रपती शिवाजी महाराज हा आपला स्वाभिमान असून मराठी मातीचे महान सुपुत्र आहेत. महाराजांच्या आयुष्यातील एक प्रसंग अतिशय विलक्षण असून यामधून मोठा संदेश मिळतो. जवळपास



चारशे वर्षा नंतर देखील महाराजांनी दिलेली शिकवण, त्यांच्या आयुष्यात आलेले विविध प्रसंग पाहिल्यावर ते ज्या प्रमाणे वागले ते पाहून आजच्या काळात देखील कसे जगावे याची शिकवण मिळते असे प्रतिपादन केले. यासाठी देशमुख यांनी काही उदाहरण दिली. आजची पिढी लगेच हताश होते, टोकाचे पाऊल उचलून आत्महत्येचा मार्ग स्वीकारते. मात्र महाराजांनी मोठ्या कष्टाने राज्य मिळविले. मात्र मिर्झाराजे जयसिंग यांच्या बरोबर झालेल्या तहात त्यांना आपले किल्ले व अनेक गोष्टींचा त्याग केला. परंतु तरीही त्यांनी हार मानली नाही, औरंगजेबाच्या कैद म्हणजे मृत्यू परंतु यावरही हुशारीने मात करून तेथून निसटले असे प्रसंग

**शिवछत्रपती सर्वोत्तम नेते होते :** सुरतमध्ये विधवा स्त्रीच्या घराचे संरक्षण केले. कारण तिचा पती वारला होताच. परंतु तो दानधर्म करणारा होता. यावरून चांगल्या कर्मावर त्यांचा विश्वास होता. सर्व जातीला बरोबर घेणारा, त्यांच्यातील गुणांना वाव देणारा हा राजा सर्वोत्तम नेते होते असे सांगून देशमुख यांनी केवळ घोषणाबाजी करून महाराज समजणार नाहीत यासाठी त्यांच्या शिकवणुकीचे आचरण करा असा सल्ला दिला.

पाहिल्यावर संकटाला पाठ न दाखविता त्यावर मात करणे शिकवते. शत्रुच्या स्त्रीवर हात टाकणार्या आपल्या सरदाराला व पत्नीच्या भावाला देखील भर सभेत शिक्षा करून त्यांनी कायदा सर्वांना समान असल्याचा संदेश दिला. प्रास्ताविक बँकेचे संचालक हरिष ताठे यांनी, सूत्रसंचलन शांताराम कुलकर्णी यांनी तर आभार डॉ.संगिता पाटील यांनी मानले. यावेळी पांडुरंग कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे, बाजार समितीचे माजी सभापती दाजी भुसनर, पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांतभैय्या देशमुख यांच्यासह पंढरपूर अर्बन बँकेचे संचालक पांडुरंग घंटी, विनायक हरिदास, अमित मांगले, गणेश शिंगण, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ज्ञ संचालक प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे आदी उपस्थित होते.

# मुख्याध्यापकांसह शिक्षकांचे होणार समायोजन

● सीईओ जंगम यांनी काढले पत्र

### अतिरिक्त गुरुजींना मिळणार दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

उपसंचालक शिक्षण विभाग, पुणे यांच्याकडील मंजूर, ऑनलाइन प्राप्त संचमान्यता सन २०२३-२४ नुसार मराठी, उर्दू व कन्नड माध्यमांचे अतिरिक्त झालेले मुख्याध्यापक, उपशिक्षक व पदवीधर शिक्षक, विषय शिक्षक यांचे समायोजन करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील प्रक्रिया २३ व २४ जानेवारी २०२५ रोजी पूर्ण करण्याबाबतचे पत्र जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी काढले



आहे. त्यामुळे अतिरिक्त गुरुजींना मोठा दिलासा मिळणार आहेत.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात ३० सप्टेंबर २०२३च्या पटसंख्येनुसार संचमान्यता झाली होती. ज्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची कमी झाली आहे, त्या ठिकाणचे शिक्षक व मुख्याध्यापक अतिरिक्त ठरले आहेत. ज्या ठिकाणचे रिक्त पदावर समायोजन होणार आहे. त्यामुळे जिथे खरोखर शिक्षकांची गरज आहे, त्या ठिकाणी शिक्षक मिळणार आहेत. संबंधित तालुका पातळीवरील यंत्रणेने प्रचलित कार्यपध्दतीचा व शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना यांचा अवलंब करून समायोजन करण्यात यावे, समायोजन पूर्ण होताच परिपूर्ण कागदपत्रासह अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयास सादर करावा, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. विलंबाची सर्वस्वी जबाबदारी त्या-त्या तालुका गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी यांची असणार आहे.

**शाळांची गुणवत्ता वाढण्यास होणार मदत**

या नव्या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळांची व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या निर्णयाचे शिक्षक संघटनांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळांची व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या निर्णयाचे शिक्षक संघटनांनी स्वागत केले आहे.

**अशी राबविली जाणार समायोजन प्रक्रिया**

प्रत्येक तालुक्याकडून माहिती मागवून सीईओंची मान्यता घेतली जाते. अतिरिक्त शिक्षकांना आणि रिक्त पदे असलेल्या शाळांना हरकती सादर करण्याची मुदत ठेवली जाते. समानीकरणाच्या तत्त्वानुसार शिक्षकांचे समायोजन केले जाते. दोन दिवसाच्या कालावधीत समायोजन प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

# महिलेला मारहाण करणाऱ्या सातजणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

मागील भांडणाचा राग मनात धरून महिलेला मारहाण करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुभद्रा जनार्दन बनसोडे (वय २२, रा.मातंग वस्ती, शुक्रवार पेठ) या महिलेच्या फिर्यादीवरुन मच्छिंद्र बनसोडे, शहा मच्छिंद्र बनसोडे, योगेश बनसोडे, दादावर बनसोडे, अमोल बनसोडे, टिल्लेश अनिल बनसोडे, विनोद खंडू बनसोडे (रा. मातंग वस्ती, समाचार चौक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ जानेवारी रोजी रात्री समाचार चौकात सुभद्रा बनसोडे व त्यांचा पती, मुलगा हे सर्वजण मिळून घरात जेवण करीत होते. त्यावेळी शेजारी राहणारे मच्छिंद्र बनसोडे व इतरांनी मिळून मागील भांडणाचा राग मनात धरून दमदाटी करून सुभद्रा यांना शिवीगाळ करून मायावती शिवाजी बनसोडे, प्रसाद संभाजी बनसोडे यांना लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक जाधव तपास करीत आहेत.

# पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी -**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कविता संतोष केंगनाळ (वय २६, रा. स्टेशन रोड, जुलाई गल्ली, गच्चीमाल, जि. विजापूर, कर्नाटक) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती संतोष, सासरे सूर्यकांत (रा. स्टेशन रोड, जुलाई गल्ली, गच्चीमाल, जि. विजापूर, कर्नाटक), मोठी नणंद श्रीदेवी कंगोड (रा. महालतांडा, विजापूर), नणंद विद्या शिवानंद बिराजदार, शोभा रेवणसिध्द तडलगी (रा. कन्नूर दर्गा, विजापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला



आहे. २५ जून २०२१४ ते १७ जानेवारी २०२५ पर्यंत कविता या लग्नानंतर सासरी नांदत होत्या.

यावेळी पती संतोष व इतरांनी संगनमत करून वारंवार माहेरून नवऱ्याचे कर्ज फेडण्यासाठी २ लाख रुपये घेऊन ये म्हणून तगादा लावून कविता यांना शिवीगाळ करून मारहाण करून छळ केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.



# एसटी स्टॅन्डसमोर तरूणास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी -**

शहरातील एस टी स्टॅन्डसमोरील कृष्णा टी हाऊस समोर तरूणास मारहाण करण्यात आली. बब्रुवान नामदेव कांबळे (वय ३०, रा. हिरज) असे जखमीचे नाव आहे. १८ जानेवारी रोजी पहाटे पावणे दोनच्या सुमारास कृष्ण टी हाऊससमोर अज्ञात कारणावरून कांबळे यास अनोळखी तीन जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यामध्ये कांबळे याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास विकी कोराळे याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

केगाव येथे दुचाकीस्वारास धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कंटेनरचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गुलाब अल्लाउद्दीन कोरबू (वय ३२, रा. कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन कंटेनर क्र. एनएल ०१ एएसच ०६३९ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमीन अल्लाउद्दीन कोरबू (वय ३६, रा. कुंभारी) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. १७ जानेवारी रोजी सकाळी दहाच्या सुमारास अमीन कोरबू हे त्यांच्या एमएम १३ डीसी ४२४८ या दुचाकीवरून



केगाव येथून सोलापूरकडे येत होते. त्यावेळी पूना रोडवरील एम आयटी कॉजेलजवळ पाठीमागून येणाऱ्या एनएल ०१ एएच ०६३९ क्रमांकाच्या कंटेनर चालकाने कंटेनर भरधाव चालवून कोरबू यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात अमीन कोरबू हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात कंटेनरचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# महिलेच्या गळ्यातील ६० हजारांचे गंठण धूम स्टाईलने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

लग्न कार्यावरून घराकडे जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीचे १२ ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने धूम स्टाईलने हिसका मारून चोरून नेणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शरिफा मौला शेख (वय ५८, रा. होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ जानेवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास शरिफा शेख या लग्न कार्यावरून पायी घराकडे जात होत्या. त्यावेळी शंकर नगरमधील कामशेट्टी यांच्या हार्डवेअरच्या दुकानाजवळ आल्यानंतर समोरून दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांपैकी पाठीमागे बसलेल्या चोरट्याने शेख यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीचे १२ ग्रॅमचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

# स्वामित्व सनद वाटप योजनेतून जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न

## आमदार सचिन कल्याणशेट्टी | जिल्ह्यातील पाच हजार नागरिकांना स्वामित्व सनद वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

केंद्र सरकारच्या स्वामित्व योजने अंतर्गत आज दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी संपूर्ण देशातील २४६ जिल्ह्यातील ५८ लाख लाभार्थी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते आभासी पध्दतीने सनद वाटप कार्यक्रम झाला. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४ हजार ८५९ स्वामित्व सनद वाटप जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सचिन कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

स्वामित्व सनद वाटप कार्यक्रम नियोजन भवन येथील सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार सचिन कल्याणशेट्टी होते तर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा भूमिलेख अधीक्षक दादासाहेब घोडके, नगर भूमापन अधिकारी गजानन पोळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वामित्व योजने बाबतचे व ग्रामीण विकासाबाबतचे महत्व सर्वांना पटवून सांगितले. या अंतर्गत ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा एक प्रयत्न आहे. त्यानुसार केद्र शासन, भूमि अभिलेख विभाग व ग्रामविकास यंत्रणामार्फत लोकांना स्वांतत्र्यपूर्व काळापासुन अद्यापपर्यंत न झालेले त्यांचे घरांचे अभिलेख



तयार करुन त्यांचा मालकी हक्काचा पुरावा म्हणून प्रत्येक गावठाणामधील घरांचा नकाशा व सनद अत्याधूनिक ड्रोन सर्व्हे द्वारे तयार केले आहेत. या तयार झालेल्या अभिलेखामुळे गावामधील लोकांना देखील गृहकर्ज मिळणेस मदत होणार आहे. त्या मिळणा-या कर्जामुळे लघु उद्योगधंदे यांना चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख . घोडके यांनी स्वामित्व योजनेचे व सनदेचे महत्व विषद केले व त्यासंदर्भातील चित्रफित सादर केली. यावेळी जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४८५९ नागरिकांना स्वामित्व हक्काची सनद मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आमदार सचिन कल्याण शेट्टी व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सनद वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक घोडके यांनी केले तर आभार गजानन पोळ यांनी मानले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००७

**तुका म्हणे नाशिवंत हें सकळ ।**
**आठवे गोपाळ तेंचि हित ।।**

जगाच्या पाठीवर निर्माण झालेली प्रत्येक वस्तू, प्रत्येक जीव हा पंचतत्वातून निर्माण होत असतो. निर्माण झालेली प्रत्येक वस्तू, प्रत्येक जीव कालांतराने का होईना पण विनाश पावते. त्याचे हे विनाशत्व अखेरीस पंचतत्वातच विलीन होते. पंचतत्वातून निर्माण होणे व शेवटी पंचतत्वात विलीन होणे हा निसर्गाचा नियम आहे. या नियमात कोणालाही बदल करता येत नाही. हे सर्व सत्य असले तरीही संसाराच्या मायाजाळात अडकलेल्या जीवाला निसर्गाच्या या नियमाचा विसर पडतो हे ही सत्यच आहे. पण संसारात राहून संसारात न अडकणाऱ्या कांही जीवाला नाशवंताबाबतची आठवण होते. सर्व नाशवंत असल्याचे लक्षात आल्याने हा जीव सत्याचा शोध घेऊ लागतो. त्याची सत्याच्या शोधाची तळमळ त्याला त्याचा खरा परिचय करून देते. स्वत:चा खरा परिचय करून घेण्यातच म्हणजेच स्वत:ची खरी आठवण होऊन वागण्यातच माणसाचे खरे हित आहे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे नाशिवंत हे सकळ। आठवे गोपाळ तेंचि हित।।



तुकाराम महाराज

प्रत्येक मानवी जीव रडत-रडत जन्माला येतो. हा जीव रडला म्हणजे त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून त्याचे आप्तेष्ट आनंद व्यक्त करतात. हा जन्मलेला जीव जन्मल्याबरोबर रडला नाही तर मुडदा जन्मला म्हणून त्याचे आप्तेष्ट रडतात. रडत जन्माला येणारा जीव आयुष्यभर नको ते करीत राहातो. त्याचे नको ते करणे एके दिवशी त्यालाही रडवते व त्याच्या आप्तेष्टांनाही रडवते. हे सर्व केवळ मी म्हणण्याने होते. या जीवाला स्वत:चा खरा परिचय झाला असता व नाशवंतपणाची जाणीव झाली असती तर याच्यावर व याच्यासाठी किंवा याच्यामुळे इतरांना रडण्याची वेळ आलीच नसती. पण संसारात अडकलेल्या या जीवाला माया, मोह, ईर्षा, द्वेष, अहंकार, मत्सर, काम, क्रोध हे सर्व आपलेच वाटतात. या सर्वांना आपले म्हणण्यामुळे हा जीव खऱ्या अर्थाने स्वत:पासून दूर जातो. स्वत:पासून दूर जाणारा जीव सुखी असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आपण भौतिक सुखासाठी जे कांही जमवाजमव करीत आहोत ते एके दिवशी नाश पावणारच आहे. एवढेच काय तर आपण स्वत:ही नाश पावणार आहोत. याची जाणीव झाली तर अकारण जमवाजमव करावी वाटणार नाही. जमवा जमवीतून बाहेर पडणारा माणूस निश्चितच सुखी होऊ शकतो. जमवा जमव सहजासहजी होत नसते. यासाठी बऱ्याचवेळा कोणालातरी फसवावे लागते, वाममार्ग अवलंबवावा लागतो. अर्थात, नीती-नियम पायदळी तुडवून लुबाडणूक करावी लागते. स्वत:चा परिचय झाला तर इतरांना लुबाडून जमा केलेले आपल्यासकट काळ एके दिवशी लुबाडणार आहे, याची जाणीव होते. त्यामुळे लुबाडणूकीचे विचार नष्ट होऊन कर्तव्याचे सुविचार जोपासले जातात. मानवी मनाची ही सकारात्मक अवस्था हेच मानवी जीवनाचा सार होय. हा सार ज्याला अनुभवता येतो तो खऱ्या अर्थाने आनंदी जीवन जगत असतो. आपणा सर्वांना असे आनंदी जीवन जगता आले पाहीजे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - |
| दि. १९ जानेवारी २०२५ | कोटणीस महाराज पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. पंचमी - (०७.३०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ.फाल्गुनी (१७.२९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (२५.५६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२०.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी मिळेल. आर्थिक समाधानी रहाल.

# अल्पवयीन मुलगी झाली माता

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

कळंब (जि. धाराशिव) येथील सरकारी दवाखान्यात एका अल्पवयीन मुलीने पुरुष जातीच्या बाळाला जन्म दिला. त्या निर्भयाकडे चौकशी केल्यानंतर तिच्यावर लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करण्यात आला असल्याचे समजून आल्याने याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत निर्भयाच्या फिर्यादीवरुन अशोक मच्छिंद्र शेळके (वय २४, रा. पांढरेची वाडी, जि. बीड) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत निर्भयाच्या पोटात दुखत असल्यामुळे तिच्या आई-वडीलांनी तिला कळंब येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले असता ती गर्भवती असल्याचे व तिची डिलीव्हरी होणार असल्याचे सांगून निर्भयाला ॲडमीट केले. त्यावेळही १६ जानेवारी रोजी निर्भयाने पुरुष जातीच्या बाळाला जन्म दिला. निर्भयाची मानसिक स्थिती ठीक झाल्यानंतर तिला विचारल्यानंतर तिने सांगितले की, लग्नाचे आमिष दाखवून अशोक शेळके याने बाळे परिसरात असताना तिच्याशी शरीरीसंबंध ठेऊन तिच्यावर अत्याचार केला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.

### चार वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर** : चार वर्षाच्या बालिकेवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत बालिकेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन अल्लाबक्ष हुसेन कंकाळ (वय ५०, रा. सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ जानेवारी रोजी दुपारी यातील पिडीत बालिका ही घरी मोबाईल बघत बसलेली असताना अल्लाबक्ष कंकाळ याने तिला बोलावून घेऊन जाऊन तिच्यावर अत्याचार केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक खामकर पुढील तपास करीत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (२५) कवच

दिनांक १ जानेवारी १९३८ ला काटोल येथील नागपूर जिल्हा शिबिराचा समारोप करताना लोकनायक बापूजी अणे म्हणाले एका बाजूने औदासिन्याचा खडक व एका बाजूने विरोधाची माती पोखरीत रा.स्व. संघाची नदी प्रभावीपणे वाहते आहे. त्यामुळे सर्वांनाच संघाशी मिळते जुळतेच घ्यावे लागेल असा विश्वास त्यांनी प्रगट केला होता. ते म्हणाले रा.स्व संघ ही संघटना म्हणजे राष्ट्राचे कवच आहे. समाजाभिमुख स्वभावाचे डॉक्टर माझ्या समाजाकरता मी आहे ही भावना विसरून माझ्या करिता समाज आहे या भावनेला कवटाळा असा आग्रह धरतात. मी व राष्ट्र दोन्ही एकच असे मानून राष्ट्र व समाज यांच्याशी जो तन्मय होतो तोच खरा राष्ट्रसेवक असतो. मी एक माणूस. माणूस हा समाजशील प्राणी आहे. तेव्हा समाज जिवंत राहील तरच मी जिवंत राहू शकेल. यासाठी विश्वासाने लक्षपूर्वक मी माझ्या स्वभावाची तपासणी करेल असा निश्चय करा.

**- क्रमशः**

### जेएसएस पॉलिटेक्निक फॉर द डिफरंटली एबल्ड संस्थेतर्फे

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक अभ्यासक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

जेएसएस पॉलिटेक्निक फॉर द डिफरंटली एबल्ड संस्थेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती उपप्राचार्य एन. एम. शिवकुमार स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जेएसएस महाविद्यापीठाने स्थापलेल्या जेएसएस पॉलिटेक्निक फॉर द डिफरंटली एबल्ड, म्हैसूर, भारतातील आपल्या प्रकारचे पहिले आणि कर्नाटकातील एकमेव पॉलिटेक्निक आहे. यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्यात येते. या महाविद्यालयात पॉलिटेक्निक सात ३-वर्षीय डिप्लोमा कोर्स उपलब्ध आहे. तसेच आर्किटेक्चर असिस्टंटशिप, व्यावसायिक सराव, संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन अभियांत्रिकी, ज्वेलरी डिझाइन आणि तंत्रज्ञान, संगणक अनुप्रयोग (विशेषत: दृष्टिहीनांसाठी) आणि पोशाख डिझाइन आणि फॅब्रिकेशन तंत्रज्ञान आदी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.दरम्यान, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग आणि इलेक्ट्रिकल व्हेईकल टेक्नॉलॉजीमध्ये नवीन डिप्लोमा कोर्स सुरु करण्यात आला आहे.

अस्थिव्यंग, श्रवणदोष किंवा दृष्टिदोष असलेले एसएसएलसी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अखिल भारतीय आधारावर अर्ज करण्यास पात्र आहेत. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आहे आणि सांकेतिक भाषा शिकवण्याच्या प्रक्रियेत समाविष्ट आहे. पात्र विद्यार्थी भारत सरकारच्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ५० हजार रुपये पर्यंतची शिष्यवृत्ती रक्कम मिळवू शकतात. संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी यासाठी प्रवेश घ्यावा, असे आवाहन यावेळी उपप्राचार्य एन. एम. शिवकुमार स्वामी यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस प्रा. एम. बी. रघु, प्रा. महादेव प्रसाद, प्रा. पडाणी स्वामी आदी उपस्थित होते.

# बालाजी अमाईन्सच्यावतीने दहावीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित संचाची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्याकडे तालुक्यातील १० वीच्या विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित संच मिळावे, अशी मागणी केली होती.

या मागणीची दखल घेवून बालाजी अमाईन्सच्यावतीने सीएसआर अंर्तगत तालुक्यातील ११ शाळांतील १० वी च्या विद्यार्थ्यांकरीता २१ अपेक्षित संचाचे वितरण सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. यावेळी सरस्वती शाळेचे मुख्याध्यापक सुहास वडणे यांनी ग्रामिण भागातील विदयार्थ्यांना २१ अपेक्षित संचाची अत्यंत गरज होती. ती गरज बालाजी अमाईन्सच्या वतीने पूर्ण करण्यात आल्याने बालाजी अमाईन्स कंपनीचे त्यांनी आभार मानले. तसेच बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळाचेही वडणे यांनी आभार मानले. यावेळी आर सुब्ब शास्त्री (डी.जी.एम सर्व्हिस) व मारुती सावंत (असिस्टंट मॅनेजर, ॲडमिस्टेशन) यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित संचाचे वितरण करण्यात आले. या कार्यकमास तुळजापूर तालुक्यातील ११ शाळांमधिल विदयार्थी, शिक्षक व पालक तसेच मुख्याध्यापक उपस्थित होते.



### या शाळेतील विद्यार्थ्यांना मिळाली अपेक्षित

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय पिंपळा खुर्द, ता. तुळजापूर, श्रीराम माध्यमिक विद्यालय धोत्री, ता. तुळजापूर, महात्मा गांधी विद्यालय वडगाव काटी, ता. तुळजापूर, सरस्वती विद्यालय तामलवाडी, ता. तुळजापूर, छत्रपती शाहू महाराज विद्यालय मसला खुर्द, ता. तुळजापूर, नरेंद्र बोरगावकर विद्यालय देवकुरूळी, तुळजापूर, मॉडर्न हायस्कूल सांगवी काटी, ता. तुळजापूर, सरस्वती प्रशाला सिंदफळ, ता. तुळजापूर, येडेश्वरी कन्या प्रशाला काटी ता. तुळजापूर, मधुकरराव चव्हाण माध्यमिक विद्यालय केमवाडी, ता. तुळजापूर, श्रीहरी प्रशाला कुंभारी, ता. तुळजापूर.

# खेडगी विद्यालयात सायकल रॅली, कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि. १८ जानेवारी-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यु. पी. देवर्षी, तालुका विधी सेवा समिती, अक्कलकोटचे प्रभारी अध्यक्ष एन. ए. एल. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयात सायकल रॅली व कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर पार पडले.

सायकल रॅली ही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया आणि जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्था पिंपळगाव यांच्यावतीने येवला ते गाणगापूरपर्यंत काढण्यात आली. सायकल रॅली सडक अर्जुनी, (जि. गोंदिया) येथील दिवाणी न्या. विक्रम आव्हाड व संगिता विक्रम आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. विक्रम आव्हाड, संगिता आव्हाड, विधी शाखेच्या विद्यार्थिनी सुमेधा अभंग यांनी बेटी पढाओ बेटी बचाओ, समाजातील महिलांची सुरक्षा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर मार्गदर्शन केले. एन. ए. एल. शेख यांनी भाषण केले. सूत्रसंचालन ॲड. पी. ए. पाटील आणि आभार ॲड. एस. डी. बाके यांनी मानले. शिबिरामध्ये विधिज्ञ संघाचे अध्यक्षा ॲड. के. एस. हल्ले, सदस्य ॲड. अनिल मंगरुळे, प्राचार्य डॉ. एस. सी. अडवीतोट, अक्कलकोट न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक किशोर रणदिवे, स्वप्निल मोरे, रोहित मुळे, योगीनाथ किणगी, प्रकाश कुंभार, अविनाश सुरवसे यांच्यासह पदाधिकारी व वकिल उपस्थित होते.

# — शमा उर्दू शाळेत फूड फेस्टिव्हल —

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

पौष्टीक आहारात आपल्या सुखी व स्वास्थ जीवनाचे रहस्य आहे म्हणून आपण सर्वजण आपल्या रोजच्या जेवणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, असे मत मुख्याध्यापक अबुबकर नल्लामंदू यांनी शाळेत आयोजित फूड फेस्टिव्हलमध्ये व्यक्त केले. ते पुढे म्हणाले फूड फेस्टिव्हलच्या माध्यमातून विद्यार्थ्याच्या व्यपार कौशल्याला चालना मिळते आपसातील देवाण घेवाण कळते म्हणून याचे आयोजन दरवर्षी केले जाते.

यावेळी स्टॉलमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा कौतुक करत त्यांचा सन्मान ही करण्यात आले. यावेळी फूड फेस्टीवल मध्ये ३० स्टॉल लवण्यात आले होते यात खिचडा, बिर्यानी, समोसे, वडा पाव, इडली, शीरा-उप्पीट, पाव भजी, खीर, रबडी आदी स्टॉलमधून



विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे आयोजक अबरार नल्लामंदू यांनी सर्वाचे स्वागत केले. शाहीन शकील सदफ, दिलशाद बिजापूरे, जुबेदा सैदखा, आसीया बिजापूरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. केले. आभार शाहीन सदफ यांनी मानले.

# मा. आ. नरसिंग मेंगजी : प्रेरणादायी व्यक्तिमत्व

समाजात निकोप सामाजिक पर्यावरण निर्माण व्हायला पाहिजे'. या विचारांचे मंच निर्माण झाले पाहिजेत तरच मोठे कार्य करणाऱ्या व्यक्ती समाजासमोर येतील. कोणतेही क्षेत्र असो त्या क्षेत्रांमध्ये निकोप आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य देणारी माणसे समाजात निर्माण होणे आणि त्यांचे अस्तित्व व त्यांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभ प्रमाणे ठरते. सामाजिकस्तर उंचावणारी माणसे त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे त्या त्या क्षेत्रात समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. माजी आमदार माननीय नरसिंग मेंगजी यांचा जीवन प्रवास देखील असाच प्रेरणादायी आहे. भारतीय जनता पार्टीचा सामान्य कार्यकर्ता ते राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख नेता असा त्यांचा आजवरचा राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रवास प्रेरक आहे.

त्यांचा सुरुवातीचा काळ म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या विस्ताराचा कालावधी त्याकाळी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून संघटन वाढवून अतिशय नेटाने पक्ष वाढीसाठी अविरत प्रयत्न केले. पुढे नगरसेवक व आमदार झाले. परंतु या राजकीय प्रवासात त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. पक्षाच्या अस्तित्वासाठी झगडावे लागले. पक्षाच्या तत्त्वाप्रमाणे त्यांनी प्रथम राष्ट्रनंतर पक्ष व शेवटी स्वतः याप्रमाणे त्यांनी आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ समाजासाठी व पक्ष वाढीसाठी दिला. या राजकीय प्रवासात त्यांनी सोलापुरात विधायक आणि सकारात्मक राजकारण रुजवण्याचा प्रयत्न केला. सर्व राजकीय पक्षातील नेत्यांबरोबर सलोख्याच्या संबंधातून विकासाचे राजकारण केले. राजकीय कारकिर्द आकारास येत असताना त्यांनी समाजकार्याचा देखील वसा घेतला होता. १९७६ ला रोट्रॅक्ट



क्लबच्या माध्यमातून समाजसेवेला सुरुवात झाली. सोलापूर शहर मध्यवर्ती गणेश मंडळाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवत स्वतः त्यामध्ये कार्यमग्न राहिले. रक्तदानाची समाजाची गरज ओळखून रक्तदान शिबिरे आयोजित केली. स्वतः शतकवीर रक्तदाते बनले. समाजातील सर्व स्तरावरील समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या कौशल्याचा आणि नेतृत्वाचा पुरेपूर वापर केला. अगदी कौटुंबिक स्तरावरील पती पत्नी मधील असलेला विसंवाद असो किंवा कौटुंबिक स्वरूपाचा कोणताही प्रश्न असो त्यांनी आपल्या कौशल्याने अनेकांची मने जुळवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अनेक संस्थांचे ते प्रमुख राहिले या विविध संस्थांच्या माध्यमातून सोलापूर येथे सुरू झालेला सामाजिक व राजकीय कार्याच्या माध्यमातून विधायक व सकारात्मक कार्याचा वसा त्यांनी आजही सोडलेला नाही.तो आजही अविरतपणे चालू आहे. आपल्या राजकीय यशाच्या प्रवासाचा आलेख उंचावत असताना त्यांनी आपली तत्त्वापासून कधीच फारकत केली नाही. आपली सर्वसामान्य जनता आणि पक्षाचा सामान्य कार्यकर्ता यांच्याबरोबरची नाळ कधीच तुटू दिली नाही. जिल्ह्याच्या राजकारणातील एक स्वच्छ चारित्र्याचा, निर्मळ वाणी ओजस्वी वक्तृत्व व प्रसन्न व्यक्तिमत्व आणि आपल्या या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे व कर्तृत्वामुळे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये त्यांचा आदराने नामोल्लेख केला जातो. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वामुळे राजकिय व सामाजिक क्षेत्रात सर्वांबरोबर स्नेहाचे व मैत्रीचे नाते राहिले आहे. संपूर्ण भारत वर्षांमध्ये आपल्या मैत्रीच्या धाग्याने माणसे जोडणारा सहृदयी व संवेदनशील मनाच्या या कर्तृत्ववान नेत्याने नव्या पिढीसाठी मोठा आदर्श निर्माण केला आहे. कोणत्याही संकटाला सामोरे जाणे, प्रत्येकाला आपल्या मधुर शब्दांनी जिंकायचे आणि प्रसंगी कठोर निर्णय घ्यायचा मात्र आपल्या तत्वांशी समझोता करायचा नाही, ही त्यांची शिकवण नेहमीच मार्गदर्शक राहिली आहे. आज ते हिंदुस्थान स्काउट्स अँड गाईड्स असोसिएशन नवी दिल्ली या संघटनेचे राष्ट्रीय चेअरमन व भारत-तिब्बत सहयोग मंचाचे राष्ट्रीय मंत्री म्हणून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत. सोलापूर शहरातील एक सामान्य कार्यकर्ता ते राष्ट्रीय स्तरावरील नेता म्हणून हा प्रवास आपणासाठी अतिशय प्रेरणादायी आणि दीपस्तंभाप्रमाणे राहणार आहे. असा हा कर्तुत्ववान तेजस्वी व आदर्श नेता. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या नेत्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**- ॲड. लक्ष्मीकांत कोंडा**
**मा. नगरसेवक**

# महारेशीम अभियान सुरू

- जिल्हा रेशीम विकास अधिकारी विनीत पवार
- जिल्ह्यातील १ हजार २६० एकरांवर उद्योग चालू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

जिल्ह्यात रेशीम शेती उद्योगासाठी खूप वाव आहे. रेशीम शेतीचे महत्व व त्यातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती व्हावी याकरीता जिल्ह्यात महारेशीम अभियान-२०२५ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हा रेशीम विकास अधिकारी विनीत पवार यांनी केले. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये १ हजार १७ शेतकऱ्यांचा १ हजार २६० एकरावर हा उद्योग चालू असून, दि. ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यासाठी नव्याने ५०० एकर तुती लागवडीची लक्षांक दिलेला आहे. कृषी विभाग, जिल्हा परिषद व इतर यंत्रणांच्या समन्वयाने ११ तालुक्यांमध्ये सुमारे २ हजार नवीन शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगाकडे वळविण्यासंबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यात तुती लागवडीद्वारे रेशीम कोष उत्पादन योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यात येत आहे. यात लाभार्थी निवडताना, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जमाती, दारिद्रय रेषेखालील कुटुंबे, महिला प्रधान कुटुंबे, शारीरिक अपंगत्व प्रधान कुटुंबे, भुसुधार योजनेचे लाभार्थी, कृषी कर्ज माफी योजनेनुसार अल्पभूधारक सिमांत शेतकऱ्यांना निवडण्यात येणार आहे. रेशीम विकास प्रकल्पासाठी ३ वर्षाच्या कालावधीत अकुशल व कुशल मजुरी देण्यात येते. यात तुती लागवड व जोपासनेसाठी ६८२ दिवस व कीटक संगोपन गृहासाठी २१३ दिवस असे ८९५ दिवसांची देण्यात येते. सध्या प्रती एकर ३ वर्षाकरीता एकूण ४ लाख १८ हजार ८१५ रुपये इतके अनुदान देण्यात येते. सिल्क समग्र -२ या योजनेंतर्गत एक एकर नवीन तुती लागवडीसाठी सर्वसाधारण गटाकरीता ३ लाख ७५ हजार रुपये अनुदान व अनुसूचित जाती, जमाती करीता ४ लाख ५० हजार अनुदान देण्यात येते. इच्छुक लाभार्थ्याकडे मध्यम ते भारी व पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी. सिंचनाची पुरेशी सोय हवी एकरी वार्षिक सर्व खर्च वजा जाता किमान १ लाख ५० हजार रुपये उत्पन्न निश्चित मिळते.

## संक्षिप्त वृत्त



### भांडेगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद बाजार

**वैराग, दि. १८ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भांडेगाव येथे बाल आनंद बाजार भरवण्यात आला होता. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांचे सामान्य ज्ञान वाढविणे, दैनंदिन व्यवहार, बाजार खरेदी विक्रीचा अनुभव,संवादकौशल्य,बौद्धिक क्षमता वाढविणे या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भांडेगाव येथे चिमुकल्यांनी आठवडे बाजाराचे नियोजन केले. बाल आनंद बाजाराचे उद्घाटन सरपंच कमल अर्जून शिंदे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिचंद्र काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या बाल आनंद बाजारात शाळेतील सर्व विद्यार्थी विविध प्रकारचे खाद्य पदार्थ, पालेभाज्या, फळे, गृहोपयोगी साहित्य घेऊन सहभागी झाले होते. सर्व विद्यार्थ्यांनी मिळून जवळपास ४० स्टॉल लावले होते. शेतातील विविध पालेभाज्या, फळभाज्या आणल्या होत्या. विविध खाद्यपदार्थाचे स्टॉल्स लावले होते.चिमुकल्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. भांडेगाव व परिसरातील सर्व लहान थोर मंडळींनी वस्तू खरेदी करण्यासाठी खूप गर्दी केली होती. आजच्या आनंद बाजारामध्ये २९ हजार रुपयांची चांगली आर्थिक उलाढाल झाली आहे. यावेळी मुख्याध्यापक किशोर कुलकर्णी, आजीनाथ रायजादे उपस्थित होते.




### शालेय राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेत मोहोळच्या नागनाथ विद्यालयास तिहेरी मुकूट

**मोहोळ, दि. १८ जानेवारी-**

शालेय राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत पुणे विभागाचे नेतृत्व केलेल्या नागनाथ विद्यालय व ज्युनि. कॉलेज मोहोळच्या १७ वर्षे मुले,मुली व १९ वर्षे मुलीच्या संघाने अनुक्रमे १७वर्षे मुले द्वितीय क्रमांक, १७ वर्षे मुली तृतीय क्रमांक व १९ वर्षे मुली द्वितीय क्रमांक पटकावून तिहेरी मुकुट संपादन केले. क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुलात १२ ते १४ जानेवारीदरम्यान स्पर्धा पार पडली. यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक संभाजी चव्हाण, समीर शेख, आबा गावडे, संतोष सीताप व सुनिता घाडगे यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश पवार आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक बशीर बागवान, उपप्राचार्य प्रकाश शिंदे आदींनी अभिनंदन केले.



### सांगोला विद्यामंदिराची सृष्टी लिगाडे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**सांगोला, दि.१८ जानेवारी-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजची विद्यार्थीनी सृष्टी सुनील लिगाडे हिने तिप्पेहळ्ळी येथे समाजरत्न कै.विष्णुपंत दादरे (लोणारी) यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. यासाठी रोख रक्कम पाच हजार रुपये, गौरवचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिक होते. यशस्वी विद्यार्थिनीला वाङ्.मंडळातील प्रमुख प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.धनाजी चव्हाण, प्रा.अर्चना कटरे, प्रा.एस.डी. आलदर, प्रा.राधा रिटे, प्रा.महेर ढवळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचा संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापिका शहीदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. संस्था सचिव म. शं. घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### टेंभुर्णी येथील माऊली शिक्षण संस्थेतर्फे पत्रकारांचा सन्मान

**टेंभुर्णी, दि. १८ जानेवारी-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर व ज्यु. कॉलेज टेंभुर्णी यांच्यातर्फे पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी धनंजय मोरे, हरिश्चंद्र गाडेकर, डी. एस. गायकवाड, संस्थाध्यक्ष योगेश बोबडे, सचिव सुरजा बोबडे, शै. संचालक मंगेश काशीद, सनराइज् स्कूलच्या प्रिन्सिपल शाहिदा पठाण, लक्ष्मी-आनंदचे प्राचार्य विकास करळे, जनसंपर्क अधिकारी सागर खुळे, डी. एस. गायकवाड, सदाशिव पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन अनुष्का सरडे यांनी केले. प्रास्ताविक अडाणे, वजाळे यांनी केले तर आभार प्रीतम मडके यांनी मांनले.

# स्वामी समर्थांच्या सुलभ दर्शनाचे नियोजन

## दिव्यांग भाविकांसाठी व्हीलचेअर; सकाळी ६ ते ९ दरम्यान स्थानिकांना उत्तर महाद्वारातून मिळणार दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जानेवारी-**


अलीकडील काळात येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराजांच्या दर्शनाकरिता परगावाहून येणाऱ्या स्वामी भक्तांची संख्या प्रचंड वाढली आहे. या अनुषंगाने श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने देवस्थानच्या मर्यादित परिसरात समितीचे चेअरमन महेश इंगळे व विश्वस्तांनी येणाऱ्या सर्व भाविकांना लवकरात लवकर व सुलभ स्वामी दर्शन व्हावे, यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

स्वामी भक्तांची संख्या प्रचंड वाढल्याने मंदिर परिसरातील जागा मर्यादित असल्याने भाविकांची दर्शन रांग मंदिर बाहेरील रोडवर लांबत आहे. भाविकांना त्रास होऊ नये याकरिता मंदिराच्या दक्षिण महाद्वारालगत वारंवार गर्दीच्या वेळी कापडी मंडप उभारण्यात येतो. दर्शन रांगेत पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येते. रोडवरील मंदिराबाहेरील वाढती रांग लक्षात घेऊन मंदिरातील गाभाऱ्यासमोरील मंडपातील स्वामी भक्तांना टप्प्याटप्प्याने प्रसंगी रांगेत स्वामी दर्शनाकरिता सोडण्यात येते. मंदिर समितीकडून आपल्या मर्यादित मंदिर परिसरातच हे सर्व नियोजन नियमितपणे व यशस्वीपणे राबविण्यात येत असतात.

मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी मंदिर परिसरातील भूसंपादन करण्याबाबत बोलायचे झाल्यास नगरविकास खात्याने हा प्रश्न मार्गी लावून मंदिर समितीस परिसरातील जागा उपलब्ध करून दिल्यास मंदिर समितीकडून अनेक सोयीसुविधा निर्माण करून भाविकांना सुलभ स्वामी दर्शन व्यवस्थेचे नियोजन करण्यात येईल. सध्या भाविकांना गर्दीच्या प्रसंगी टप्प्याटप्प्याने प्रसंगी रांगेने दर्शनास सोडण्यात येते. बाहेरील रांग वाढते म्हणून रांग वाढू नये व ऊन, पाऊस, थंडीमध्ये भाविक तासन्तास दर्शन रांगेत रेंगाळत उभे राहू नये या संदर्भात खबरदारीचा उपाय म्हणून मंदिरातील भाविकांना गर्दीमध्ये टप्प्याटप्प्याने दर्शनास सोडण्यात येते. त्यामुळे गाभाऱ्यासमोर थोडीफार गर्दी होत असते. गर्दीच्या कालावधीमध्ये गाभाऱ्यासमोरील मंडपातील गर्दी वगळता मंदिरात व मंदिराच्या दक्षिण महाद्वार परिसरात बॅरिकेटिंग करून तसेच गाभाऱ्याच्या पाठीमागील जागेत देवस्थाने यशवंत कर्जाळकर यांच्याकडून सन २००६ मध्ये सिटी सर्वे नंबर २००५/०८, क्षेत्र ९०.६ चौरस मीटर इतकी खरेदी करून संपादन केलेल्या जागेत पत्रा शेडच्या माध्यमातून हॉल उपलब्ध करून येथेही दर्शन रांगेचे नियोजन वारंवार करण्यात येते. भाविकांना स्वामी दर्शन झाल्यानंतर देवस्थानच्या पूर्वेकडील देवस्थानच्या उपहारगृहातून बाहेर सोडण्यात येते. जेणेकरून दक्षिण महाद्वार बाहेरील परिसरात भाविकांची गर्दी होऊन भाविकांची कोंडी होणार नाही व भाविकांना त्रास होणार नाही याची दक्षता मंदिर समितीच्या वतीने घेतली जाते. तसेच देवस्थानच्या मुरलीधर मंदिर या ठिकाणी देवस्थानच्या वतीने सुसज्ज भक्त निवासाचे व दर्शन रांगेचे बांधकाम देवस्थानच्या वतीने हाती घेण्यात आलेले आहे. या माध्यमातूनही लवकरच भाविकांच्या निवासाची व भाविकांना सुलभ स्वामी दर्शनाची सोय होणार आहे. भाविकांची पादत्राणे ठेवण्याकरिता मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिण महाद्वार जवळ एक चप्पल स्टँड असून गर्दीमध्ये भाविकांना पादत्राणे ठेवण्याकरिता देवस्थानच्या मुरलीधर मंदिर समोरील जागेत दुसरे चप्पल स्टँड स्थापन करण्यात आले आहे. स्थानिक स्वामी भक्तांच्या अडचणी लक्षात घेऊन मंदिरातील गर्दीच्या कालावधीत सकाळी ६ ते ९ व विना गर्दीच्या कालावधीत दिवसभरात केव्हाही स्थानिक स्वामी भक्तांना देवस्थानच्या उत्तर महाद्वारातून स्वामी दर्शनाकरिता सोडण्यात येईल. हा उत्तर महाद्वार गर्दीमध्ये बंद असला तरी त्या ठिकाणी मंदिर समितीचे सेवेकरी असतील. त्यांच्याशी संपर्क साधून स्थानिक भाविकांना मंदिरात सहज प्रवेश घेऊन स्वामी दर्शनाचा सहजतेने लाभ घेता येईल असे नियोजन करण्यात आले आहे. तसेच अन्य कालावधीमध्ये देवस्थानच्या पश्चिमेकडे असलेला दरवाजा व समोरील मोकळी जागा मंदिर समितीने नलिनी करगुप्पीकर यांच्याकडून सन २००३ मध्ये सिटी सर्वे नंबर १९९३ ए, क्षेत्र ७७.१ चौरस मीटर जागा खरेदी करून संपादन केलेल्या या जागेत स्थानिक स्वामी भक्त आपली वाहने पार्किंग करीत असतात. तसेच गर्दी नसताना हा दरवाजा खुला असताना स्थानिक भाविक येथूनही दर्शनाकरिता ये-जा करीत असतात.

भूसंपादनाचा विचार करता मंदिर समितीने यशवंत कर्जाळकर यांच्याकडून सन २००६ मध्ये सिटी सर्वे नंबर २००५/०८, क्षेत्र ९०.६ चौरस मीटर, नलिनी करगुप्पीकर यांच्याकडून सन २००३ मध्ये सिटी सर्वे नंबर १९९३ ए, क्षेत्र ७७.१ चौरस मीटर, दत्तात्रय नागनाथ गणेश सराफ यांच्याकडून सन २००२ मध्ये सिटी सर्वे नंबर १९९१/९२ क्षेत्र ४६.४/३६.२ चौरस मीटर इतकी जागा खरेदी करून त्या ठिकाणी वर नमूद केल्याप्रमाणे विविध उपक्रमांसाठी या जागांचा वापर मंदिर समितीकडून करण्यात येत आहे.

या जागा खरेदी करताना मंदिर समितीने त्याकाळी नगरपालिकेच्या वतीने नगरपालिकेत ठराव पारित करून या जागा खरेदी केलेल्या आहेत. भूसंपादनाचे काम हे प्रत्यक्षात नगरपालिकेकडे असून या सह उर्वरित प्रश्न प्रशासनामार्फत मार्गी लागल्यास भाविकांच्या सूचना लक्षात घेता व ज्येष्ठ नागरिकांसाठी भाविकांच्या सूचनेनुसार मंदिर समितीस दर्शन व्यवस्थेचे नियोजन करणे आणखी सोपे होईल. व्हील चेअरच्या संख्येमध्ये वाढ करून दिव्यांगांसाठी आता व्हीलचेअरच्या माध्यमातून स्वतंत्र दर्शन व्यवस्थेचे नियोजन करण्यात आलेले आहे. सद्य परिस्थितीत दिव्यांग व वयोवृद्ध भाविक मंदिरात देवस्थान सेवेकऱ्यांच्या निदर्शनास आल्यास त्यांना तात्काळ व्हीलचेअर उपलब्ध करून प्राधान्याने स्वामी दर्शन घडवून सुखरूपरित्या बाहेर पाठविले जाते. वयोवृद्ध नागरिकांना देवस्थान सेवेकऱ्यांच्या सहकार्याने स्वामी दर्शनाकरिता सहकार्य केले जाते. प्रशासनाकडून भविष्यात मंदिर समितीस जागा उपलब्ध झाल्यास दिव्यांग व वयोवृद्ध नागरिकांसाठी स्वतंत्र दर्शन रांग उपलब्ध करून देण्याचा देवस्थान विश्वस्त समितीचा मानस आहे.




### राज्य शासनाचेही मोठे योगदान

सद्यस्थितीत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखडा जाहीर केल्यानंतर अक्कलकोटचे आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून लवकरच अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास होऊन अक्कलकोट शहर व मंदिर परिसराचा विकास होईल याबाबत आमची सकारात्मक अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने प्रारंभी नमूद केल्याप्रमाणे आम्ही भाविकांच्या सेवेकरिता सदैव तत्पर असल्याचे स्पष्टीकरण मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते नियोजन

मंदिराच्या पूर्वेकडील कलादगी महाराज ट्रस्टच्या जागेचा वापर करून भाविकांच्या स्वामी दर्शनाच्या नियोजनासोबत विविध उपक्रम राबविण्याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांनी कलादगी महाराज ट्रस्टची व परिसरातील आजूबाजूच्या संबंधित लोकांची बैठक घेऊन जागेची पाहणी केली होती. संबंधित विश्वस्तांना जागा मोकळी न ठेवता भाविकांच्या सोयी सुविधांकरिता वापर करण्यात यावा. या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यास सुलभ होईल असे सूचित केले होते, परंतु कालांतराने संबंधित कार्यवाह विश्वस्तांचे निधन झाल्याने हा प्रश्न प्रलंबित असून निकाली निघालेला नाही.

## सकल मराठा समाजाचा बुधवारी पंढरीत आक्रोश मोर्चा

### देशमुख, सूर्यवंशी कुटुंबातील सदस्य राहणार उपस्थित



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ जानेवारी-**

सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ अखंड मराठा समाजाचा सोलापूर जिल्ह्याच्यावतीने बुधवार २२ रोजी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर येथील समन्वयक रवी मोहिते यांनी दिली.

या मोर्चास संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील, आमदार सुरेश धस यांच्यासह देशमुख व सूर्यवंशी कुटुंबीयदेखील उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, कुर्डूवाडीचे संजय टाणपे, संभाजी ब्रिगेडचे दीपक वाडदेकर, किरण घाडगे, स्वराज पक्षाचे महादेव तळेकर, किरण भोसले, दिगंबर सुडके, विनोद लटके, महेश पवार, आकाश पवार, बंटी भोसले आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. मोहिते यांनी सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहेच. परंतु परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांची देखील पोलीस कोठडीत हत्याच केल्याचा आरोप केला. या दोन्ही प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी केली. तर दीपक वाडदेकर यांनी तपास योग्य दिशेने होण्यासाठी, आरोपींची नावे वगळली जाऊ नयेत यासाठी आक्रोश मोर्चा होणार आहे. बुधवारी सकाळी ११ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघणार आहे. या आक्रोश मोर्चामध्ये संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील सदस्य, खा. बजरंग सोनवणे, संभाजीराजे छत्रपती, अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आ. संदीप क्षीरसागर, दीपक केदार उपस्थित राहणार आहेत.



## जनतेला सुविधा देण्यासाठी सैदव तत्पर रहा : खा. मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १८ जानेवारी-**

पंचायत समिती कार्यालय माळशिरस या ठिकाणी माढा लोकसभेचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. उत्तमराव जानकर साहेब व माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत माळशिरस तालुक्यातील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या माध्यमातून तालुक्यातील विविध समस्या व प्रस्तावित कामे यांचा आढावा घेण्यात आला.

तालुक्यामध्ये सुरू असलेल्या विकासकामांच्या संदर्भात संपूर्ण माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी मांडली. आढावा बैठकीच्या निमित्ताने आ. उत्तमराव जानकर यांनी सर्व अधिकाऱ्यांना लोकांसाठी काम करताना कायम आपलेपणाची भावना जपली पाहिजे. लोकसेवा सर्वप्रथम व नंतर मी हा, भाव मनामध्ये ठेवून तालुक्यातील जनतेच्या सेवेसाठी कायम तत्पर राहिले पाहिजे.

तालुक्यातील जनतेसाठी आपण सर्वांनी मिळून काम केले पाहिजे. ही भूमिका मांडली. याप्रसंगी माळशिरस पंचायत समितीच्या वतीने प्रमुख उपस्थित मान्यवर-पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.


## चांदापुरी येथील मल्ल राहुल सुळ त्रिमूर्ती चषक केसरीचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ जानेवारी-**

शंकरनगर, अकलूज येथील शिवथीर्थ आखाड्यात आखिल भारतीय त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धेत चांदापुरी येथील मल्ल राहुल सुळ उपविजेता ठरला.

यावेळी राहुल सुळविरुद्ध हरियाणाचा मल्ल रजतसिंग यांच्यात चषक कुस्ती स्पर्धेसाठी अत्यंत अटीतटीच्या लढतीत राहुलने जवळपास विस मि नीटे रजतसिंग यांच्यात विविध प्रकारच्या डावात जोरदार लढत दिली. पण शेवटी रजतसिंगने. नऊ गुणांनी मात करीत विजेता ठरला. त्याने त्रिमूर्ती चषक स्पर्धेचे विजेतेपद मिळविले तर राहुल सुळ उपविजेता ठरला.

राहुल सुळ यास रोख दीड लाखाचे बक्षीस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, सराजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. राहुल सुळ याच्या या कामगिरीबद्दल भगवान सुळ, विजय पाटील, लालासाहेब सातपुते, बाबासाहेब पुकळे, सतीश जाधव, जगन्नाथ शिंदे, दादासाहेब तरंगे, शिवाजी वाघमोडे, हर्षद जगदाळे, अक्षय सुळ, सागर सुळ यांच्यासह चांदापुरी, पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून राहुलच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.



# पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपा सदस्य नोंदणीचे अभियान यशस्वी करावे

### भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ जानेवारी-**

आगामी दोन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून कामास लागण्याची गरज आहे. सक्षम कार्यकर्ता हीच भाजपची खरी ताकद असल्याने आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजप सदस्य नोंदणीचे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात भाजपा सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात झाली असून प्रत्येक कार्यकर्ता या अभियानात सहभागी झाला आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात भाजप सदस्य नोंदणीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

गावपातळीवरील बुथ कार्यकर्ता हा भारतीय जनता पक्षाचा आधारस्तंभ आहे. बुथप्रमुखा पासून तालुका, जिल्हा तसेच प्रदेश व राष्टीय पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या परिश्रमामुळेच भारतीय जनता पार्टी जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. सक्षम भाजपा, समृद्ध भाजपा, आगामी काळात शत प्रतिशत भाजपा हा उद्देश सफल करण्यासाठी या अभियानाची व्याप्ती आवश्यक आहे. आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हे अभियान लाभदायक ठरणार असून हे अभियान यशस्वी करण्यासाठी भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, असे आवाहन चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी राबविलेल्या योजना सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचविल्या पाहिजेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षातील क्रांतीकारी कार्य जनतेसमोर न्यायचे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपला मजबूत करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजप सदस्यता मोहीम प्रभावीपणे राबवणे गरजेचे असून सक्षम कार्यकर्ता हीच भाजपची खरी ताकद आहे.
**- चेतनसिंह केदार-सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# उंदरगावच्या विकासासाठी ग्रामस्थांनी एकत्र यावे : घुमरे

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १८ जानेवारी-**

राजकीय गटतट विसरून तसेच गावाच्या शाश्वत विकासासाठी ग्रामस्थांनी या शिबिराच्या माध्यमातून शाश्वत विकास करून घ्यावा असे आवाहन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी केले.



उंदरगाव (ता. करमाळा) व विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन झाले, यावेळी ते बोलत होते. ज्या ठिकाणी स्वच्छता असते, त्या ठिकाणी लक्ष्मी नांदते अशी गावे इतिहास निर्माण करतील असा आत्मविश्वास घुमरे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, सरपंच युवराज मगर, उपसरंपच शिवाजी कोकरे, ग्रामविकास अधिकारी यशवंत कुदळे, तलाठी शंभू कनेरे, उपप्राचार्य संभाजी किर्दाक उपस्थित होते. प्रास्तविक जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख यांनी केले तर सूत्रसंचलन तेजश्री गवळी तर इंग्रजीमधून ईशा दाभाडे हिने मनोगत व्यक्त केले. पूनम शिरसाट हिने मनोगत व्यक्त केले. आभार पूजा गायकवाड हिने मानले. एनएसएस चे महत्व इंग्रजीमध्ये निशा दाभाडे हिने सांगितले.



## संक्षिप्त वृत्त...



### पंढरपुरातील द. ह. कवठेकर प्रशालेस श्रुती कुलकर्णी, अनुप कुलकर्णी यांची भेट

**पंढरपूर, दि.१८ जानेवारी -**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह.कवठेकर प्रशालेस नामांकित असणाऱ्या जी. डी. बी. पेंट डिस्ट्रीब्यूटर व एसएसआय कंपनीच्या प्रोपरायटर श्रुती कुलकर्णी व अनुप कुलकर्णी, कन्या जान्हवी कुलकर्णी यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. कंपनीच्या सी.एस.आर. फंडाच्या माध्यमातून द.ह. कवठेकर प्रशालेस सुमारे तीन लाख रुपयाचा मोफत रंग रोटरीयन धनंजय राजूरकर यांच्या प्रयत्नातून पुरवण्यात आला होता. त्याची पाहणी करण्यासाठी कंपनीच्या उभयतांनी प्रशालेत सदिच्छा भेट दिली. मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी त्यांना प्रशालेबद्दलची माहिती दिली. श्रुती कुलकर्णी व अनुप कुलकर्णी यांच्या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रो. अनुप कुलकर्णी यांनी त्यांच्या एस एस आय कंपनीच्या कार्याबद्दल व सेवेबद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी संपूर्ण प्रशालेतील इमारतीच्या रंगकामाची पाहणी केली. प्रशालेस लागेल तेव्हा रंगकामासाठी मदतीचा हात देण्याचे आश्वासन दिले. प्रशालेचे उपमुख्याध्यापक एस.एस.रुपनर यांनी आभार व्यक्त केले. प्रशालेचे जेष्ठ क्रीडाशिक्षक प्रशांत मोरे, शेलार, कलाशिक्षक अमित वाडेकर, सेवक संजय गोसावी यांनी लेझीमच्या माध्यमातून पाहुण्यांचे स्वागत केले. भक्ती रत्नपारखी, अपर्णा अयाचित यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. निवेदन एस. एम. कुलकर्णी यांनी केले. यावेळी चंद्रशेखर राजूरकर उपस्थित होते.



### करमाळ्यात पत्रकारांचा सन्मान

**करमाळा, दि.१८ जानेवारी-**

करमाळा डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने पत्रकार सन्मान सोहळा पार पडला. यावेळी डिजीटल पत्रकार संपादक संघटना करमाळा यांच्यावतीने मंगेश चिवटे, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश भाऊ सावंत यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष दिनेश मडके, करमाळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश चिवटे, करमाळा डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष दिनेश मडके, ज्येष्ठ पत्रकार नासीर कबीर, वंदे मातरम् पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास घोलप उपस्थित होते. यावेळी पत्रकार महेश चिवटे, नासीर कबीर, आशपाक सय्यद, जयंत दळवी, नरेंद्रसिंह ठाकूर, सुहास घोलप, दिनेश मडके, अंगद भांडवलकर, संजय मस्कर, नागेश चेंडगे, सूर्यकांत होनप, राजू सय्यद, तुषार जाधव, नवनाथ क्षीरसागर यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे सचिव नरेंद्रसिंह ठाकुर यांनी केले.



### खुदावाडी ग्रामस्थांतर्फे गरजू महिलांना साड्यांचे वाटप

**अणदूर, दि. १८ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत खुदावाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने गरीब गरजू महिलांना साडी, चोळी व अन्नाचे पाकिटे भेट म्हणून देण्यात आली. याचवेळी नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे आदर्श ग्रामविकास अधिकारी संजय घोगरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गावातील तलावात जाऊन जलचर प्राण्यांना खावूचे दानही केले. इतकेच नाही तर त्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रस्त्यावर मंदिराच्या बाजूला असलेल्या गरीब गरजू लोकांना अन्नाचे पाकीट देऊन अन्नदानही केले. यावेळी सरपंच सरोजनी कबाडे, शरणप्पा काबाडे, पांडू बोनगरगे, प्रथ्वीराज मुळे, शेकप्पा सालगे, भास्कर व्हलदुरे, व्यंकट नरवडे आदी मान्यवरांसह प्रतिष्ठित नागरिक, महिला, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### झाडबुके महाविद्यालयातर्फे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातर्फे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. उद्घाटन प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य भास्कर करडे, मुख्याध्यापक विक्रम टकले, जितेंद्र गाडे उपस्थित होते. माध्यमिक विभागातून गोळाफेकमध्ये राज नगरकर याने प्रथम तर सुदर्शन वाघमोडे याने द्वितीय आणि महेश डुकरे याने तृतीय, उच्च माध्यमिक विभागामधून ज्ञानेश्वर गडदे याने प्रथम, महेश दुधाळ याने द्वितीय, तर प्रवीण लोंढे याने तृतीय क्रमांक पटकावला. थाळीफेकमध्ये माध्यमिक विभागातून सुदर्शन वाघमोडे प्रथम, सौरभ सोनवणे द्वितीय तर गौरव लोकरी तृतीय, उच्च माध्यमिक विभागातून आर्य फसे याने प्रथम, मयूरेश दुधाळ द्वितीय तर ऋषिकेश कांबळे याने तृतीय क्रमांक पटकावला.सूत्रसंचालन राहुल माने यांनी केले. आभार स्पर्धेचे संयोजक गणेश नाकाडे यांनी मानले. विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेतात भरली शाळा... निसर्गाचे घेतले धडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जानेवारी-**

तालुक्यातील कोर्सेगाव येथील प्रगतशील शेतकरी शिवनिंगप्पा अरवत (सावकार) यांच्या शेतात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुलांचे वनभोजनच्या माध्यमातून शाळाच भरली होती. विद्यार्थी व शिक्षक हे वनभोजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांना शेतशिवार, पिके, फळे, गाई, गुरे यासह निसर्गाचे धडे मिळाले.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच शाळेचा संपूर्ण परिपाठ घेण्यात आला. विविध समूहगीत, देशभक्तीपर गीत, संगीत पाढे, सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न घेण्यात आले. संपूर्ण शेतात फेरफटका मारण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांना शेतातील सर्व झाडे, पिके, यासंबधी सखोल माहिती देण्यात आली. भोजनाच्या उत्तरार्ध शाळेतील चिमुकल्या मुला-मुलींनी विविध कलागुण, नृत्य, नकला, गोष्टी, कविता सादर केल्या. शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष यादवाड, मुख्याध्यापक पाटील, जाविर, मल्लू पाटील, सदरखेड, महादेव राठोड, कोळी, प्रवीण राठोड, लोखंडे, कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. मुंढेवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले. मुंढेवाडी केंद्राचे माजी केंद्रप्रमुख तथा केगाव शाळेचे ज्येष्ठ शिक्षक देशमुख, मुंढेवाडी शाळेचे पवार आदी उपस्थित होते.

सदर उपक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत पोतदार, पालक वर्ग पोषण आहार प्रमुख शरणू मुत्या, अपंग काळजीवाहू लक्ष्मण आळगी यांचे सहकार्य लाभले. प्रगतशील शेतकरी शिवनिंगप्पा अरवत, सागरदादा अरवत व त्याचा संपूर्ण परिवारांनी सगळ्यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन मारुती जावीर यांनी केले, तर आभार महादेव राठोड यांनी मानले.

> **विद्यार्थ्यांनी जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या अडचणी**
>
> आंबा, चिक्कू, पेरू, फायकस, नारळ, ऊस, द्राक्षे, सीताफळ, गहू, ज्वारी, हुरडा, सुगंधी फुले, काळी माती, लाल माती, मध्यम मुरमाड माती, हवामानाचा पिकावर होणारा परिणाम, पाण्याचे स्रोत, नदीवरील पाइपलाईन, विहिरीचा आकार व त्याचा उपयोग, शेतात घर करून राहण्याचे फायदे, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय, शेतकऱ्याच्या व्यथा, शेतकऱ्याचे विस्तृत जीवन पद्धती, भविष्यातील शेतीचे महत्त्व अशा अनेक विषयावर विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली.

# श्री संत दामाजी कारखान्यात दोन लाख मे. टन गाळप पूर्ण

## चेअरमन शिवानंद पाटील यांची माहिती; ५८ दिवसांच्या कालावधीत विक्रमी गाळप

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ जानेवारी-**

मंगळवेढा येथील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चालू गळीत हंगाम २०२४-२५ करिता ५८ दिवसांत २ लाख मे. टन ऊस गाळप झाल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांनी दिली.

चालू गळीत हंगामात सर्व सभासद, ऊस पुरवठा करणारे शेतकरी, ऊस तोडणी व वहातूक ठेकेदार, मजूर, अंतर्गत ठेकेदार, कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी या सर्वांच्या योगदानातून दामाजी कारखान्याने यशस्वीरित्या २ लाख मे।टन गाळप पूर्ण केलेले आहे. या हंगामात १७ जानेवारी २०२५ अखेर २,००,७८० मे. टन ऊसाचे गाळप करुन १,९८,००० क्विंटल साखरेचे उत्पादन केलेले आहे. आजचा साखर उतारा ९.९७ टक्के सरासरी साखर उतारा ११.१५ टक्के मिळालेला आहे. आसपासच्या इतर कारखान्यांच्या तुलनेत दामाजी कारखान्याची गाळप क्षमता कमी असतानासुद्धा कारखाना पूर्ण क्षमतेने चालवून आजअखेर इतर कारखान्याच्या स्पर्धेत चांगले गाळप केलेले आहे. ऊस तोडणी यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरल्याने दररोज सरासरी ३,७०० ते ३,९०० मे. टन प्रतिदिनाप्रमाणे गाळप होत आहे. या गळीत हंगामामध्ये आपल्या तालुक्यातील सर्वच साखर कारखाने पूर्ण क्षमतेने चालू असल्याने व उसाचे क्षेत्र कमी असल्याने कारखान्यांना उसाची कमतरता भासत आहे. तरीही दामाजी कारखान्यावर सभासद-शेतकऱ्यांचा विश्वास व निष्ठा असल्याने गळीतासाठी उसाची उपलब्धता चांगल्या प्रकारे होत आहे. सभासद शेतकऱ्यांनी दामाजी कारखान्यास ऊस गळीतास देऊन सहकार्य करावे असे आवाहन शिवानंद पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी कारखान्याचे संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणूकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोंनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय, खातेप्रमुख, विभागप्रमुख, कामगार संघटना व पतसंस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

> **उसाची बिले शेतकऱ्यांना अदा : खरात**
>
> ऊस उत्पादक शेतकऱ्यांची १५ डिसेंबर २०२४ अखेर पुरवलेल्या उसाची बिले प्रति मे. टन २,८०० रुपयांप्रमाणे दिलेली आहेत. ऊस तोडणी, वाहतूक यंत्रणेची बिले, कामगार पगार, व्यापारी बिले वेळेवर देऊन सर्व घटकांना सामावून घेऊन संचालक मंडळ काटकसरीने काम काज करित आहे. गाळपाचे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण करणार असल्याचा विश्वास व्हाईस चेअरमन तानाजीभाऊ खरात यांनी व्यक्त केला.



# टीम रायगड एक्सप्रेसच्या ई-सायकल रॅलीचे पंढरपुरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ जानेवारी-**

वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे २२ ते २५ जानेवारी या कालावधी मध्ये होणाऱ्या MH-PEX -२०२५ (डाक तिकिटांचे प्रदर्शन) अंतर्गत जनजागृतीसाठी छत्रपती संभाजीनगर येथून दिनांक २ जानेवारी रोजी निघालेली ई-सायकल रॅली पंढरपूरमध्ये सोलापूरहुन दाखल झाली.

या ई-सायकल रॅलीचे पंढरपूर डाक विभागाचे डाक अधीक्षक चंद्रकांत भोर, सहा. अधीक्षक एम. एम. पाटील यांच्या मार्गदर्शानुसार काल टीमचे मुख्य श्रीकांत माने सहा. अधीक्षक (प्रवास) धाराशिव विभाग आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे विठुरायाच्या पावन नगरीमध्ये मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात स्वागत करण्यात आले.

यावेळी या ई- सायकल रॅलीमध्ये सहभागी झालेल्या टीमचा व पंढरपूर मधील डाक तिकिटांचे संग्राहक डॉ. श्रीधर यलमार यांचाही सन्मान करण्यात आला. दुसऱ्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पंढरपूर येथील द. ह. कवठेकर प्रशाला येथे रॅलीतील रायगड एक्सप्रेस टीम प्रमुख श्रीकांत माने यांनी पोस्ट ऑफिसच्या तिकीट जमा किंवा गोळा करण्याच्या छंदाबाबत, ढाई आखार पत्र लेखन स्पर्धेबाबत शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना माहिती दिली. तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सायकल वापराचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा दिली. त्यानंतर बाल विठ्ठल रुक्मिणी आणि वारकरी यांच्यासह नामदेव पायरी येथे ज्ञानेश्वर जळगावकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महापेक्स २०२५ च्या ध्वजाचे अनावरण भजन, कीर्तन आणि टाळ, मृदूंग, वीणा यांच्या निनादामध्ये पंढरपूर विभागातील कमर्चारी बंधू भगिनी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले.

याप्रसंगी पंढरपूर डाक विभागाचे डाक अधीक्षक चंद्रकांत भोर, सहा. अधीक्षक एम. एम. पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, पंढरपूर हेड पोस्ट ऑफीसचे पोस्टमास्तर सोमनाथ गायकवाड आणि पंढरपूर विभागातील कमर्चारी बंधू भगिनी यांनी रॅलीच्या बारामती-सासवड-पुणे-महाड-रायगडमार्गे गेट वे ऑफ इंडिया, मुंबई या मार्गक्रमणासाठी हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आंबेगाव जिल्हा परिषद शाळेत हळदी-कुंकू

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १८ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबेगाव येथे मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. उद्घाटन उपसरपंच ललिता साळुंके व आंबेगावच्या ग्रामसेविका रोहिणी घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळगाव-१ च्या मुख्याध्यापिका जयबून शेख यांनी महिलांना मुलावरील संस्कार व आईचे कर्तव्य याबद्दल मार्गदर्शन केले व महिलाविषयक स्वलिखित ओव्या वाचून दाखवल्या. हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमात महिलांनी एकमेकींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच मुलांच्या स्वच्छतेविषयी व आरोग्य विषयी सर्व माहिती मुख्याध्यापक नामदेव शेंडगे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. तसेच सुरवसे यांनी आपले विचार व्यक्त केले. मोठ्या उत्साहात हळदी-कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला व उपस्थित महिलांमधून योगिता दळवी यांना लकी ड्रॉतर्फे आकर्षक गिफ्ट देण्यात आले.




संगीत खुर्चीच्या खेळामध्ये २५ मुलींनी सहभाग नोंदवला. यामध्ये प्रथम सायली भुसारे, शिवगंगा दिंडोरे हिचा दुसरा व प्रांजल साळुंखे हिचा तृतीय क्रमांक आला. बक्षीस म्हणून मुलीना कंपास बॉक्स देण्यात आले. त्यानंतर सर्व महिलांचा संगीत खुर्चीचा खेळ पार पडला. यामध्ये जवळजवळ ३७ महिलांनी भाग घेतला. या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक आशा वर्कर वर्षा साळुंखे यांनी पटकावला असून त्यांना सुंदर साडी देण्यात आली. त्यानंतर द्वितीय क्रमांक स्वाती ढवळे यांनी पटकावला असून तीन लिटर कुकर बक्षीस देण्यात आला तर तृतीय क्रमांक सारीका सुरवसे यांचा आला असून त्यांना इडलीपात्र बक्षीस देण्यात आले. राणी मुटकुळे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. उषा दाभाडे, सुलोचना काळे यांनी सहकार्य केले.

# अणदूर परिसरात आंब्याचा मोहोर बहरला

## यंदा लवकरच फळांच्या राजाची चव चाखता येणार

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १८ जानेवारी-**

ग्रामीण भागातील गावरान आंब्याला चिक्कार मोहोर बहरला असून पौष्यातच हा मोहोर तुडुंब बहरला असल्याने फळांचा राजा या वर्षी मोठ्या प्रमाणात येणार असल्याची ही चाहुलच आहे.

पाऊसकाळ मोठा झाल्याने आंब्याच्या झाडाला मोहोर लगडून गेला आहे. आज नंदगाव ते हंगरगा रोडवरील अतिशय जुनाट गावरान आंब्याचे झाड असून ते मोहराने बहरले आहे. त्याचा फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. शिशिर ऋतू म्हटला की झाडांच्या पानांची गळती डोळ्यापुढे उभी राहते. हिवाळा जसाजसा वाढतो तसातसा या झाडांचा मोहोर फुलतो, शिशिर ऋतूची ही जादू मोठ्या अन् ठळक प्रमाणात दिसते. ती आंब्याच्या अंगावर, मोहरलेल्या आंब्याच्या झाडांचे दर्शन घ्यावे. शशिर ऋतू जरी झाडांच्या पानांचा कर्दनकाळ असला तरी तो रंगाच्या बाबतीत मोठा रसिक आहे. रंगाच्या विविध नाजूक छटा शिशिरच इतर ऋतूंपेक्षा जास्त दाखवतो. या आंब्याच्या मोहराने मनाला केवढा तरी उल्हास वाटतो. मोहोर आला म्हणजे आता वसंतपंचमी लवकरच येणार याची चाहूल लागते. अशातच गदिमाची एक कविता चैत्रसखी आठवली, फुल फुलोऱ्यात यावे तशी आलीस वनात, ओठी आंब्याचा मोहोर तुझ्या कोकिळमनात, घडी नाही ग यायची आजच्यासारखी पुन्हा, मी ग तहानलेला चैत्र तू ग माझी चैत्रसखी



अशा या सुंदर, मनमोहक आंब्याच्या मोहराची मनाला एक भुरळ घातली जाते. मन प्रसन्न होते. आता जर अवकाळी वारा, पाऊस नाही आल्यास यंदा आंब्याचे अमाप पीक येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूर्वीच्या काळी उन्हाळ्याच्या सुट्टीत आंबे खायला मामाच्या गावाला जायची प्रथा कधी बंद झाली कळलेच नाही.

> **नैसर्गिक संकट येऊ नये**
>
> गावरान आंब्याच्या आंबराईत बसून मनसोक्त आंबे खाल्ल्याची आठवण कधीच विसरू शकणार नाही. हा मोहोर असाच सुरक्षित राहो, त्याचे आंब्यात रूपांतर व्हावे कोणतेही नैसर्गिक संकट न येवो, अशी अपेक्षा आंबे उत्पादक व्यक्त करत आहेत.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जानेवारी -**
रस्ता सुरक्षा अभियान २०२५ च्या अनुषंगाने महामार्ग पोलिस केंद्र नळदुर्ग यांच्यावतीने सोलापुर-धुळे महामार्गावरील बावी पाटीजवळील वसंत प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, कनिष्ठ महाविद्यालय विद्यानगर येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना मेडल देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

दि.१६ जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्याच्या उद्देशाने महामार्ग पोलिस विभागाचे मुंबई येथील अप्पर महासंचालक डॉ. सुरेश मेकला, पोलिस अधीक्षक महामार्ग छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्र रुपाली दरेकर, पोउ. दिगंबर डिसले, पोनि. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग महामार्ग पोलिस केंद्राच्या प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक अमृता पटाईत यांनी नळदुर्ग महामार्ग पोलिस केंद्राच्या वतीने दि.१६ जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा अभियानच्या अनुषंगाने सोलापुर-धुळे महामार्गावरील बावी पाटीजवळील वसंत प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, तसेच कनिष्ठ महाविद्यालय विद्यानगर येथील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते.



### संक्षिप्त वृत्त...



### गरजूंना चादरींचे वाटप

**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
येथील हजरत ख्वॉजा शमशोद्दीन गाजी रहे यांच्या ७२० व्या उर्सनिमित्त एक तेरा सात ग्रुपच्यावतीने थंडीपासून संरक्षण व्हावे यासाठी गरजूंना चादरींचे वाटप आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते दि.१८ जानेवारी रोजी करण्यात आले. धाराशिव येथील ख्वॉजा शमशोद्दीन गाजी रहे यांचा उर्स सुरू झाला आहे. उर्स सुरू असलेल्या ठिकाणी शहर व ग्रामीण भागातील गरजवंतांना चादरींचे वाटप करण्यात आले. यावेळी एक तेरा सात ग्रुपचे संस्थापक शौकत शेख, अध्यक्ष अहेमद कुरेशी, अलीम पठान, मकबूल टकारी, फिरोज पठान, अयाज पठान, जुबेर शेख, फिरोज मुजावर, बबलू शेख, हाशिम काजी, शाकिर शेख, मिलिंद पेठे, नवनाथ डोंगरे, मेहराज भाई आदींसह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सीटीईटी युनिक क्लासेसचे यश

**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
येथील सीटीईटी युनिक क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी सीटीईटी या शिक्षक पात्रता परीक्षेत यश मिळवलेले आहे.



डिसेंबर २०२४ मध्ये शिक्षक पदासाठी परीक्षा संपून त्याचा निकाल जाहीर झाला आहे. आजपर्यंत सीटीईटी युनिक क्लासचे ३० विद्यार्थी शिक्षक परीक्षेत उत्तीर्ण झाले असून ते पात्र ठरले आहेत. या पात्र विद्यार्थ्यांपैकी १०० पेक्षा जास्त गुण घेतलेल्या ८ तर ९० पेक्षा जास्त गुण घेतलेल्या २२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये निखत कोतवाल (१०५ गुण), फैजा मोमीन (१०० गुण) पेपर दुसरा (१०१ गुण) मोमीन जास्मिन (१०० गुण) सिद्दीकी फकेहा (९९ गुण) सानिया पटेल (९१ गुण) आणि अनेक शिक्षकांनी लक्षणीय यश संपादन केले आहे.



### रांगोळीतून 'लेक वाचवा'चा संदेश

**शिराढोण, दि.१८ जानेवारी -**
कळंब तालूक्यातील शिराढोण येथील गायत्री कॉम्प्यूर्स येथे गायत्री परीवारातील वैशाली माकोडे, प्रतिभा माडजे, रोहीणी कावळे व आस्था चंदेल यांच्या वतीने मकर संक्रात निमीत्त दि.१६ रोजी हळदी-कूंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमानिमीत्त येथील प्रतिभा माडजे यांनी रांगोळी साकारली होती. या साकारलेल्या रांगोळीच्या माध्यमातून बेटी बचावचा संदेश हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. लेक वाचवा, लेक वाढवा व लेक शिकवा असा संदेश रांगोळीच्या माध्यमातून देण्यात आला होता. पारंपारीक वाण तसेच भेटवस्तू देवून हळदी-कूंकू कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात शिराढोण व परीसरातील शेकडो महिलांनी सहभाग घेतला.

### शांता सलगर यांना पुरस्कार

**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील कवयित्री शांता सलगर यांना कै. चंद्रकलादेवी पद्मसिंहजी पाटील स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक नरहरी बडवे यांनी दिली.



धाराशिव तालुक्यातील तेर येथील कला, साहित्य, क्रीडा, वृक्षमित्र, लेखक अशा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महीलेला २०२३ पासून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, मानपत्र, अकराशे रुपये, फेटा, शाल असे स्वरूप आहे. २५ जानेवारीला एका विशेष कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक नरहरी बडवे यांनी दिली.

### न.प. शाळेला म्युझिक संच भेट

**तुळजापूर, दि.१८ जानेवारी -**
शहरातील न.प.प्रा.शा.क्र. तीनच्या माजी विद्यार्थिनी प्रतीक्षा, सुप्रिया, श्वेता व सुरज जगदाळे यांनी शाळेसाठी वीस हजार रुपये किंमतीचा म्युझिक संच शाळेला भेट दिला. सध्या शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाची जोरदार तयारी सुरू असून, नृत्याच्या सरावासाठी विद्यार्थ्यांना म्युझिक संचांची गरज भासत होती. ही उणीव लक्षात घेऊन डॉ. प्रतीक्षा जगदाळे व सुरज जगदाळे, सुप्रिया जगदाळे, श्वेता जगदाळे यांनी म्युझिक संचाची भेट देऊन शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांची अडचण दूर केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मोटे, अशोक शेंडगे, प्रा. संतोष एकदंते, निर्मला कुलकर्णी, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, जालिंदर राऊत, शरद कोळगे, दिगंबर थेटे, कल्पना व्हटकर इ. उपस्थित होते.

# केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान द्या

## एक आठवड्याच्या आत वाटप व्हावे अनुदान; अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन : अनिल जगताप यांचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीनेअतिवृष्टी अनुदान द्यावे तसेच मंत्रालयात प्रलंबित असलेल्या लोहारा-उमरगा तालुक्यातील ८६ कोटी ५२ लाख रुपयांच्या अतिवृष्टी प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावे अन्यथा एक आठवड्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करू सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे साकडे घातले आहे.

२०२४ मध्ये अतिवृष्टी झाल्याने धाराशिव जिल्ह्यातील पिकाचे ३३ टक्यापेक्षा जास्तीचे नुकसान झाले नियमानुसार जिल्हा प्रशासनाने धाराशिव जिल्ह्यातील एक लाख ८० हजार ७८६ बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या दोन लाख ५९ हजार ८८७ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २२१ कोटी ८१ लाख नुकसान भरपाई मिळावी यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केला होता त्यात धाराशिव, कळंब, वाशी आणि परंडा या चार तालुक्याचा समावेश होता. राज्य शासनाने त्याला मंजुरी देत १० डिसेंबर रोजी राज्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीसाठी २९२० कोटी सत्तावन लाख रुपये निधी वितरणास मान्यता दिली.



त्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली ही प्रक्रिया पूर्ण होऊन तीन आठवडे पेक्षा जास्त कालावधी होऊन देखील अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान मिळालेली नाही. जिल्हा प्रशासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी लोहारा-उमरगा तालुक्यातील ७९ हजार ८८० शेतकऱ्यांना ८६ कोटी ५२ लाख रुपये अतिवृष्टी मागणी प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे. हा प्रस्ताव देखील मंत्रालय मुंबई येथे मदत पुनर्वसन खात्याकडे प्रलंबित आहे. त्यालाही तातडीने मान्यता देऊन शेतकऱ्याकडून केवायसी प्रक्रिया राबवावी.धाराशिव जिल्ह्यातील बळीराजा आर्थिक संकटात असून आर्थिक मदत मिळाल्यास दिलासा मिळणार आहे.

> केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने अनुदान द्यावे लोहारा उमरगा तालुक्याचा प्रस्ताव मंजूर करून केवायसी प्रक्रिया सुरू करावी वास्तविक दहा डिसेंबर २०२४ रोजीच निधीची तरतूद झालेली असताना शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदानापासून दूर ठेवले जात आहे आठवडाभर वाट पाहू अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करू.
>
> **- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते.

तरी विनंती की मंजूर असलेल्या व केवायसी पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी व लोहारा तालुका तालुक्याचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा अन्यथा एक आठवड्यानंतर शेतकऱ्यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करू असा इशारा जगताप यांनी मुख्यमंत्री यांना दिला आहे.

## तुळजाभवानीचा नवीन गाभारा स्थापनेसाठी स्वाक्षरी मोहीम

### महंतांच्या हस्ते स्वाक्षरी मोहीमेचा शुभारंभ...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जानेवारी -**
श्री तुळजाभवानी देवीच्या मूर्ती रक्षणासाठी एक स्वाक्षरी देवीचा गाभारा संवर्धनासाठी या मोहिमेचा आज शुभारंभ करण्यात आला.

देवीच्या गर्भगृहातील मूळ भिंतीवरील मार्बल व त्याखालील फरशी काढल्यानंतर गाभाऱ्याच्या छताचे बॅलेन्स सांभाळणाऱ्या (बीम कॉलम) दगडांना तडे गेल्याचे आढळून येत आहे. तसेच गाभाऱ्यातील भिंत म्हणावी तेवढी मजबुत दिसत नाही.सध्या वारंवार भुगर्भातून गुढ आवाज होत असून, जमिन हादरत आहे.



हे सर्व देवीच्या मुर्तीच्या सुरक्षेच्या दृष्टीने फार धोकादायक आहे. सध्याचा मूळ गाभारा काढून त्या ठिकाणी मूळ गाभाऱ्याचा स्वरूप देत धार्मिक रूढी परंपरां जपत ३०-३० चा प्रशस्त नवीन गाभारा निर्मिती करावा म्हणजे पुढील शेकडो वर्षाच्या वाढत्या भाविक भक्तांच्या दृष्टीने ते गरजेचे आहे.

त्यामुळे शहरामध्ये स्वाक्षरी मोहीम श्री तुळजाभवानी देवीचे मुख्य महंत वाकोजी बुवा गुरू तुकोजी बुवा, महंत मावजीनाथ महाराज, पुजारी मंडळाचे अध्यक्ष सज्जनराव साळुंके, माजी अध्यक्ष किशोर गंगणे, शिवाजी बोधले, इंद्रजित साळुंके यांच्या हस्ते राबवण्यात आली. सगळ्यांनी आपले मत व्यक्त केले व या स्वाक्षरी मोहिमेत स्वाक्षरी करून आपला सहभाग घेतला.

यावेळी आयोजक बाळासाहेब भोसले, सागर इंगळे, मयूर कदम, शहरातील पुजारी, व्यापारी, सेवेदारी ज्येष्ठ नागरीक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलर पंप योजनेच्या आढावा बैठकीस शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
जिल्ह्यातील वितरण क्षेत्र (आरडीएसएस), मागेल त्याला सोलार, पी.एम. कुसुम सोलार या तीनही योजनेच्या चालू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे. सोमवारी दुपारी एक वाजता ही बैठक जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात होणार आहे.



या बैठकीला संबंधित सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित असणार आहेत. त्यामुळे ज्याना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे. ज्यांनी योजनेसाठी अर्ज केला आहे किंवा ज्याना या योजनेत प्रशासकीय अडचणी जाणवत आहेत अशा सर्व शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी दूर करण्यासाठी या बैठकीस हजर रहावे, असे आवाहन आमदार कैलास पाटील यांनी केले आहे. आमदार पाटील यांच्या मागणीनुसार ही बैठक आयोजित केली असून सोमवारी दुपारी एक वाजता ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे.

तरी संबंधित शेतकऱ्यांनी मोठया संख्येनं हजर राहून आपल्या अडचणी सोडवून घ्याव्यात असेही आवाहन आमदार कैलास पाटील यांनी केले आहे.

## नॅचरल सीबीजी क्षमतावाढ प्रकल्प कार्यान्वीत : बी.बी. ठोंबरे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
नॅचरल शुगर मध्ये नवनवीन प्रकल्प उभारणीचा सपाटा सुरू असून नॅचरल शुगरने बायो सीएनजी प्रकल्पाची उभारणी भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षात करून बाजारातील मागणी आणि नॅचरलची स्वतःच्या वितरण व्यवस्थेची क्षमता लक्षात घेवून सीबीजी प्रकल्पाचा क्षमतावाढ प्रकल्प आज कार्यान्वीत करून धाराशिव, बीड आणि लातूर जिल्हयामध्ये वाहनांसाठी सीबीजी कमी पडणार नाही याची ग्वाही नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांनी दिली.

पुढे बोलताना ठोंबरे म्हणाले की, २०२१ मध्ये कोरोना या महामारीने थैमान घातले असतानाही त्यावर मात करून भविष्यातील भारताच्या प्रदुषणमुक्त इंधनाची गरज लक्षात घेवून आणि साखर कारखान्यामध्ये उत्पादीत टाकावू पदार्था पासून इंधन निर्मिती करण्याचा संकल्प हाती घेतला आणि सीबीजी प्रकल्पाची पायाभरणी सुरू करून अवघ्या ६ महिन्यांमध्ये 'नॅचरल बायो सीएनजी' प्रकल्पाची उभारणी केली. बाजारातील सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्याने सीएनजीची मागणी वाढ लक्षात घेवून 'नॅचरल बायो सीएनजी' प्रकल्पाची क्षमता वाढविल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. नॅचरल सीएनजी प्रकल्पा मुळे उत्पादीत होणाऱ्या पर्यावरन पूरक इंधनामुळे देशाचे परकीय चलनही कांही प्रमाणात वाचेल आणि वाहनांच्या वापरा मुळे होणाऱ्या प्रदुषणासही आळा बसण्यास मदत होईल असे त्यांनी पुढे बोलताना नमूद केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे संचालक कृषिभूषण पांडुरंग आवाड यांनी केले. तसेच एन.साई मल्टीस्टेटचे उपाध्यक्ष किशोर डाळे यांनी आभार मानले. सीएनजी क्षमतावाढ कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, सभासद शेतकरी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## बाल आनंद मेळाव्यात मलकापूरच्या विद्यार्थ्यांनी केली स्वकष्टाची कमाई

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ जानेवारी -**
कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी बाल आनंद मेळावा अंतर्गत शाळेच्या प्रांगणात बाजार भरवून आनंद लुटला. शिवाय या बाजारात गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या मालाची खरेदी केली.

विविध खाद्य पदार्थ आणि भाज्याचे स्टॉल लावून विद्यार्थ्यांनी आपल्या मालाची विक्री केली. विद्यार्थांनी आपापले कौशल्य दाखवत जवळपास पाच हजार रुपयांची उलाढाल केली. आनंद मेळाव्याचे उद्घाटन अनिल बारकुल व सरपंच रुक्मीणी घोळवे यांच्या हस्ते झाले. यावेळी येरमाळा मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, सुंदर लोमटे, दत्तात्रय पाटील, किरण लोमटे, रितेश लोमटे, कृणाल काकडे, हेमंत लोमटे आदि उपस्थित होते.

## शालेय थ्रोबॉल स्पर्धेत वडगाव (सि) प्रशालेच्या संघास सुवर्णपदक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
राज्यस्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत वडगांव सिद्धेश्वर जि.प. प्रशाले च्या संघाला सुवर्णपदक मिळाले आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा जोतिर्लिंग पब्लिक स्कूल, माले, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर येथे नुकतीच पार पडली.


सन २०१३ पासून वडगांव येथे थ्रोबॉल हा खेळ खेळला जात असुन पहिल्यांदाच शालेय थ्रोबॉल स्पर्धेत वडगांव जि.प. प्रशाले चा संघ जोतिर्लिंग पब्लिक स्कूल माले येथे सुरु असलेल्या स्पर्धेत सहभागी होऊन साखळी सामन्यामध्ये कोल्हापूर संघासोबत एकतर्फी विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला व उपांत्यपूर्व फेरीत मुंबई संघांवर दणदणीत विजय मिळवून फायनलमध्ये प्रवेश केला. दि.१७ जानेवारी रोजी झालेल्या अंतिम सामन्यात अमरावती विभागाला पराभूत करून वडगाव (सि). जि.प. प्रशालेच्या संघाने सुवर्णपदक प्राप्त केले आहे. या विजयी संघास महाराष्ट्र थ्रोबल असोसिएशनचे सचिव राहुल वाघमारे, विलास निरभवणे, दिनेश आहिरे, ज्योतिर्लिंग पब्लिक स्कूल संस्था अध्यक्ष शिवलिंग कळंत्रे, कोल्हापूर जिल्हा क्रीडा अधिकारी अरुण पाटील तसेच कळंत्रे, सर्व क्रीडा शिक्षक, कोच, पंच इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत सुवर्णपदक खेळाडूंना ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला आहे. याबद्दल विजयी संघाचे टीम कोच तसेच धाराशिव थ्रोबॉल संघटना सदस्य हनुमंत माळी, टीम व्यवस्थापक मदने व विजयी संघांचे शिक्षण विभागाचे उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी व थ्रोबॉल संघटना अध्यक्ष बळीराम कांबळे वडगांव (सि), उपाध्यक्ष सुनिल पांढरे, थ्रोबॉल संघटना सचिव बालाजी पवार तसेच तुकाराम वाडकर, डॉ. महेश गुरव, गोपाळ शिंदे, योगेश ताटे, विठ्ठल गुंड, अण्णा पांढरे, ओमकार मुळे, संतोष जगदाळे, किरण जाधव, नाईकवाडी विजयकुमार, मुख्याध्यापक ज्योती राऊत व सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सोमनाथ पाटील व सर्व सदस्य तसेच सर्व ग्रामस्थ वडगाव सिद्धेश्वर यांच्यावतीने विजयी संघ व कोच यांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

वडगांव (सि) येथील खेळाडूंने या स्पर्धेत इतिहास घडविला. याबद्दल सर्व खेळाडूंचे वडगाव ग्रामस्थ यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

## सर्वरोग निदान आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### आठशे नागरिकांना तपासणी, औषधांसह चष्म्यांचे वितरण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिन व धाराशिवचे ग्रामदैवत हजरत ख्वॉजा शमशोद्दीन गाजी यांच्या उरूसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वरोग निदान आरोग्य शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण आठशे रूग्णांची तपासणी करण्यात आली.



राष्ट्रवादी सांस्कृतिक विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यकारिणी सदस्य विशाल शिंगाडे यांच्या पुढाकाराने शनिवार, १८ जानेवारी रोजी भीमनगर येथील शिंगाडे वाडा येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन दाजी ओव्हाळ, शेषेराव सोनवणे, सत्तार शेख, बन्सी कुचेकर, धनंजय वाघमारे, सिद्राम वाघमारे, अलाउद्दीन पठाण, डॉ. अजित डिकले, डॉ. दीपक निंबोणकर, डॉ. नागेश वाघमारे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. रूग्णांची तपासणी करून गरजू रूग्णांना औषधे, चष्मे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी विशाल शिंगाडे, रवींद्र सूर्यवंशी, सुगत सोनवणे, अविनाश शिंगाडे, लहू बनसोडे, नागराज साबळे, योगेश वाघमारे, प्रज्ञावंत ओव्हाळ यांनी अवयवदानाचा संकल्प केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश वाघमारे, शुभम शिंगाडे, गौरव धावारे, लहू बनसोडे, सारीपुत शिंगाडे, सतीश शिंगाडे, उमाकांत माळाळे, प्रितम शिंगाडे, शैलेश शिंगाडे यांनी परिश्रम घेतले.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ‘कोन बनेगा करोडपती’च्या शो साठी गेस्ट म्हणून भाजप गुलचंद व्यवहारे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जानेवारी -**

भारतीय सिनेसृष्टीचे शहेनशहा, अभिनयाचा हिमालय, द ग्रेट आर्टिस्ट अमिताभ बच्चन यांच्या कोण बनेगा करोडपती कार्यक्रमासाठी व्हीआयपी गेस्ट म्हणून भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कोण बनेगा करोडपतीच्या शोच्या निमित्ताने व्यवहारे आणि अमिताभ बच्चन यांची भेट झाली. भेटायला गेल्यानंतर काही क्षण त्यांच्याबरोबर संवाद साधता आला साधारण पाच ते साडेपाच तास त्यांचा अविस्मरणीय क्षण अनुभवता आला. वयाच्या ८४ व्या वर्षीही एवढा ऊर्जाशील कर्तुत्ववान माणूस आणि सर्वांशी अतिशय सहजपणे संवाद साधण्याची कला अमिताभ बच्चन यांच्याकडे आहे. त्यांच्याकडे असणारी ऊर्जा म्हणजे युवकांसाठी प्रेरणा असल्याचे व्यवहारे यांनी दैनिक तरुण भारत शी बोलताना सांगितले.



# अनुदानापासून वंचित २१ मंडळातील शेतकऱ्यांना मिळणार दिलासा

**सचिवांकडे अहवाल सादर; अहवाल सकारात्मक; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**

खरीप २०२४ मध्ये सततच्या पावसामुळे मोठे पीक नुकसान होवूनही अनुदानापासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विनंती केली होती. त्याला अनुसरून मुख्यमंत्र्यांनी वस्तुनिष्ठ परिस्थितीचा आधार ग्राह्य धरून सततच्या पावसाच्या निकषात बदल करत राज्य नैसर्गिक आपत्तीअंतर्गत मदत देण्यासाठी मदत व पुनर्वसन खात्याच्या सचिवांना सूचना दिल्या होत्या. त्यावर सचिवांनी विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला होता. अहवाल सकारात्मक असून तो सचिवांकडे सादर झाला असल्याने मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत अतिवृष्टी झाली होती.



अतिवृष्टीमुळे बाधित असल्याची नोंद झालेल्या मंडळातील एक लाख ८१ हजार शेतकऱ्यांना राज्य सरकारने २२१ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

परंतु याच कालावधीत धाराशिव, भूम, परंडा आणि तुळजापूर तालुक्यातील २४ महसूल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असताना प्रचलित निकषांमुळे अतिवृष्टीची नोंद झाली नव्हती व त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले असताना मदतीपासून वंचित रहावे लागले आहे. कांही मंडळात सदोष पर्जन्यमापकांमुळे अतिवृष्टी असतानाही त्याची नोंद झाली नाही.

त्यामुळे २०२२ साली ओढवलेल्या आपत्तीवेळी ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ नुकसानीच्या निकषानुसार केलेल्या पाहणीचा अहवाल ग्राह्य धरून केलेली प्रक्रिया अनुसरून उर्वरित महसूल मंडळाना अगदी त्याचप्रमाणे तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी देखील आपण पत्राद्वारे मुख्यमंत्री यांना केली होती, असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

आपण व्यक्तिशः अनेक गावात महसूल व कृषी अधिकार्यांसह नुकसानीची पाहणी केली होती.

पाहणीदरम्यान सलग पाच दिवसांत कमी-जास्त असा मिळून ५० मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्याने पिकांचे पूर्ण नुकसान झाले असतानाही सलग पाच दिवसाच्या कालावधीत प्रत्येक दिवशी किमान १० मिलीमीटर पाऊस झाल्यास या प्रचलित निकषात बसत नसलेल्या महसूल मंडळातील शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहेत अशा शेतकरी बांधवांना नुकसानीपोटी दिलासा देण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनुकूलता असल्याने व वस्तुनिष्ठ पंचनाम्याच्या आधारे तयार केलेला सकारात्मक अहवाल मदत व पुर्नवसन सचिवांकडे सादर झाला असल्याने मदतीचा मार्ग मोकळा झाला आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## जिजाऊ ब्रिगेडच्या महिला सदस्याचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ जानेवारी -**

तालुक्यातील जिजाऊ ब्रिगेडच्या महिला सदस्यांची प्रदेश कार्यकारिणी व जिल्हा कार्यकारिणीवर नियुक्ती झाल्याबद्दल मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेडच्या वतीने शुक्रवारी दि.१७ रोजी सत्कार करण्यात आला.

तालुक्यातील जिजाऊ ब्रिगेडच्या महिला सदस्यांचा १२ जानेवारी रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सीर्मा बोके यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश महासचिव स्नेहाताई खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील जिल्हा आणि प्रदेश कार्यकारणीच्या निवड प्रक्रिया पार पडली.

जिजाऊ ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमा बोके, उपाध्यक्ष वर्षा माने, कार्याध्यक्ष विभावरी ताकट, प्रवक्त्या रेखाताई सूर्यवंशी, राजश्री शितोळे, वैशाली कडू, ताई बोराडे, नंदाताई शिंदे, स्वाती पवार आधी प्रदेश कार्यकारणीच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले होते.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष शांताकुमार मोरे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब माने, शहराध्य अनिल सगर, संभाजी ब्रिगेडचे विशाल माने, मंगेश भोसले, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्ता रेखा सूर्यवंशी, रंजना चव्हाण, शोभ पाटील, जिवन जाधव, ज्योतीताई रजपूत, प्रीतीताई शिंदे, मीरा चव्हाण, पूजा सूर्यवंशी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस वितरण संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ जानेवारी -**

शहरातील कॅन्व्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल मध्ये दोन दिवसीय जिल्हास्तरीय विज्ञान, गणित व पर्यावरण प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. गुरुवारी सायंकाळी या प्रदर्शनातील सहभागी प्रयोगांचे बक्षीस वितरण मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रजवलन करून करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॅन्व्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलचे संस्थापक रवि नरहिरे होते. तर उद्घाटक म्हणून महादेव महाराज आडसुळ, कॅन्व्हास स्कूलच्या संचालिका आशा नरहीरे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमते, विज्ञान अध्यापक मंडळाचे जिल्हाध्यक्ष रविंद्र स्वामी, विज्ञान पर्यवेक्षक तारेख काझी, शिक्षण विस्तार अधिकारी, भारत देवगुडे, संतोष माळी, सुशील फुलारी, मैनाबाई मुळे, प्राचार्य संतोष आळंदकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अर्चना बाविकर यांनी केले तर आभार रविंद्र स्वामी यांनी मानले.

दिव्यांग मधून प्राथमिक गटातून माणिक बाबा विद्यालय शेळगाव (ता.परंडा) येथील प्लॅस्टिक पाईप सुक्ष्मदर्शक तर माध्यमिक गटातून जयस्वामी नारायण विद्यालय समुद्राळ (ता. उमरगा) येथील गारबेज टॉनिक या प्रयोगाची निवड झाली आहे. तर शिक्षक शैक्षणिक साहीत्यामधून प्राथमिक गटातून जयहिंद विद्यालय तडवळा ता धाराशिव येथील संदीप पालके यांच्या बेस्ट फ्रॉम वेस्ट तर माध्यमिक मधून जि.प. शाळा सिरसाव येथील दिपाली सबसगी यांच्या मी सकेलेटन बोलतेय या साहित्याची निवड झाली. तर प्रदर्शनीय प्रयोग माध्यमिक गटातून सरस्वती विद्यालय तामलवाडी येथील चार्जिंग कुलर, लिटल फ्लॉवर मराठी स्कूल तुळजापूर येथील अंतर सुचक दर्शक यंत्र, जय हनुमान माध्यमिक विद्यालय तोरंबा येथील कमी जागेत पार्किंग व्यवस्था या प्रयोगाची राज्यस्तरीय निवड झाली. तर प्राथमिक गटातून डॉ.के.डी. शेंडगे इंग्लिश स्कूल उमरगा येथील इलेक्ट्रिसिटी जनरेशन बाय पॉवर, कॅन्व्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल कळंब येथील नॅचरल फार्मिंग, जि.प. शाळा खडकी (ता. तुळजापूर) येथील स्मार्ट ब्रीज या प्रयोगाची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

### यांचाही झाला सन्मान...

हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शिक्षण विभाग, विज्ञान अध्यापक मंडळ व कॅन्व्हास स्कूलचे प्रशासन गेल्या पंधरा दिवसांपासून प्रयत्न करत होते. यामध्ये विविध कमिटया स्थापन करण्यात आल्या होत्या. या कमिटयांचा, तसेच प्रशासनातील व कॅन्व्हासचे कर्मचारी व परीक्षक यांचा सन्मान करण्यात आला.

## सरस्वती विद्यालयाचे विज्ञान प्रदर्शनामध्ये घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जानेवारी -**

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन कळंब येथील कॅन्व्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल मध्ये आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सरस्वती विद्यालय, तामलवाडी येथील घोडके सचिन चंद्रकांत व शिंदे सार्थक शरद (इ.१० वी) मधील विद्यार्थ्यांने चार्जिंग कुलर या प्रयोगाचे सादरीकरण केले होते.



माध्यमिक गटातून या प्रयोगाला जिल्ह्यामधून प्रथम क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले असून पुढे या प्रयोगाची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे.

त्याबद्दल धाराशिव जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकारी सुधा सांळुके, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक तारेख काझी, विस्तार अधिकारी श्रदेवगुडे, यमुगरवाड, कळंबचे विस्तार अधिकारी संतोष माळी, धाराशिव विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र स्वामी, तुळजापूर गटशिक्षणाधिकारी मेहरुन्निसा इनमादर, चव्हाण तसेच संस्थेचे अध्यक्ष मसुते बसवण्णाप्पा, सचिव लोंढे यशवंत, उपाध्यक्ष पाटील ज्ञानेश्वर, सर्व संचालक मंडळ व विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक वडणे सुहास, पर्यवेक्षक सांळुखे चंद्रकांत, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार : दयानंद काळुंके

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१८ जानेवारी -**

घरातल्या घरकर्त्याचे अचानकच निधन झाले, कुटुंब, मुलं बाळं उघड्यावर पडले त्यामुळे मुलांची शाळा बंद करुन बालविवाहासारखा विचार, आत्महत्येसारखा विचार डोक्यातून काढून महाराष्ट्र शासनाच्या सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना पदरात पाडून घ्यावी, निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार आहे असे मत धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य दयानंद काळुंके यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या इटकळचे पोलिस पाटील विनोद सलगरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शंभूराजे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक दिनेश सलगरे, मुख्याध्यापक नवनाथ गायकवाड हे होते.

यासाठी शिक्षक सुधाकर कांबळे, वैशाली देशमाने, राजश्री बागडे, संजीवनी पेठे, शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला होता.

# डिग्गी विरभद्रेश्वर यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ जानेवारी -**

तालुक्यातील डिग्गी येथील ग्रामदैवत विरभद्रेश्वर मंदिर यात्रा महोत्सवानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (ता.१५) रोजी ग्रामदेवत विरभद्रेश्वर लग्न अक्षता सोहळा श्री ची भव्य मिरवणूक व अग्नीप्रवेश झाला. मंगळवारी (ता. १६) रोजी भव्य कुस्त्यांच्या फडाने यात्रेची सांगता झाली. महाराष्ट्रासह कर्नाटकातील हजारो भाविक यात्रेत सहभागी झाले होते.

तालुक्यातील डिग्गी गाव हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात वसले असून ग्रामदैवत विरभद्रेश्वर यात्रेनिमित्त मकर संक्रांतीनंतर दोन दिवस प्रतिवर्षी भव्य यात्रा भरते या यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम घेण्यात येतात. मंगळवारी (ता.१४) रोजी मकर संक्रांतीपासून यात्रा महोत्सवाला सुरूवात होते. बुधवारी सकाळी भद्रकाळी लग्नसोहळ्यानंतर दुपारी श्रीच्या पालखी आणि काठीच्या भव्य मिरवणूकीत गाव, परिसरातील हजारो भाविकांनी यावेळी अग्नीप्रवेश केला. सायंकाळी सहा वाजता मानाच्या रथाची मिरवणूकीने प्रदक्षिणा झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. गुरुवारी दुपारी तीन वाजता कुस्त्यांचा फड रंगला व यात्रेची सांगता झाली. यात्रा उत्सवामध्ये धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न झाले. यात्रेत बाळ गोपाळांसाठी अनेक खेळण्या आल्या होत्या. यात्रेनिमीत्त मोठा बाजारपेठ सजला होतो. अनेक महीला त्यांच्या साहीत्याची खरेदी करीत होते.

आमदार प्रविण स्वामी यांच्यासह मंदीर समितीचे अध्यक्ष सिध्दाराम कवठे, यात्रा कमीटीचे अध्यक्ष युवराज कर्पे, सरपंच आशाताई लिंबारे, उपसरपंच संतोष कवठे, वामन गायकवाड, सुनील बालकुंदे, रविंद्र गायकवाड, दयानंद स्वामी, सचिन हेबळ, विरेंद्र पाटील, दिनकर गायकवाड, मधुकर गायकवाड, विनोद गायकवाड, गुरुनाथ मंठाळे, अप्पाराव पाटील, राहुल कवठे, सिध्दाराम पाटील, शिवकुमार स्वामी, शिवानंद पाटील, डॉ. प्रदीप शिंदे, बालाजी पाटील, नागनाथ तडकले, शांतप्पा कवठे, राजु कुलकर्णी आदींनी यात्रेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांचे वेदिक गणिताच्या परीक्षेत सुयश



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जानेवारी -**

श्रद्धा इन्स्टिटयूट सोलापुर अंतर्गत अंजली अबॅकस व वेदिक क्लासेस नळदुर्ग येथील शालेय विद्यार्थी अबॅकस आणि वेदिक गणिताच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

गुणवत्तापुर्ण शिक्षणाची समाजाला गरज असुन ही गरज ओळखुन नळदुर्ग येथे आशाताई अमोल नरवडे यांनी श्रद्धा इन्स्टिट्यूट अंतर्गत अंजली अबॅकस आणी वेदिक क्लासेसची सुरूवात केली आहे.क्लासेसच्या माध्यमातुन गुणवत्तापुर्ण विद्यार्थी घडावेत व शालेय विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे याकरीता त्या परीश्रम घेत आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेवक डॉ.सिद्रामप्पा खजुरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन अपोलो फर्टिलिटी सेंटरचे सचिव तथा धन्वंतरी आयुर्वेद व पंच कर्म क्लीनिक सोलापुरचे डॉ. कीर्ती कटारे, श्रद्धा इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष पराग शाह, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष मारुती खारवे, श्रद्धा इन्स्टिट्यूटच्या प्रशिक्षिका स्वाती शहा, जवाहर महाविद्यालयाचे डॉ.एम.बी. बिराजदार, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्ष सुजाता चव्हाण, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, अक्षरवेल महिला साहित्य मंडळ नळदुर्गच्या संस्थापिका कविता पुदाले, डॉ. स्वाती पाटील, शारदा चौधरी यांची प्रमुख उपस्थितीत होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुदावाडी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन अमोल नरवडे, अमर नरवडे, मुकुंद नरवडे, यशवंत नरवडे सह नरवडे कुटुंबीयांनी परीश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले.

## केंद्रस्तरीय रांगोळी स्पर्धेत श्रीकांत वाघमारे काक्रंबा केंद्रातुन द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१८ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी श्रीकांत सौदागर वाघमारे यांने काक्रंबा येथील जिल्हा परिषद शाळेत नुकत्याच पार पडलेल्या केंद्र स्तरीय शालेय रांगोळी स्पर्धेत काक्रंबा केंद्रातुन द्वितीय क्रमांक पटकावल्याबदल गटविकास अधिकारी अमोल ताकभाते यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व माँ जिजाऊ यांची प्रतिमा व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षण विभागाच्या वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मागील दोन दिवस तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा जिल्हा परिषद शाळा अंतर्गत येणाऱ्या केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी दोन वेगवेगळ्या गटांत एक ते चार प्राथमिक गट आणि पाच ते आठ उच्च प्राथमिक गट करण्यात आले होत्या.

यामध्ये सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वैयक्तिक गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्याध्यापक उषा उंबरे, उमेश सुर्वेअमीन मुलानी, उमेश सुर्वे, जगन्नाथ वाघे, छगन जगदाळे, अशोक पाटील, सिद्धेश्वर थोरात, अशोक चव्हाण,

दिपाली परदेशी, नंदा मोरे, स्वाती मोरे, अनिल दहीहांडे, विद्यासागर गायकवाड, संजीवनी सरवदे, दत्तात्रय केसकर, प्रीतम कुमार सोळंके, राजू गायकवाड आदी उपस्थितीत होते.

## जयप्रकाश विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जानेवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे शालेय क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन डॉ आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत कबड्डी, संगीत खुर्ची, धावणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदासकोळगे, माजी ग्रा.प. सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकिय अधिकारी

श्रीमती शिवकन्या सांळुके, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**तहसिल कार्यालय, परंडा (कुळ इनाम सिलींग विभाग)**
**जाहीर प्रगटन**

जा.क्र.२०२५/मुसुधार/कुळ/कावि- दिनांकः १६/०१/२०२५

प्रस्तुत जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस जाहिरसरीत्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव, **श्री. जयंत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव, **सौ. साधना दिलीपराव देशपांडे,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा, ता. परंडा येथील **जमीन सर्व्हे/गट नंबर पाडी १७** या गटातील त्यांच्या नावे असलेले सामाईक **क्षेत्र ०० है. ७४ आर, आकार ०२ रु. ५६ पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी या कार्यालयास **दिनांक १३/०१/२०२५** रोजी अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार **श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव, **श्री. जयंत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव, **सौ. साधना दिलीपराव देशपांडे,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा, ता. परंडा येथील जमीन सर्व्हे **गट नंबर पाडी/१७ या गटातील त्यांच्या नावे असलेले सामाईक क्षेत्र ०० है. ७४ आर. आकार ०२ रु. ५० पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसांचे आत लेखी स्वरुपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी आसू यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप उजर तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
(निलेश काकडे)
तहसीलदार, परंडा

**तहसिल कार्यालय, परंडा (कुळ इनाम सिलींग विभाग)**
**जाहीर प्रगटन**

जा.क्र.२०२५/मुसुधार/कुळ/कावि- दिनांकः १६/०१/२०२५

प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव **श्री. जयंत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा, ता.परंडा येथील जमीन सर्व्हे/गट नंबर ५५ या गटातील त्यांच्या नावे असलेले **सामाईक क्षेत्र ०५ हे. २६ आर. आकार १४.५७ पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे मतदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यासाठी या कार्यालयास **दिनांक १३/०१/२०२५** रोजी अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार **श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा ता. परंडा, जि. धाराशिव **श्री. जयंत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर कर मौजे परंडा ता.परंडा येथील जमीन **सर्व्हे/गट नंबर ५५** या गटातील त्यांच्या नावे असलेले **सामाईक क्षेत्र ०५ हे. २६ आर, आकार १४.५७ पैसे** जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटपन प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसांचे आत लेखी स्वरूपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी आसू यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव याचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
(निलेश काकडे)
तहसीलदार, परंडा

**तहसिल कार्यालय, परंडा (कुळ इनाम सिलींग विभाग)**
**जाहीर प्रगटन**

जा.क्र.२०२५/मुसुधार/कुळ/कावि- दिनांकः १६/०१/२०२५

प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख,** रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा, ता. परंडा येथील जमीन **सर्व्हे/गट नंबर ५५** या गटातील त्यांच्या नावे असलेले **क्षेत्र ०५ हे. २७ आर, आकार १४ रू. ५७ पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटार **वर्ग २** जमीन क्षेत्राचे भोगवटदार **वर्ग १** मध्ये रूपांतर करण्यासाठी या कार्यालयास **दिनांक १३/०१/२०२५** रोजी अर्ज दिला आहे

तरी अर्जदार श्री. लक्ष्मीकांत वासुदेवराव देशमुख, रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे परंडा, ता. परंडा येथील **जमीन सर्व्हे/गट नंबर ५५** या गटातील त्यांच्या नावे असलेले **क्षेत्र ०५ हे. २७ आर, आकार १४ रू. ५७ पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमाष इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून (१५) दिवसांचे आत लेखी स्वरूपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी आसू यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
(निलेश काकडे)
तहसीलदार, परंडा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पो.नि. अशोक घोरबांड यांच्याकडे कोट्यावधीची बेहिशोबी संपत्ती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी माजी नगरसेवक रमेश माळी यांनी पत्रकार परिषदेत केली.



पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड हे जाणिवपूर्वक दलित मागासवर्गीय व्यक्तींवरच खोटे गुन्हे दाखल करणे, मारहाण करणे असे प्रकार करत राहतात. ज्या पोलीस ठाण्यात ते रुजू होतात, त्या हद्दीत बनावट एन्काऊंटर करणे असे प्रकार देखील घडले आहेत. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू मारहाणीतच झाल्याचा अहवाल आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी रमेश माळी यांनी केली.

याचबरोबर पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्याकडे लोहा तालुक्यातील कलंबर, पुणे जिल्ह्यातील बाणेर, कंधार तालुक्यातील राहाटी, चिखली तसेच वसमत व नांदेड शहरात कोट्यावधीची बेहिशोबी मालमत्ता आहे. या मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी यापूर्वी देखील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकाकडे केलेली आहे. त्याचबरोबर उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात देखील याचिका दाखल करण्यात आली असून, या महिन्याच्या अखेरीस त्या याचिकेवर देखील सुनावणी होणार आहे. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्याकडे जवळपास ५० ते ६० कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता असून, त्यांचे नातलग व मित्र परिवाराच्या नावाने देखील ४५ ते ५० एकर जमीन आहे. या सर्व संपत्तीची चौकशी व्हावी तसेच त्यांची एसआयटी, सीआयडी मार्फत चौकशी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात येणार असल्याचेही रमेश माळी यावेळी म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्यातर्गत दि.२६ जून २०१२ रोजी दोन जणांचा बनावट एन्काऊंटर करण्यात आला होता. या प्रकाराची देखील चौकशी करावी, अशी मागणी माजी नगरसेवक रमेश माळी यांनी पत्रकार परिषदेत केली.

# धर्माबाद तालुक्यातील बेलुर येथील निराधार महिलेच्या घराला आग

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १८ जानेवारी**

तालुक्यातील बेलुर बु येथील रहिवाशी निराधार महीला लिंगाबाई शंकर रामडगे व १ मुलगा,१ मुलगी हे त्या घरात राहत होते .काल दुपारी १२:१५ वाजताच्या सुमारास अचानक शॉर्टसर्कीटने आग लागून घरातीलजीवनावश्यक सर्व साहित्य जळून खाक झाले. यामध्ये घरातील सामान कपडे राशन भांडे बर्तन सर्वच जळून खाक झाले आहे.

शॉर्टसरकीने आग ही दुपारच्या वेळी लागल्याचे माजी सरपंच तथा पत्रकार बाबुराव आलूरकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधींना सांगितले. उपरोक्त पार्श्वभूमीवर शॉर्टसर्किटने आग लागण्याच्या घटना वाढत असून यामध्ये उंदरांचा वावर मोठ्या



प्रमाणात वाढल्यामुळे घरातील इलेक्ट्रिक कार असेल वायर असेल हे मोठ्या प्रमाणात उंदीर कट करत आहेत. असे असले तरी संबंधित महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी घरातील मीटर घेतल्यानंतर केलेली वायरिंग ही नादुरुस्त असल्याचे बऱ्याच ठिकाणी आढळून येत आहेत. त्या निराधार महिलेच्या घरातील वायरिंग ही निकृष्ट दर्जाची होती का विद्युत महामंडळाकडून अशा घटना घडवू नयेत म्हणून याची दक्षता घेतली जात होती का? या निराधार महिलेच्या घराला लागलेल्या आगीवरून एक ना अनेक प्रश्न निर्माण होत असले तरी सध्या सदर निराधार महिलेस सर्वच स्तरातून मदत करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आव्हान सोशल मीडियाद्वारे करण्यात येत आहे

## संक्षिप्त वृत्त



### शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रमेश कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम खोसडे

**नवीन नांदेड** -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भायेगाव ता.जि.नांदेड येथे दिनांक १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात आलेल्या शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीत अध्यक्ष रमेश मारुती कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम रावसाहेब खोसडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भायेगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली सदरील निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या निवडणुकीसाठी प्रथम मतदान पद्धतीने सर्व उमेदवार निवडण्यात आले व नंतर दहा उमेदवारातून बिनविरोध अध्यक्ष रमेश कोल्हे व उपाध्यक्ष श्रीराम खोसडे यांची निवड करण्यात आली सदरील निवडीची विशेषबाब म्हणजे गावातील यज्ञकांत कोल्हे हे सतत सरपंच पदापासून ते आमदारकीच्या निवडणुकीत निवडणूक लढवीत असतात पण त्यांना आतापर्यंत निवडणुकीत यश प्राप्त झाले नाही तरीसुद्धा त्यांनी या शालेय समितीच्या निवडणुकीत भाग घेतला पण त्यांना चार मत पडली आणि ते पराभूत झाले. अशा प्रकारे ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या निवडणुकीत शालेय समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी रमेश मारोती कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम रावसाहेब खोसडे यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेतून सदस्य कल्पना बालाजी कोल्ह,रेणुका गंगाधर कोल्हे ,दिगांबर नागोराव भालेराव, ज्ञानेश्वर रामचंद्र कोल्हे, शिवकांत संभाजी कोल्हे, व्यंकटी कामाजी कोचार, ज्योती गंगाधर कोल्हे, राहुल गणपती खोसडे या सर्व सदस्यांची निवड करण्यात आली ही निवडणूक मुख्याध्यापक कल्याणकर डी.जी. व सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी उपसरपंच बालाजी कोल्हे, पोलीस पाटील सुमनबाई शिवानंद खोसडे, तंटामुक्त अध्यक्ष विश्वनाथ कोल्हे, माजी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देवराव कोल्हे, उपाध्यक्ष निर्मला कोल्हे, शाळेतील शिक्षक शिंदे डी.डी., कोंडलवाडे एम. एम., श्रीमती उत्तरवार डि.के., घोरबांड पी.टी., कपाटे एस. व्ही., अर्थ फाउंडेशनचे ज्ञानोबा सूर्यवंशी, सुभाष जोगदंड, शिवशंकर मुळे, शिवानंद खोसडे यांच्यासह शाळेतील मुलांचे पालक शिक्षण प्रेमी नागरिक व ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. सदरील निवडी प्रक्रियेनंतर निवडून आलेल्या उमेदवारास व सदस्यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या व कोंडलवाडे एम एम यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

### पौष पौर्णिमेनिमित्त खुरगावला आज पौर्णिमोत्सव कार्यक्रम

**नांदेड**-पौष पौर्णिमेनिमित्त आज १९ तारखेला पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पौष पौर्णिमेला बुद्धकाळात काही महत्वपूर्ण घटना घडल्या आहेत. राजा बिंबीसार याने राजगृह येथे बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. वेळुवन भिक्षुसंघास दान म्हणुन अर्पण केले. यावेळी तथागतांनी वेळुवनात ४५ वा वर्षावास केला. या निमित्ताने मोठया उत्सवाचे आयोजन करण्यात आले. याच पौर्णिमेला राजा बिंबिसार यांची महाराणी खेमा यांनीही गौतम बुद्धाकडून धम्मदीक्षा घेतली. श्रीलंकेत ज्याप्रमाणे स्तुपाची पुजा केली जाते तद्वतच पौष पौर्णिमेला स्तुपाची पुजा करण्याचा प्रघात आहे. यासंबंधीने खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात भव्य स्वरूपातील या स्तुपाचे बांधकाम करण्यात येत आहे. या निमित्ताने सकाळपासूनच परित्राणपाठ त्रिरत्न वंदना, बुद्ध पुजा, गाथापठण, ध्यानसाधना, बोधीपुजा, भोजनदान, दान पारमिता, धम्मदेसना तसेच बुद्ध भीम गितांचा प्रबोधनपर कार्यक्रम आदी कार्यक्रम होणार आहेत.

# धर्माबादमध्ये मुरूम-रेती माफियांचा धुमाकूळ: प्रशासन निष्क्रिय

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १८ जानेवारी**

शहरात मुरूम आणि रेती माफियांनी नियमांची तमा न बाळगता अवैध वाहतूक सुरू ठेवली आहे. शहरात प्लॉटिंग आणि बांधकामासाठी मुरूम-रेतीची मागणी वाढली आहे, आणि त्याचा फायदा घेणारे माफिया रात्रभर अवैध वाहतूक करत आहेत. यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहतूक



सुसाट धावत आहे, आणि प्रशासन मात्र याकडे चांगलाच दुर्लक्ष करत आहे. गेल्या आठवड्यात मुरूमाने भरलेल्या एका वाहनाने मध्यरात्री इनोव्हा गाडीला जोरदार धडक दिली, ज्यामुळे गाडी चालक गंभीर जखमी झाला. अपघातानंतर, दुसऱ्या दिवशी आयजींच्या पथकाने एक वाहन जप्त केले. मात्र, अशा कारवाईनंतरही शहरात मुरूम-रेतीची अवैध वाहतूक अद्याप सुरूच आहे.

शहरातील नागरिकांमध्ये प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी आहे. माफियांनी वेगवेगळ्या मार्गांनी अवैध वाहतूक सुरू ठेवली आहे, आणि प्रशासनाने यावर ठोस पावले उचललेली नाहीत. नागरिकांच्या तक्रारींवर प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे माफियांचे धाडस वाढले आहे. अवैध वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था होत असून, नवीन बांधकामासाठी तयार केलेले रस्ते पुन्हा खराब होत आहेत. मध्यरात्री दवाखान्यास व खाजगी काम जाणारे वाहन या अवैधरित्या वाहतुकी समोरून जाण्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होत आहे.

नागरिकांनी शहरातील प्रशासनाला अवैधरित्या वाहणारे मुरूम व रीतीचे वाहने पकडण्यास यश येईल का व या वाहतुकीला थांबण्यास यश येईल का अशी उलट सुलट चर्चा शहरातून समोर येत आहे.

# बाऱ्हाळी येथील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. १८ जानेवारी**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज नानीजधाम संस्थानच्या वतीने राज्यात रक्तदान महायज्ञ शिबिर आयोजित करण्यात येत असून याला भाविकातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी बा-हाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित रक्तदान शिबिरात १८६ महिला पूरुष रक्तदात्यानी आपला सहभाग नोंदवत रक्तदान केले.

जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज नानीजधाम यांच्या प्रेरणेने राज्यात दि. ४ ते १९ जानेवारी या पंधर वाड्यात जवळपास १ हजार कॅम्प च्या माध्यमातून महारक्तदान महायज्ञाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात १ लाख रक्त बाटल्या संकलनाचे उद्दीष्टये



ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने बा-हाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शुक्रवारी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विजयाताई देशपांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून राजन देशपांडे,शेखर देशमुख ,हनमंत मामा वाडीकर ,बालाजी सोमवार ,सतीश महाजन,प्रा.बळवंतराव देशपांडे, मू.अ.अशोक पंचगट्टे डॉ. सौ दर्शना राठोड ,शामभाऊ नागलगावे उपस्थित होते.सकाळ पासून भाविकातून चांगला प्रतिसाद मिळाला .सायंकाळी ६ वा.पर्यंत १८६ स्त्री व पूरूष रक्तदात्यांनी रक्तदान केले. गूरूमाउलींच्या आरतीने शिबिराची सांगता करण्यात आली. या प्रसंगी गुरु गोविंद सिंह शासकीय रक्त पेढी नांदेड व अर्पण रक्त पेढी नांदेड यांनी रक्त संकलनाचे कार्य केले . रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवकूमार पांचाळ ,ईबितदार ,शिवाजी गवते ,उत्तम वाडीकर ,बालाजी जाधव ,दिलीप महाजन ,साईनाथ कोटगीरे, मारोती जळकोठे,गणेश पांचाळ ,साईनाथ दाचावार ,उतम सूगावकर, राजू पाटील थोटवाडीकर ,व्यंकट देशेटवार,अंकूश चिंचलवाड ,दत्तात्रय कारळे ,सन्मूख मठदेवरू,राम चव्हाण, भाऊसाहेब लामतूरे , माधव पांढरे ,सौ.पूजा उमाटे,चांगूणाताई पवार , स्वाती चिंचलवाड ,कल्पना कूलकर्णी,ज्योती कोटापल्ले,जयश्री वाडीकर बिराजदार नर्स अनिता दावलपूरे यांच्या सह अनेकांनी परीश्रम घेतले.

# रेणुकामातेच्या दर्शनासाठी ना.पंकजाताई मुंडे उद्या माहूरगडावर

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १८ जानेवारी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन पंकजा गोपीनाथ मुंडे दि.२० जानेवारी होणार रोजी दुपारी ३ वाजता त्यांचे माहूर येथे आगमन होणार असून, श्री रेणुकादेवीचे दर्शनासाठी त्या गडावर जाणार आहेत. सायंकाळी ५ वाजता माहूरगड येथून नागपूरकडे वाहनाने रवाना होणार आहेत.



दरम्यान, किनवट-माहूरचे भाजपाचे आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर येथील भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे, नगरसेवक सागर महामुने, तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर, भाजयुमो ता.अ.विनायक मुसळे व महिला पदाधिकारी तालुक्यातील कार्यकर्त्यांसह ना.पंकजाताई मुंडे यांच्या माहूर दौऱ्यानिमित्ताने जय्यत तयारीला लागले आहेत.

# ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र गहाळ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई तसेच राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे) ता. लोहा जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र गहाळ यांची अध्यक्षपदी निवड करण्यात येवून त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

लोहा तालुक्यातील राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे.) या संस्थेच्या वतीने साहित्य संमेलन अध्यक्ष निवड समितीची बैठक ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांचे अध्यक्षतेखाली १५ जानेवारी रोजी संपन्न झाली.

# सेपक टाकरॉ स्पर्धेस जिल्ह्याचा मुला, मुलींचा संघ वर्धा येथे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

दि.१७ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत वर्धा येथे २५ वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर सेपकटाक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धे साठी १३ जानेवारी २०२५ या कालावधीत लिटिल स्कॉलर्स पब्लिक स्कूल नांदेड या शाळेच्या मैदानावर निवड चाचणीतून नांदेडच्या मुला,मुलींचा संघ निवड करण्यात आला होता.

निवड झालेला संघ दि.१७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ६ वाजता वर्धा येथे रवाना झाला.निवड झालेल्या संघ खालील प्रमाणे-मुले: क्षितीज सूर्यवंशी, रोहित सूर्यवंशी , सुदेश कांबळे, असंग जोंधळे, आर्यन केशेट्टीवार,सक्षम कुपटीकर, वेदांत दासे, वेदांत सूर्यवंशी, रोहन फड, पार्थ तांदळे,मयूर वाकडे,सोमनाथ धुमाळे,श्रीनिवास शिंदे, विशाल फुलारी, तर मुली मध्ये आरती ठाकूर,श्रद्धा अवस्थी,सृष्टी नरवाडे,प्रशंसा वाडीकर, काशिनी कुपटीकर, अंकिता जाधव,सृष्टी जंगीलवाड, पलक्षा येरेकर, श्रेया गच्चे,रक्षीता बकवाड ,तेजस्विनी काळे तर प्रशिक्षक म्हणून रविकुमार बकवाड आदीजन वर्धा येथे रवाना

झाले आहेत. वरील खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा संघटनेचे सचिव प्रवीणकुमार कुपटीकर , लिटिल स्कॉलर्स पब्लिक स्कूल चे अध्यक्ष रवींद्र रेड्डी,मुख्याध्यापिका सौ.उज्वला राणे, क्रीडा अधिकारी संजय बेतीवार,बालाजी शिरसीकर यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# माध्यमिक आश्रम शाळेतील तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १८ जानेवारी**

नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेतील भव्य पटांगणात इतर मागास बहूजन समाज कल्याण नांदेड विभागाच्या नांदेड वतीने तालुका स्तरीय सांघिक क्रिडा स्पर्धा यशस्वीपणे घेण्यात आल्या इतर मागास बहूजन समाज कल्याण प्रादेशिक विभाग लातूर व इतर मागास बहूजन समाज कल्याण विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर, लोहा, कंधार, मुखेडसह या चार तालुक्यातील वि.जा.भ.ज.च्या सर्व आश्रम शाळेतील प्राथमिक वयोगटातील १४ तर माध्यमिक १७ या वयोगटातील विद्यार्थी, विद्यार्थीनी चे शैक्षणिक क्षेत्रासह व्हॉलीबॉल, कबड्डी,खो खो, या सांघिक क्रिडा क्षेत्रातून प्रगती व्हावी त्यांच्यात सांघिक भावना वृध्दिंगत व्हावी ते शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त रहावेत या अनुषंगाने दि. १६ जानेवारी रोजी नायगांव तालुक्यातील पोष्टबेसिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेच्या प्रांगणात तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी क्रिडा स्पर्धेच्या कार्यक्रमाच्या स्थळी रामतिर्थ चे साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप, नायगांव पो. स्टे.जमादार गणपत पेदे, पो.हे.कॉ. शेख हाबीब पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी संग्राम कांबळे, माजी प्राचार्य किशन राठोड संस्थेचे कार्य वाहक तथा सरपंच डॉ.मधुकर राठोड, सुर्यकांत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. माधव वाघमारे यांच्या संचाच्या सुगम संगीताने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड व उद्धघाटक नायगांवच्या तहसीलदार सौ.डॉ धम्मप्रिया गायकवाड ह्या सामुहिकपणे



विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेच पुजन करीत दिप प्रज्वलन करून अभिवादन केले. तद्नंतर उपस्थित सर्व उपस्थितांचे संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्यानंतर रामतिर्थ चे स.पो.नी.जगताप यांनी राज्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांने शैक्षणिक प्रवाहसह क्रिडा क्षेत्राकडे मनोरंजनाच्या दृष्टीने न पाहता क्रिडाक्षेत्रातून विद्यार्थाना शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त राहत स्वतःचे करिअर घडविता येते. व विद्यार्थांची सांघिक भावना वाढीस मदत होते असे या वेळी मनोगत व्यक्त केले.सत्कार समारंभा नंतर स.पो.नि. जगताप साहेबाच्या हस्ते राष्ट्रीय खेळ कबड्डी व खो खो या मैदानाचे पुजन करुन श्रीफळ फोडून खेळाडूंना शुभेच्छा देत खेळाची सुरुवात करण्यात आली. यावेळी तालूका स्तरीय सांघिक खेळात चार तालुक्या तून जवळपास एकोणीस शाळेनी सहभाग नोंदविला होता.या पैकी व्हॉलीबॉल संघातून १७ व१४ वयोगटातून मुले माध्यमिक आश्रम शाळा शिराढोणने प्रथम क्रमांक मिळविला तर मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेने १७ वयो गटातून मुलींनी प्रथम क्रमांक मिळवित जिल्हास्तरी य खेळासाठी अव्वल स्थान मिळाविले आहे तर माध्यमिक आश्रम शाळा काकांडीने १४ वयोगटातील मुलीनी प्रथम क्रमांक मिळविला तर राष्ट्रीय खेळ कबड्डी ह्या संघातून माध्यमिक आश्रम शाळा गांधीनगरने १७ वयोगटातील मुलांनी प्रथम आले व मा आ शा.काकांडीने१४ वयोगटातून मुले प्रथम आले. तर माध्यमिक आश्रम शाळा शिराढोण १७ वयोगटातील मुली प्रथम तर माध्यमिक आश्रम शाळा कांकाडीने १४ वयोगटातून मूलीचा संघ प्रथम आला आहे. तर खो खो या सांघिक खेळातून माध्यमिक आश्रम शाळा कुंटूरने १७ ,१४ वयोगटातून दोन्ही संघ मुले व १४ वयो गटातून प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला आहे तर माध्यमिक आश्रम शाळा शिराढोण १७ वयोगटातील मुली प्रथम क्रमांक मिळवित जिल्हास्तरी सांघिक खेळासाठी पात्र ठरला आहे अशा रीतीने सायंकाळी सहा वाजता तालुका स्तरीय सांघिक खेळाची सांगता झाली तद्नंतर उपस्थित सर्व संघ शिक्षक खेळाडूसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था केली होती तद्नंतर विजय संघातील मार्गदर्शक शिक्षकाचे व या क्रीडा स्पर्धेतील सर्व पंचाचे माध्यमिक आश्रम शाळेच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन राठोड, प्राचार्य विजयकुमार देशमुख,कार्य वाहक तथा सरपंच डॉ.मधुकर राठोड व माजी प्राचार्य किशन राठोड यांनी आभार व्यक्त केले तर विजयी खेळाडूचे कौतुक करीत पुढील जिल्हास्तरीय खेळासाठी शुभेच्छा दिल्या.

या तालूका स्तरीय सांघिक क्रिडा स्पर्धेत कुठलाही वाद न होता स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गेले तिन चार दिवसांपासून पोष्ट बेसिक ,माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील स्थापन केलेल्या सर्व कमिटीतील शिक्षक वृंद प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे संस्थेच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले.

# ‘बारा आण्याची बोंब’ म्हणजे बोलीभाषेचे अस्सल कसदार कणीस

## कथाकार राम तरटे यांच्या हस्ते बहिर्जी विद्यालयाचा स्नेहसंमेलन उद्‌घाटन समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

गिरगाव येथील बहिर्जी स्मारक विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलनाचा उद्घाटन समारंभ प्रसिध्द कथाकार राम तरटे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला . त्यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना अस्सल ग्रामीण बोलीभाषेचा बाज असलेली त्यांची ' बारा अण्याची बोंब ' कथा सादर केली ज्यातून हर्षविनोदाचे फवारे उमटत विदयार्थांनमध्ये उत्साह संचारला .

या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष गिरगाव शाळासमितीचे अध्यक्ष शंकरराव कऱ्हाळे यांनी भुषविले . विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द कवी प्रा. कल्याण कदम, गिरगावच्या सरपंच पुनमताई प्रमोद नादरे , नृत्य दिग्दर्शक कृष्णा देवणे, गितांजली भोंग, शाळासमितीचे सदस्य तुषार नादरे, मुक्तार नदाफ, राजकुमार कऱ्हाळे , गुलाबराव कऱ्हाळे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रकाश इंगळे यांनी या विद्यालयाचा गेल्या २५ वर्षात पासूनचा स्नेहसंमेलनाचा वैविधपुर्ण उपक्रमांच्या इतिहासाला उजाळा दिला. पारंपारिक स्वागत गीताला फाटा देत विद्यार्थांत उर्जा पेरणारे लोककवी वामनदादा कर्डकांचे तुफानातील दिवे या गीतांने स्वागत केले.

विशेष अतिथी कवी प्रा. कल्याण कदम यांनी 'सेनिमाला घेऊन चला', तलाठी गेल्या कुण्या गावा ' या कवितेने माहौल बनविला . त्याला कळस राम तरटे यांच्या कथेने घातला. आज पासून सुरू झालेल्या स्नेहसंमेलनात



गीत गायन, कथाकथन, वक्तृत्व, अंताक्षरी, प्रश्नमंजुषा आणि नृत्य, नाट्याचा सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख कवी श्रीनिवास मस्के यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक चंद्रकांत राऊत यांनी मानले. यावेळी विद्यार्थी संसदेचा अध्यक्ष क्षितीज नादरे , कर्ण नादरे , वैष्णवी कऱ्हाळे , संस्कृती कऱ्हाळे , वेदिका कदम यांचा सहभाग होता . कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रिडा प्रमुख विलास नादरे ,सांस्कृतिक विभागातील सुनिल घुगे , श्रीमती अर्चना चवणे , संजय नाकोड , वाठोरे , श्रीमती भोसले , श्याम कांबळे , पवळे सर आदींनी सहकार्य केले . या वेळी मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांची उपस्थिती होती . दरम्यान स्नेह संमेलनाच्या उद्घाटनात बोलताना कथाकार राम तरटे म्हणाले की , ग्रामीण मातीतील विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचा विकास करणे आवश्यक असते. स्नेहसंमेलना सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमातून अनेक अभिनेते आणि अभिनेत्री घडल्या आहेत . येथून उत्तम वक्ते, उत्तम कथाकार आणि सर्वोत्तम कवी ही घडवले जातात. त्यामुळे स्नेहसंमेलनाचा आनंद घेत असताना स्नेहसंमेलनाचे महत्त्व समजून घेऊन त्या अनुषंगाने स्वतःला घडवणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनातील न्यूनगंड बाजूला काढून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि उज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रम घेऊन यश मिळवावे. त्यासाठी आतापासून मनाची तयारी करून अभ्यासाला लागावे असे सांगून अस्सल बोलीभाषेतील' बारा आण्याची बोंब ' कथा सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मालमत्ता करदात्यांसाठी प्रोत्सानपर बक्षीस योजना

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती.

त्यानंतर लातूरकराना एक अनोखी भेट म्हणून दिं.२० जानेवारी २०२५ ते दि. १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकबाकीसह चालू अर्थिक वर्षातील संपूर्ण कराचा एक रक्कमी भरणा करणा-या करदात्यास लातूर शहर महानगरपालिकेमार्फत प्रोत्सानपर बक्षीस योजना राबवण्यात येणार असून, विजेत्यांची नावे ऑनलाइन पधतीने निवडण्यात येणार आहेत. योजनेच्या कालावधीतील टॅक्स भरणा पावती ही सहभाग असल्याचे नोंद होईल .

वरील मुदतीत कर भरणा करणा-या कर दात्यास मालमत्ता कर श्रेणीनुसार खालील प्रमाणे प्रोत्सानपर बक्षीस देण्यात येणार आहे. कर गुप्र रु.१ ते ५००० करिता बक्षीस वस्तू १५ (मिक्सर), कर गुप्र रु. ५००१ ते १०००० करिता बक्षीस वस्तू १० (कुलर) कर गुप्र रु. १०००१ ते २५००० करिता बक्षीस वस्तू ५ (फ्रिज) कर गुप्र रु. २५००१ ते १००००० करिता बक्षीस वस्तू २ (कलर टि.व्हि) कर गुप्र रु. १००००० वरील सर्व, वस्तू १ (स्कूटी बाईक) वरील प्रमाणे प्रोत्सानपर बक्षीस योजनासाठी वस्तू ठेवण्यात आल्या असून विजेत्यांची निवड १३ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे .तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये कर भरणा करून योजनेत सहभाग नोंदवुन आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा करावा व बक्षीस जिंकावे असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## रेल्वेस्थानकातील पिट लाईनच्या कामाला गती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
अमृत भारत योजनेंतर्गत लातूर रेल्वेस्थानकात पिट लाईनसह स्थानक इमारतीचे काम सुरू आहे. काम पूर्ण झाल्यावर रेल्वेंची संख्या वाढून प्रवाशांची सोय होणार आहे. स्थानकात सुरू असलेल्या कामांचा सोलापूर मंडल रेल्वे प्रबंधक डॉ. सुजित मिश्रा यांनी आढावा घेत कामाला गती देण्याच्या सूचना केल्या. तसेच खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी कामाची पाहणी केली.

पिट लाईनचे काम पूर्ण झाल्यावर लातूर रेल्वेस्थानकात रेल्वे थांब्यांची संख्या वाढून गाड्यांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. शिवाय, मुंबई, तिरुपतीकडे जाणाऱ्या रेल्वेंची या ठिकाणी मेंटेनन्सची कामे होतील. शिवाय, हरंगुळ ते पुणे सुरू असलेली रेल्वे येथील स्थानकातून जाईल. मालवाहतूक करणाऱ्या रेल्वेची सोय होणार आहे. त्याचबरोबर प्रवाशांना सुविधा देण्यासाठी एस्केलेटर उभारणीचे काम सुरू आहे. यामुळे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर जाणे सहज शक्य होणार आहे. एकप्रकारे लिफ्टची सुविधा करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक इलेक्ट्रो लॉकिंगचेही काम करण्यात येत असल्यामुळे सिग्नल व्यवस्था मजबूत होणार असल्याची माहिती स्टेशन प्रबंधक संजीवकुमार अर्धापुरे यांनी दिली आहे

## पैशाचे कारण; दगडाने मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
पैसे देण्याच्या कारणावरून एकास लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना करंजीनजीक घडली. याप्रकरणी जळकोट पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुरुवारी गुन्हा दाखल आहे. करंजी येथील मन्मथ सोनटक्के यांनी पैसे देण्याच्या कारणावरून गावातील फिर्यादी शिवलिंग सोनटक्के यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दरम्यान, लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली. त्यात फिर्यादी जखमी झाले. त्यानंतर आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी शिवलिंग सोनटक्के यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बालरोग तज्ज्ञ संघटनेची आरोग्यदायी बस यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
लहान मुलांमध्ये ॲनिमिया म्हणजे पांढरी कावीळ आणि विविध श्वसन विकार यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीने एक अभिनव उपक्रम सुरु केला आहे. पांढरी कावीळ व श्वसन संस्थेचे विकार, कुठलीही सुई न टोचता तपासणी करण्यासाठी एक अत्याधुनिक बस संपूर्ण भारत भ्रमण करणार आहे. शुक्रवारी लातुरात या बसचे आगमन झाले. यावेळी लातूर शाखेच्या पुढाकारातून श्री व्यंकटेश विद्यालयात विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. आरोग्य लातूर येथील श्री व्यंकटेश विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष पटणे गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिबीर घेण्यात आले. उद्घाटन एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नवाब जमादार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मेटे होते. यावेळी बालरोग शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विद्या कांदे यांनी लहान मुलांना पोषक आहार, मैदानी खेळ व मोबाईलचा कमीत कमीत वापर अशी निरोगी जीवनशैलीची त्रिसूत्री सांगितली.

## बुधवारी लातुरात तालुका, जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६ या कायद्याविषयी तालुका व जिल्हास्तरीय एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा २२ जानेवारी २०२५ रोजी लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. पुणे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) व लातूर समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

# आ. देशमुख यांनी केली केंद्रीयमंत्र्यांशी विविध विषयावर चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -** लातूर ते टेभुर्णी या संपूर्ण रस्तयाचे एकत्रित चौपदरीकरण करावे, येडशी ते टेभुर्णी दरम्यानच्या कामालाही मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन दयावा, पु. अहिल्याबाई होळकर चौक ते जीवाजी महाले चौक हा रस्ता मिसीक लींक म्हणून चौपदरीकरणाने जोडावा, त्याच बरोबर साखर आणि इथेनॉलचे दर वाढविण्यासाठी केंद्राकडे पाठपूरावा करावा, लातूर, धाराशिव, बीड जिल्ह्यात ऑटोमोबील इंडस्ट्रि कल्स्टर तसेच ई-मोबीलीटी सेंक्टर झोन निर्माण करावेत आदी मागण्याचे निवेदन आ.अमित देशमुख यांनी दिल्लीत केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी भेट घेऊन यांना निवेदन दिले.

महामार्गाचे प्रलंबीत विषय मार्गी लावण्याचीही विनंती केली. साखर तसेच ऑटोमोबील इंडस्ट्रि संदर्भाने यावेळी चर्चा केली. लातूर-टेभुर्णी महामार्गावरील मुरुड अकोला-येडशी दरम्यानच्या कामासाठी ५४७ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिल्या बद्दल आमदार देशमुख यांनी नामदार गडकरी यांचे यावेळी विशेष आभार मानले. येडशी ते टेभुर्णी दरम्यानच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची व संपूर्ण महामार्गाचे एकत्रित काम पूर्ण करावे, लातूर शहरातील पु. अहिल्याबाई होळकर चौक ते जिवाजी महाले (चौक गरुड) चौक दरम्यान राष्ट्रीय महामार्ग ३६१ आणि राष्ट्रीय महामार्ग ५४८ ई या दोन राष्ट्रीय महामार्गाला जोडणा-या रस्त्याचे मिसिंग लिंक म्हणून चौपदरीकरण करावे.



लातूर ते जहीराबाद (७५२ L) या राष्ट्रीय महामार्गाला ठिकठिकाणी तडे गेले आहेत, साईड पट्ट्या खचल्या आहेत, नाल्याचे काम व्यवस्थित झाले नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून ते काम दुरुस्त करून घ्यावे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६३ ची सुपर लिंक म्हणून शिरुर ताजबंद ते उदगीर या रस्त्याचे बांधकाम करावे. पुणे सोलापूर हैदराबाद (एन. एच-६५ या महामार्गावरील वाहतूक आता खूप वाढली आहे परिणामी प्रवासाचा वेळ अधिक झालाय, अपघातही होत आहेत. त्यामुळे या महामार्गाचे रुंदनीकरण नव्याने करायला हवं ही बाबसुद्धा चर्चेमध्ये आणली आणि या संदर्भामध्ये नव्याने सर्वेक्षण करण्यासंदर्भामध्ये मंत्री गडकरी यांनी सूचना दिले. विशेषत: उमरगा फाटा येथील कामे कासवगतीने सुरु आहे.

त्यांच्यामुळे प्रवाशांचे हाल होतात त्या संदर्भामध्येसुद्धा त्यांनी कडक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याआहेत, हा जो महामार्ग आहे. याची रुंदी आणखी वाढेल आणि भविष्यामध्ये तो आठ पदरी दहा पदरी होईल अशी अपेक्षा आहे. साखर व इथेनॉल दर वाढीसाठी केंद्राकडे पाठपूरावा करावा साखर कारखान्याचे गळीत हंगाम सुरु असुन या हंगामात साखरेचे उत्पादन घटत असून कारखान्याना आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. या अनुषंगाने महाराष्ट्रातील आणि देशातील साखर उद्योगासंदर्भानेही यावेळी चर्चा झाली. साखरेच्या हमीदराच्या संदर्भामध्ये मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधले. केंद्र सरकारच्या स्तरावर या संदर्भाने चर्चा सुरू आहेत त्यास आणखीन गती देण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

इथेनॉलच्या दराच्या दरामध्येही अशाच पद्धतीने वाढ करण्याच्या संदर्भाने मागणी त्यांच्याकडे नोंदवली, साखर आणि इथेनॉल याचे हमीदर वाढले तर एकंदरीतच साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळेल आणि देशांमध्ये आणि राज्यातील साखर कारखान्याकडे असलेली थकबाकी कमी होईल असे देशमुख यांनी निवेदनात म्हटले आहे.

## अर्थसंकल्पात राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देवू, असे आश्वासन देवून राज्यात सत्तेत आलेल्या महायुती सरकारने तातडीने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी. येणाऱ्या अर्थसंकल्पात याबाबतची घोषणा करून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी माजी आ. धिरज देशमुख यांनी केली.

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, यासाठी केंद्रीय कृषिमंत्री श्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धिरज देशमुख यांनी पत्र पाठवले आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे तर मार्च महिन्यात राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. यात राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देवून दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

मागील २०२४ च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने बिहार राज्याला २६ हजार कोटींचा भरीव निधी मंजूर केला होता असेही देशमुख म्हणाले.

## लातुरातील इलेक्ट्रिक बस चार्जिंग सेंटरला मिळाली जागा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
प्रवाशांना वातानुकूलित आणि आरामदायी प्रवास करता यावा, यासाठी एस.टी. महामंडळाने इलेक्ट्रिकल बस प्रवाशांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर विभागांतर्गत येणाऱ्या औसा, निलंगा, अहमदपूर आणि उदगीर या चार आगारांमध्ये चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. लातूर आगाराला चार्जिंग स्टेशनसाठी जागा मिळत नव्हती. ती आता मिळाली असून वीजपुरवठ्याचे काम रखडले आहे. बसेस चार्जिंग करण्यासाठी चार्जिंग पॉईंट उभारल्यानंतर मंजूर १०६ ई-बसेस प्राप्त होणार आहेत. जानेवारी महिनाअखेर पाचपैकी दोन तरी आगारातून ई-बसेस धावणार आहेत, असे सांगण्यात आले आहे.

एस.टी. महामंडळातर्फे विविध मार्गांवर ई-बसेस धावत आहेत. लातूर विभागालाही १०६ इलेक्ट्रिकल बस मंजूर झाल्या आहेत. सद्यःस्थितीत लातूर विभागातील सर्व बसेस या डिझेल इंधनावर चालतात, तर इलेक्ट्रिकल व्हेइकल या विद्युत चार्जिंगवर चालणार असल्याने महामंडळाचा इंधनावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. याशिवाय या बसेस धुरमुक्त असल्याने वायू प्रदूषणही होणार नाही. या बसेसमध्ये वातानुकूलित यंत्रणा, पुश बॅक सीट आणि आरामदायक बैठक व्यवस्था असल्याने प्रवाशांना चांगली सुविधा मिळणार आहे. या बसेस विद्युत बॅटरीवर चालणार असून लातूर विभागातील औसा, निलंगा, अहमदपूर आणि उदगीर या चार आगारांमध्ये चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. लातूर आगाराला चार्जिंग स्टेशनसाठी जागा मिळत नव्हती, आता ती मिळाली आहे. मात्र, वीजपुरवठ्याचे काम रखडले आहे. ते पूर्णत्त्वास आल्यानंतर लातूरच्या चार्जिंग स्टेशनच्या कामाला सुरूवात होणार आहे.

> लातूर येथे चार्जिंग स्टेशनसाठी जागा आणि वीजपुरवठ्यासंदर्भात अडचणी आल्या होत्या. परंतु, आता चार्जिंग स्टेशनला जागा उपलब्ध झाली आहे. केवळ वीजपुरवठ्याचा प्रश्न आहे. तो दूर झाल्यानंतर चार्जिंग स्टेशनच्या उभारणीला सुरूवात केली जाणार आहे. मात्र, जानेवारी महिनाअखेर विभागातील किमान दोन तरी आगारांतून ई-बसेस धावतील.
>
> **- अश्वजीत जानराव**
> विभाग नियंत्रक, लातूर

## विद्यार्थ्यांनी अन्य क्षेत्रातही सहभाग घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
शैक्षणिक उत्कृष्टतेसह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी संशोधन, कला, क्रीडा आणि अन्य क्षेत्रात भाग घेतले पाहिजे. महाविद्यालय आणि विद्यापीठ संशोधन, युवक महोत्सव आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असते,असे प्रतिपादन डॉ.कोमल गोमारे यांनी केले.तसेच जानवी अंबर या विद्यार्थीला अन्वेषण २०२५ संशोधन स्पर्धेसाठी विभागाच्या वतीने शुभेच्छाही दिल्या.



बी.एस्सी.द्वितीय वर्गातील विद्यार्थिनी अंबर जानवी हिने लोनेर येथील राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेतील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितला. दि. १६ जानेवारी २०२५ रोजी जैवतंत्रज्ञान मंचाच्या माध्यमातून लिओनोर मायकेलिस यांची १४९ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात डॉ.कोमल गोमारे आणि प्रा.स्वरूप गावकरे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. कार्यक्रमाची प्रस्तावना जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.सुभद्रा परगे यांनी केली.

बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान प्रथम वर्गाच्या विद्यार्थिनी प्रतिक्षा सोळुंके हिने लिओनोर मायकेलिस यांच्या जीवनावर माहिती दिली.तिने सांगितले की, लिओनोर मायकेलिस यांचा जन्म १६ जानेवारी १८७५ रोजी झाला.ते जर्मन बायोकेमिस्ट आणि वैद्य होते.त्यांनी एन्झाइम किनेटीक्सवर महत्त्वपूर्ण काम केले आणि मायकेलिस-मेंटेन समीकरण विकसित केले.

हे समीकरण एंजाइमेटिक प्रतिक्रियांच्या दराचे वर्णन करते आणि एंजाइम कसे कार्य करतात हे समजून घेण्यास मदत करते.मायकेलिस यांनी भौतिक रसायनशास्त्र आणि इलेक्ट्रोकेमिस्ट्री क्षेत्रातही मोठे योगदान दिले. त्यांचे निधन ८ ऑक्टोबर १९४९ रोजी झाले.

कार्यक्रमास जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्वेता मदने,प्रा. अवंती बिडकर, डॉ.नितीन चव्हाण तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी बाळासाहेब चौगुले, लक्ष्मण शिंदे, अशोक मदने, अश्विनी ढवारे तसेच महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## 'शारदा'मध्ये जिजाऊ जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नर्सरी गट, पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता तिसरी व चौथीतील विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी हंचाटे यांनी केले. प्रास्ताविक समन्वयिका अश्विनी पवार यांनी केले. आभार ऐश्वर्या बागल यांनी मानले. यावेळी शिक्षिका शीतल नडगिरे, ललिता दरेकर, लिंबराज गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी मुख्य समन्वयिका अनघा पाटील, समन्वयिका रेणुका समुद्रे, वर्षा कांबळे, कला शिक्षिका प्रियल गोखले, सांस्कृतिक विभागप्रमुख दर्शना बोराडे, नीशा पवार, आफ्रीन दामटे, किरण शिरसाट, मीनाक्षी सरवदे, गीतांजली गिरी, अंजली शर्मा, शर्मिला होनराव, पंकजा पांचाळ आदी उपस्थित होते.

## विविध उपक्रमास खेळाडूंसह जेष्ठांचाही सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१ जानेवारी -**
महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मीती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी स्व.खाशाबाजाधव (कुस्तीचे खेळाडू) यांचा १५ जानेवारी हा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्व पोहोचविणे, यासाठी लातूर जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित विविध उपक्रमाअंतर्गत जिल्हा क्रीडा संकुलामध्ये नियमित सरावासाठी येणाऱ्या खेळाडू, क्रीडाप्रेमी , महिला तसेच जेष्ठ नागरीकांनीही सहभाग नोंदवला. या प्रसंगी राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून सकाळी जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये कर्मवीर अकॅडमी व कमान्डो ॲकॅडमीचे खेळाडू, खेलो इंडीया कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील कुस्तीपटू, तसेच नियमित व्यायाम करणारे नागरीकांनी रॅलीमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

रॅलीचा समारोप जिल्हा क्रीडा संकुल येथील खुले प्रेक्षागृह येथे करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त बालाजी मरे, कृषी अधिक्षक भास्कर कोळेकर, गट विकास अधिकारी (मनरेगा) संताजी माने, प्रभू जाधव, बाभळगाव पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य वसंत चव्हाण, से.नि.पोलीस उपनिरीक्षक गौतम कांबळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, सुरेंद्र कराड, जयराज मुंढे, क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, कृष्णा केंद्रे, धिरज बावणे, बाबासाहेब इंगोले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले, तर आभार जयराज मुंढे यांनी मानले. तसेच सायंकाळी जिल्ह्यातील विविध खेळाचे अंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांचा राज्य क्रीडा दिनानिमीत्ताने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी खेलो इंडीया कुस्ती केंद्र येथील खेळाडूंनी आणि जिम्नॅस्टीकच्या खेळाडूंनी प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी विभागीय कामगार आयुक्त मंगेश झोले यांच्या हस्ते सर्व आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांना स्व.खाशाबा जाधव यांची प्रतिमा व जीवन चरित्रावर आधारित ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

## शुक्रवारी लातुरात धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
मराठवाडा शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लातूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

शक्तीपीठ महामार्गाच्या उभारणीमुळे अनेक शेतकऱ्यांची हजारो हेक्टर सुपीक जमीन या मार्गात जाणार आहे. त्यासाठी शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा कडाडून विरोध होत आहे. मात्र, शासन शेतकऱ्यांच्या विरोधाला डावलून हा महामार्ग करण्याचा घाट घालत आहे. त्यामुळे मराठवाडा शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे. केवळ लातूरमध्येच नाही तर शक्तीपीठ महामार्ग जाणाऱ्या सर्व जिल्ह्यात असे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## सात कलमी कृती आराखड्यानुसार राबवली स्वच्छता मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जानेवारी -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सात कलमी कृती आराखड्यानुसार आज जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय आणि जिल्हा पशुचिकित्सालय येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी यामध्ये सहभाग घेतला.

या उपक्रमादरम्यान परिसर स्वच्छता, कचऱ्याचे व्यवस्थापन, झाडांची छाटणी, तसेच कार्यस्थळ स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला. स्वच्छता मोहिमेचा उद्देश स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे होता. या उपक्रमामध्ये सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी केला आहे.

अशा उपक्रमांमुळे समाजात स्वच्छतेबद्दल जागृती निर्माण होईल आणि प्रत्येकजण आपला परिसर स्वच्छ ठेवण्याच्या दिशेने पुढे येईल, असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी यावेळी सांगितले.